म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ३०६०

स्वाडिलकरांचा प्रॅक्टिकल सोशॅलिझम

एक मर्मभेद

REFBK-0024353

ए. बी. बर्धन

5 DEC 1984

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०६०
दा. क्र. २२३५.३
निवेद्य क्र. १०१
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ निबंध [साहित्यसमीक्षा]
३०६०
२४३५३
१५१०८४

खांडिलकरांचा

प्रॅक्टिकल सोशॅलिझम

एक समीक्षा

लेखक :
ए. बी. वर्धन

REFBK-0024353

लोकवाङ्मय गृह लि. मुंबई ४०० ०२५.

© ए. बी. बर्धन

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी १९८४

मुखपृष्ठ सजावट :
प्रकाश विश्वासराव

मूल्य : ५ रुपये

मुद्रक :
आर. जी. देसाई
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
भुपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड, प्रभादेवी,
मुंबई–४०० ०२५.

प्रकाशक :
आर. जी. देसाई
लोकवाङ्मय गृह. लि.
भुपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
मुंबई–४०० ००४.

अनुक्रम

१) खाडिलकरांच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"ने उडविलेली खळबळ १

२) खाडिलकरांनी सोविएत संघराज्यातील वस्तुस्थितीचे केलेले "चक्षुर्वैसत्यं" वर्णन ४

३) सोविएत संघराज्यासमोर खड्या ठाकलेल्या समस्या ९

४) पूर्व-सोविएत, मध्य-आशियाई देशांमधील "चमत्कार" १४

५) खाडिलकरांनी मांडलेले प्रमुख सिद्धांत २०

६) ऑक्टोबर क्रांतीने मार्क्स चुकीचा ठरविला का ? २६

७) मार्क्सवाद-लेनिनवादाची विजयी आगेकूच ३०

८) "माणूस" अपरिवर्तनीय आहे काय ? ३५

९) "नवा माणूस" उदयास येण्यासाठी आवश्यक असलेली परिस्थिती ४२

१०) प्रत्यक्ष वास्तवता आणि भारतीय कम्युनिस्टांची तथाकथित "पापकृत्ये" ४७

११) क्रांतिकारी सिद्धांत आणि व्यवहार यांची गतिमान परस्परावलंबी एकात्मता ५३

१२) सर्वसाधारण गतिनियमांची संघर्षात्मक एकता आणि भारतातील परिस्थितीची वैशिष्ट्ये ५८

१३) समाजवादी मानवतावाद आणि धर्म ६४

१४) धार्मिक पुनरुज्जीवनवाद आणि त्याची विषारी फळे..... ७३

१५) साध्य आणि साधन ८२

१६) ठाकऱ्यांनी "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"ला दत्तक घेतले खरे, पण कशासाठी? ८९

प्रस्तावना

मुंबईतील सुप्रसिद्ध दैनिक "नवाकाळ"चे संपादक श्री. नीळकंठ खाडिलकर यांनी गेल्या वर्षी सोविएत संघराज्याचा दोन आठवड्यांचा दौरा केला होता. तेथून परतल्याबरोबर त्यांनी सोविएत संघराज्यांत जे काय पाहिले, अनुभवले, त्याचे "चक्षुर्वैसत्यम्" वर्णन करणारे अग्रलेख त्यांनी "नवाकाळ" मध्ये लिहिले. एवढेच नव्हे तर ते पाहून त्यांना जे काय वाटले ते, विशेषतः भारतामध्ये समाजवादाच्या दिशेने परिवर्तन घडवून आणण्याबाबतचे त्यांचे विचार, त्यांनी प्रांजलपणे मांडले. त्याला उत्तरादाखल जे लेख मी लिहिले त्या लेखांचा हा संग्रह आज पुस्तकरुपाने पुनर्मुद्रित होत आहे.

खाडिलकर यांचे लेखही नंतर पुस्तकरुपाने प्रकाशित करण्यात आले. त्यापाठोपाठ त्या पुस्तकाची इंग्रजी आवृत्तीही प्रसिद्ध झाली. खाडिलकरांनी पुस्तकरुपाने लेख प्रसिद्ध करतांना त्याच्या मराठी आवृत्तीत काही फेरबदल केले व त्यानंतर इंग्रजी आवृत्तीतही आणखी काही फेरबदल केले. त्या फेरबदलांवरून त्यांच्या विचारप्रक्रियेचा विकास दिसून येतो. सुरुवातीच्या लेखांवरील चर्चा आणि वादविवादानंतर बहुधा हा परिणाम झालेला असावा.

तथापि, उत्तरादाखल जे लेख मी लिहिले ते त्यांच्या मूळ लेखांना अनुसरूनच लिहिले. त्याचे एक कारण असे की, त्यांचे सुरुवातीचे लेखच (विशेषतः– शिवसेनेतर्फे त्याच्या १ लाख पुनर्मुद्रित प्रती प्रसिद्ध करण्यात आल्याकारणाने) जास्तीत जास्त लोकांपर्यंत जाऊन पोहोचले होते व त्यांनी वाचकांमध्ये खळबळ उडवून दिली होती. अर्थात त्याबाबत शहामृगाप्रमाणे जमिनीत डोके खुपसून बसून जणुकाही घडलेच नाही अशी वृत्तीही धारण करता आली असती. कारण समुद्राला तेवढ्याने काही आग लागली नसती ! पण त्यापेक्षा सरळसरळ खाडिलकरांशी 'खुले आम' चर्चा करून त्यांच्या लेखात जे काय मान्य होण्यासारखे होते ते मान्य करुन जे मान्य होण्याजोगे नाही ते खोडून काढावे हाही दुसरा मार्ग होता. आपण मार्क्सवाद्यांनी दुसरा मार्गच निवडावा असे मला वाटले व मी तोच मार्ग पसंत केला.

माझ्या उत्तरामध्ये कित्येक ठिकाणी खाडिलकरांनी लिहिले त्या पलिकडे जाणे मला भाग पडले. कारण चर्चेचा मुद्दा स्पष्ट होण्यासाठी ते आवश्यक

होते. त्याचप्रमाणे, सामाजिक प्रगतीसाठी भारतीय जनतेने केलेल्या लढ्यांमध्ये तसेच भारतातील वास्तवता जाणून घेण्यामध्ये भारतीय कम्युनिस्टांनी केलेल्या कार्याची नोंद घेणे देखील मला आवश्यक वाटले. अर्थात तसे करताना खाडिलकरांनी उपस्थित केलेल्या काही मुद्यांबाबत वाद घालण्याची भूमिका मी घेतली नाही कारण माझ्या मते ते मुद्दे त्यांच्या एकूण विचारपद्धतीच्या दृष्टीने मूलभूत नव्हते तर केवळ अनुषंगिक होते. एखाद्या कॉलेजमधील वादस्पर्धेमध्ये वादपटुत्व सिद्ध करायला असे गौण मुद्दे खोडून काढणे ठीक असते. परंतु गांभिर्यतापूर्वक करावयाच्या चर्चेत ते योग्य नसते. आणि म्हणूनच प्रचारी पद्धतीने मुद्दे मांडणे देखील मी टाळले. कारण मी असा विचार केला की, बाकी काही नसले तरी आजतागायत ज्यांची मने पूर्वग्रहदूषित होती अशा अनेकांना (ज्यात शिवसैनिकांचा देखील समावेश आहे.) सोविएत संघराज्याविषयी आणि समाजवादाने मिळवून दिलेल्या लाभांविषयी बरेचसे सत्य खाडिलकरांच्या लेखांमुळे समजले. तेव्हा हीच प्रक्रिया पुढे घेऊन जाणे, तसेच मार्क्सवाद–लेनिनवादाच्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचाच हा परिणाम आहे, आणि त्यात कामगारवर्ग आणि त्याच्या पक्षाची भूमिका सर्वात महत्त्वाची असते, आणि भारतातदेखील मार्क्सवाद आणि त्याची विशिष्ट पद्धती यासंबंधीचे हे सर्वसाधारण सत्य निर्विवादपणे लागू पडते हे दाखवून देणे हेच तर आपले उद्दिष्ट आहे.

दिनांक १४ जानेवारी ते ३ फेब्रुवारी पर्यंतच्या २० लेखांकांत उत्तरादाखल लिहिलेले माझे लेख आपल्या "नवाकाळ" मध्येच प्रसिद्ध करण्याचे जे औदार्य व सौजन्य श्री. खाडिलकरांनी दाखविले त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. हे करून पत्रकारितेचा एक उदात्त आदर्श तर त्यांनी लोकांसमोर ठेवलाच; परंतु त्याचबरोबर या प्रश्नांबाबत आपण आपले मन खुले ठेवले असल्याचे व चर्चेला अधिक गती देण्याची आपली तयारी असल्याचेही त्यांनी दाखवून दिले आहे. अशा तऱ्हेच्या चर्चेतून मार्क्सवादाची सत्यताच सिद्ध होईल.

"युगांतर"च्या संपादक मंडळाचे एक सदस्य कॉ. विनायक कऱ्हाडे यांनी माझ्या लेखांचा मराठीत अनुवाद केल्याबद्दल त्यांचेही आभार मला मानलेच पाहिजेत.

कॉ. विनायक कऱ्हाडे, कॉ. आत्माराम वैद्य व कॉ. बी. एन. नीलावर यांच्या निरलस परिश्रमांमुळेच केवळ माझ्या लेखसंग्रहाचे इंग्रजी आणि मराठी पुस्तकांच्या स्वरुपात प्रकाशन करणे शक्य झाले.

१ फेब्रुवारी १९८४

–ए. बी. बर्धन

मराठी ३०६०
दा. क्र. २८३५५३
निवड १५/१०/८५
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

(१) खाडिलकरांच्या 'प्रॅक्टिकल सोशॅलिझम' ने उडविलेली खळबळ

६० वर्षांची परंपरा असलेल्या मुंबईतील एका नावाजलेल्या वृत्तपत्राचे–दैनिक नवाकाळचे–संपादक श्री. नीळकंठ खाडिलकर यांनी जुलै–ऑगस्ट १९८३ दरम्यान सोविएत संघराज्याचा पंधरवड्याचा दौरा केला. त्यांच्या दौऱ्याच्या कार्यक्रमात तुर्कमेनिया, उझ्बेकिस्तान आणि किर्गिझिया हया तीन मध्य-आशियाई देशांचा, तसेच मॉस्को व लेनिनग्राद परिसरांचा समावेश होता.

दौऱ्याहून परतल्यानंतर त्यांनी आपल्या दौऱ्यातील निरीक्षणांवर आधारित असे ८ प्रदीर्घ संपादकीय लेख, आपल्या स्वतःच्या "नवाकाळ" दैनिकात व "नवशक्ती" दैनिकात, प्रसिद्ध केले. या दौऱ्याचा त्यांच्यावर एवढा जबरदस्त प्रभाव पडला की, त्या ८ लेखांकापाठोपाठ त्यांनी आणखी पाच अग्रलेख लिहून त्याद्वारे सोविएत समाजवादी पद्धतीचा दिलखुलास गौरव केला. एवढेच नव्हे, तर भारताला आज भेडसावणाऱ्या समस्यांवर एक खात्रीचा "रामबाण" तोडगा या दृष्टीने त्याचा पुरस्कारही केला. या आपल्या पुरस्काराचे नामाभिदान त्यांनी "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" असे केले आणि भारताच्या वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीमध्ये त्यातील सूत्रांचा वापर कसा करता येईल त्याचाही एक कार्यक्रम लोकांपुढे ठेवला.

खाडिलकरांचे सोविएत दौऱ्यासंबंधीचे लेख व "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" संबंधीचे त्यांचे पाच अग्रलेख आता एका पुस्तकाच्या स्वरूपात प्रसिद्ध झाले असून त्या पुस्तकास एस. ए. डांगे यांची प्रस्तावना आहे.

या आपल्या छोटयाशा प्रस्तावनेमध्ये डांगे यांनी खाडिलकरांच्या वस्तुनिष्ठ भूमिकेची प्रशंसा केलेली असून त्याबाबत आपली मतभिन्नता व्यक्त करताना म्हटले आहे की, "खाडिलकरांच्या काही मतांशी मी सहमत होऊ शकत नाही. तथापि, त्याबाबत सखोल चर्चा करण्यासाठी प्रस्तावना हे स्थळ नाही."

डांगे यांनी असेही म्हटले आहे की, "लेनिन यांनी मार्क्सवाद गाडून टाकला व प्रॅक्टिकल सोशॅलिझमचा नवा सिद्धांत निर्माण केला" हया मताशी मी कधीही सहमत होऊ शकत नाही.

डांगे म्हणतात, "निळूभाऊ खाडिलकरांनी एका सुंदर उद्यानाला भेट दिली. तेथे त्यांच्या दृष्टीस पडलेला फळा-फुलांचा बहर पाहून त्यांना आल्हाद वाटला. परंतु त्या झाडांची बीजे जमिनीत खोलवर रुजलेली आहेत अन् त्यातूनच ती रोपे अंकुरलेली आहेत. ती बीजे "गाडलेली" खचितच नव्हती. लेनिन आणि कम्युनिस्ट पक्ष यांनी त्यांना खत–पाणी घालून त्यांची मशागत केली आणि त्यातूनच आज आपणाला वसंताचा बहर त्या बागेमध्ये फुललेला दिसत आहे. आधी बीज होते. ते अंकुरले अन् त्यातून रोप वाढले आणि बहरले. तेच पहिले समाजवादी राज्य सोविएत रशिया. इतर देश आज त्या अवस्थेप्रत येऊन पोहोचले आहेत. आणि त्यांच्या मागोमाग इतर अनेक देश जातील अन् भारतही यथाक्रम त्याच मार्गाने जाईल. ज्या एका बीजामधूनच कोटी कोटी वृक्ष फुलणार अन् फळणार आहेत, असे बीज मार्क्सने पेरले, त्याच समाजवादाचा उद्घोष त्यांनी केला." (संत तुकारामांच्या "अभंगा"तील सुंदर उत्प्रेक्षा डांगे यांनी कौशल्याने वापरली.)

निळूभाऊंचे लेख वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यानंतर शिवसेनापती बाळासाहेब ठाकरे यांनी एक निवेदन जाहीर केले. "प्रत्येकाने हचा अग्रलेखांची पारायणे केली पाहिजेत. रशियातला समाजवाद असा असेल तर त्या पद्धतीतील अनेक गोष्टींचा स्वीकार करून अंमलही आपण करू शकू. परंतु भारतीय कम्युनिस्ट आणि समाजवाद्यांनी रशियाची अशी प्रतिमा कधीच आमच्यासमोर उभी केली नाही. उलट, त्यांनी आमची फसवणूकच केली."

खालिडकर यांच्या लेखांच्या १ लाख प्रती पुनर्मुद्रित करून त्याला स्वतःची प्रस्तावना जोडून त्या त्यांनी आपल्या अनुयायांमध्ये वाटल्या. शिवसेनेच्या वार्षिक दसरा संमेलनामध्ये ठाकरे यांनी घोषणा केली, "प्रॅक्टिकल सोशॅलिझम आणि सोविएत पद्धत–हाच आपल्यासाठी मार्ग आहे. एक प्रबळ राष्ट्र निर्माण करण्यासाठी, हिन्दू धर्माचे संरक्षण करण्यासाठी, जनतेला अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण मिळवून देण्यासाठी, स्त्रियांना निर्भय जीवन आणि समानता मिळवून देण्यासाठी!" त्यांनी असे म्हटले आणि इतरही अनेक गोष्टी सांगितल्या. परंतु त्याकडे आपण मागाहून वळू.

प्रचंड कामगार विभागाचा स्वतःचा असा अनुयायीवर्ग पाठिशी असलेले स्वतंत्र ट्रेड युनियन नेते डॉ. दत्ता सामंत त्याच दिवशी दुसऱ्या एका मेळाव्यामध्ये बोलले आणि त्यावेळी त्यांनी खाडिलकर यांनी उद्घोषिलेल्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"ला आपला पाठिंबा घोषित केला.

खाडिलकर यांच्या लेखांनी लाखो सर्वसामान्य लोकांचे लक्ष वेधून घेतले आणि त्यांच्या विचारांमध्ये खळबळ माजविली ही गोष्ट नाकारणे निरर्थक आहे. काल-परवापर्यंत हे लोक सोविएत संघराज्यावाबत व समाज-

वादी पद्धतीबाबत विरोधी मतांचे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणारे होते. जन-समुदायातील मोठे विभाग जे आजवर स्तब्ध व निद्रिस्त होते ते एखाद्या दिशेने विचार करण्यास आणि शक्य झाल्यास एखाद्या विशिष्ट मार्गाने कृति-शील होण्यास प्रवृत्त होणे यातच राजकारणाचे सारसर्वस्व आहे. आम्ही कम्युनिस्टांनी जर हचा घटनेकडे काणाडोळा केला अन् म्हणून जर आम्ही अंध बनलो असा आरोप कुणी आमच्यावर केला तर ते योग्यच आहे. आणि म्हणूनच खाडिलकर यांनी आपल्या लेखात आणि प्रॅक्टिकल सोशॅलिझमच्या संकल्पनेमध्ये व्यक्त केलेली मते आणि विचार यांची नोंद घेणे आणि त्यांचे विश्लेषण करणे जरुरीचे आहे असे आम्हाला वाटते.

अर्थात हे करीत असताना एका बाजूला खाडिलकर, एक पत्रकार. चक्षुर्वैसत्यं जाणून घेण्यासाठी सोविएत संघराज्यात गेलेले. जाताना डोळ्यांवर कसलीही झापडे अथवा मनात पूर्वग्रह न ठेवता गेलेले. सत्य जाणून घेऊन वस्तुनिष्ठतेने ते आपल्या वाचकांपर्यंत पोहोचविणारे. सोविएत संघराज्यातील प्रत्यक्ष अनुभवातून आम्हाला काही शिकता येईल का ? त्यातून आमच्या समस्यांवर आम्हाला काही तोडगा काढता येऊ शकेल का ? असे प्रश्न क्षणोक्षणी विचारून त्यांची उत्तरे शोधू पाहणारे असे खाडिलकर ! अन् दुसऱ्या बाजूला, बाळासाहेब ठाकरे, ज्यांना काही भूतकाळ आहे, काही वर्तमानकाळ आहे असे एक राजकारणी ! या दोघांमध्ये जर आम्ही फरक केला तर आमचे वाचकच केवळ नव्हे, तर स्वतः खाडिलकरदेखील आमची भूमिका समजून घेतील याविषयी मला खात्री वाटते.

सर्वच राजकारणी लोक आणि राजकीय संघटनांप्रमाणेच ठाकरे यांच्या बाबतीत, त्यांची प्रत्येक नवी घोषणा विचारात घेताना पूर्वीचा त्यांचा व्यवहार आणि ग्रह, कोणाच्या आणि कोणत्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व ते करतात ते सारे लक्षात घेतल्यानंतरच ते जर काही वेगळे "वळण" घेत असतील तर त्याचा विचार करावा लागेल. खाडिलकर यांच्या विचारांबाबत बाळासाहेबांचे "भाष्य" हे मतैक्याचे लक्षण समजायचे की, "पूर्वीच्याच उद्दिष्टा"चा पाठपुरावा करण्यासाठी हातात मिळालेले केवळ एक "नवे सैद्धांतिक शस्त्र" एवढाच त्याचा अर्थ आहे, हेदेखील तपासून पाहावे लागेल.

त्याच न्यायाने, डॉ. सामंत यांच्याहीबाबत त्याच विचारपद्धतीचा वापर करावा लागेल. अर्थात ठाकरे आणि सामंत यांच्यामध्ये त्यांची मते आणि दृष्टिकोन, त्यांचे ग्रह आणि व्यवहार, त्यांचा भूतकाळ आणि वर्तमान-काळ इत्यादीबाबत जमीन-अस्मानाचे अंतर आहे.

(२) खाडिलकरांनी सोविएत संघराज्यातील वस्तुस्थितीचे केलेले 'चक्षुर्वैसत्यम्' वर्णन

सुवातीस, खाडिलकरांच्या सोविएत दौऱ्यातील अनुभवांमधील काही उतारे येथे उद्धृत केल्यास बरे होईल. त्याखेरीज त्यांच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"वर "कोरडे" ओढले तर ते अयोग्य व अन्यायाचे होईल.

कसलेही हातचे राखून न ठेवता खाडिलकर प्रांजलपणे म्हणतात--

सोविएत रशियात पंधरवडाभर मी रोज सोळा तास फिरलो. जिथे जायचे आहे सांगितले तिथे मला नेण्यात आले. टूरिस्टांना दाखवितात ती नुसती प्रेक्षणीय स्थळे मला पहायची नाहीत, तर समाजवादी राष्ट्रात माणसाचे काय झाले आहे ते मला प्रत्यक्ष पहायचे आहे. मला कुठेही कुणीही आडकाठी केली नाही. आणि ते पुढे म्हणतात,

"रशियात पोलादी पडदा आहे. अमुक ठिकाणी जाता येत नाही किंवा तमुक ठिकाणी मज्जाव असतो असे अनेक अपसमज भारतात आहेत. रशियात जाऊन आलेले काही भारतीयही असेच सांगतात. पण त्यात काहीही तथ्य नाही."

"रशियात पोलादी पडदा नाही, पण पोलादी शिस्त मात्र जरूर आहे. आणि का असू नये ?" "आव-जाव-घर-तुम्हारा" हा जो आपल्याकडे सावळागोंधळ आहे, ज्याला चुकीने "स्वातंत्र्य" म्हणून संबोधण्यात येतं. तो हवाच कशाला ?"

खाडिलकरांना प्रकर्षाने जाणवलं जर काय असेल तर ते म्हणजे कष्टकरी जनतेला, त्यातही सर्वात अधिक स्त्रिया आणि मुले यांना, समाजवादाचा सर्वात जास्ती लाभ झाला. अत्यंत नाममात्र भाड्याने राहती घरे, मुलांना मोफत आणि सक्तीचे दहा वर्षांचे शिक्षण, सर्वोत्कृष्ट औषधोपचार, आणि तोदेखील विनामूल्य, किमान वेतन सरासरीने दरमहा १२०० ते २४०० रुपयांच्या दरम्यान (याचा अर्थ किमान आणि कमाल वेतनात फार मोठी तफावत नाही). रोजगाराची हमी. त्यामुळे चिंता नाही. आराम आणि मनोरंजनाच्या सुविधा. जन्मापासून मरेपावेतो प्रत्येक व्यक्तीची देखभाल– समाजवादामध्ये प्रत्येक नागरिकाला उपभोगावयास मिळणाऱ्या हया काही सुविधा.

सर्व महानगरी केंद्रांमध्ये—मोठमोठ्या शहरांमध्ये–जी वाहतूक-व्यवस्था आहे, त्याची खाडिलकर यांनी मुक्तकंठाने स्तुती गायिली आहे. अत्यंत नाममात्र दराने उपलब्ध असलेली ही वाहतूक–व्यवस्था अनेक वर्षे सतत चालू आहे, त्यामुळे निवासस्थान आणि कामाची जागा यामध्ये जा-ये करायला कुणालादेखील एका तासापेक्षा अधिक वेळ वाया घालवावा लागत नाही.

उत्पादन हे व्यक्तिगत फायद्यासाठी नाही तर समग्र समाजासाठी असल्याकारणाने अधिक काम आणि अधिक उत्पादन यांना आपोआपच प्रेरणा मिळते. "सार्वजनिक उपभोगनिधी"मध्ये सतत वाढ होत राहिल्याकारणाने प्रत्येकाला मिळणाऱ्या लाभांशामध्ये सतत वाढ होत राहते. गलथान काम, आळशीपणा, दांडग्या मारणे, कामचुकारपणा, उत्पादनातील कर्तव्यांबाबत बेजबाबदारपणा इ. अपप्रवृत्तींबद्दल शिक्षा करण्यात येते. एवढेच नव्हे, तर सामाजिक रोष पत्करावा लागतो. तथापि कारखान्याच्या संचालकाच्या लहरीनुसार किंवा एकतर्फी मर्जीनुसार कोणाचीही कामावरून हकालपट्टी करण्यात येत नाही. त्याबाबतचा निर्णय एक समिती घेते. त्यात ट्रेड युनियनचे आणि पक्षाचे प्रतिनिधी असतात. त्याशिवाय व्यवस्थापनातर्फेही प्रतिनिधी असतात.

एका मोठ्या कारखान्याच्या संचालकाशी झालेल्या बोलण्याची माहिती खाडिलकर सांगतात. त्यांना ते प्रश्न विचारतात : संचालक आणि इंजिनियर यांचे वेतन सर्वसामान्य कामगाराच्या सरासरी वेतनापेक्षा फार जास्त नसेल आणि शिवाय कामगारांना उपलब्ध असणारे काही फायदे जर त्यांना मिळत नसतील तर मग संचालक अथवा इंजिनियर बनण्यात आणि उच्च शैक्षणिक पात्रता मिळवून वाढत्या जबाबदाऱ्या शिरावर घेण्यास प्रेरणा कोणती राहणार ? याला त्यांना उत्तर मिळाले ते असे :

"पैसा हेच काही सर्वस्व नाही. काम केल्याचं समाधान म्हणून काही असतं ना. समाजाची सेवा केल्याचं समाधान, निर्णय घेण्याबाबत व त्यांच्या अंमलबजावणीबाबत वरिष्ट पातळीवरील सहभाग, गंभीर जबाबदाऱ्या स्वीकारण्यात आणि भावी समाजाची जडणघडण करण्यात आपल्या माणसांच्या आदरास पात्र होण्यातला आनंद असतोच की."

"केवळ भाकरीने नव्हे" हा वाक्प्रचार तुम्ही ऐकलाच असेल. पण सगळ्यांत विनोदाची बाब ही की हा वाक्प्रचार कम्युनिस्टांच्याच विरुद्ध वापरला जातो.

खाडिलकर अगदी न्याय्यपणे, अन् काहीशा त्राग्याने म्हणतात की, वर व्यक्त केलेले मत आपल्या सध्याच्या भारतीय समाजव्यवस्थेमध्ये समजणे आणि पटणे कठीण वाटते. सोविएत संघराज्यातील स्त्रिया आणि मुले यांच्या स्थितीचे वर्णन करताना तर ते अगदी भारावून जातात. ते म्हणतात, सोविएत

संघराज्यात सर्वांना समान संधी उपलब्ध आहेत. असमानता आणि भेदभाव शोधायचा झालाच तर तो मुलांच्या बाबतीत आढळतो. "खास अधिकार असलेला वर्ग" असा शब्दप्रयोग वापरायचा झालाच तर तो मुलांच्या बाबतीतच वापरता येईल. स्त्रियांना जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये समानता आणि समान संधी उपलब्ध आहेत. लैंगिक समानता केवळ घटनेमध्ये लिहिण्यापुरतीच नाही, तर ती प्रत्यक्ष जीवनात अवतरलेली आहे. लिंगभेदावर आधारित अन्याय अन् भेदभाव नाहीसे करण्यात आलेले आहेत. आता पुढचा लढा चालू आहे तो घरामध्ये खरीखुरी समानता मिळण्यासाठी. पुरुषांच्या परंपरागत वृत्तीविरुद्ध हा लढा चालू आहे. कारण अद्याप त्या वृत्तीचा संपूर्णपणे त्याग करण्यात आलेला नाही. बहुसंख्य घटस्फोटांमागे हेच मूळ कारण असते हे खरेच, पण तरीदेखील कौटुंबिक बंध अद्याप मजबूत आहेत. कौटुंबिक जीवन संपुष्टात आले आहे. आणि स्त्रिया आणि मुले ही राज्याची सामायिक मालमत्ता मानली जाते हा अपप्रचार हास्यास्पद आहे.

स्त्री ही पुरुषाच्या कामवासनेचे व अभिलाषेचे साधन अशा तऱ्हेने स्त्रीचे चित्रण कुठेही आढळत नाही. तथाकथित "मुक्त समाजात" आढळतात तसली उत्तान भडक पोस्टर्स आणि जाहिराती कोठेही आढळत नाहीत. स्त्रिया मुक्तपणे आणि निर्भयपणे सर्वत्र वावरताना आढळतात. कडक "पोलीस बंदोबस्त" असतो म्हणून नव्हे, तर नव्या सामाजिक प्रवृत्तींमुळे. नोकरी करणाऱ्या मातांना सर्व प्रकारच्या जादा सुविधा उपलब्ध असतात.

समाजवादी शिक्षणपद्धतीचे वर्णन खाडिलकर सविस्तरपणे करतात. विशेषतः सोविएत नागरिकांचे पालनपोषण करण्यात, त्यांच्या अंगिभूत गुणांचा शोध घेऊन त्यांना फुलविण्यात, जन्मापासून वयात येईतोपर्यंत जी काळजी घेतली जाते त्याची ते खास नोंद घेतात.

गुन्हे शोधून काढणे आणि गुन्हेगाराला वठणीवर आणणे हे कार्य तीन साधनांनी करण्यात येते. पोलीस यंत्रणा, कामगार सेना आणि नागरिक परस्पर – सहकार्याने हे कार्य करतात. दंडाची शिक्षा अतिशय कठोर असते. परंतु आपण समजतो तसा पोलिस हा सर्वाधिकारी नसतो.

काम सामुदायिकरित्या चालते. परंतु जबाबदारी वैयक्तिक असते. प्रत्येकावर त्याने केलेल्या कामाचे उत्तरदायित्व असते. त्यामुळे "वरून" येणारे फोन किंवा हस्तक्षेप (दुसऱ्या शब्दात सांगायचे तर वशिलेबाजी किंवा खूषमस्करी यांना स्थानच नसते, जे आपल्याकडे पावलोपावली अनुभवावयास मिळते.

लेनिनग्रादमधील आपल्या वास्तव्याचे वर्णन करताना तर निळूभाऊंची झरणी परमोच्च बिंदू गाठते. पिस्केरोव्हस्कोये स्मशानभूमीला त्यांनी भेट

दिली. त्याच्या वर्णनाने ते सुरुवात करतात. त्या स्मशानभूमीमध्ये जवळजवळ पन्नास हजार मुले, स्त्रिया आणि पुरुष, सैनिक अन् नागरिक, फॅसिझमविरोधी युद्धकाळातल्या ९०० दिवसांच्या अमानुष वेढ्यातले बळी दफन केलेले आहेत.

ऐतिहासिक विंटर पॅलेस, ज्या ठिकाणी क्रांतीनंतर जगप्रसिद्ध हर्मिटाज म्युझियम वसविण्यात आला आहे, त्याला दिलेल्या भेटीबद्दलही त्यांनी लिहिले आहे. रशियन झारचे सिंहासन असलेला तो विंटर पॅलेस. त्यावर ७ नोव्हेंबर १९१७ रोजी क्रांतिकारी कामगार अन सैनिक चाल करून गेले. तथाकथित "हंगामी सरकार" च्या उरल्यासुरल्या अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आणि त्यानंतर समाजवादी क्रांतीची घोषणा करण्यात आली. उमराववर्गाचा हा खास वारसा – त्याचे सार्वजनिक वस्तुसंग्रहालयात रुपांतर करण्यात आले. सर्व प्रकारच्या नयनमनोहर सर्वोत्कृष्ट कलाकृतींचा हा अमोल ठेवा. क्रांतीकारी इतिहास आणि कला यांचा इतका सुरेख संगम जो हर्मिटाज या विंटर पॅलेसच्या वस्तुसंग्रहात आहे तसा जगात इतरत्र कोठेही आढळणार नाही, असं खाडिलकर म्हणतात. आणि विशेष लक्षात घेण्यासारखी बाब ही की, सोविएत सरकार आणि सोविएत जनता कला आणि कलाकुसर यांची किती काळजी घेते ते वाखाणण्यासारखं आहे. अगदी शहराच्या दिंडी-दरवाजावर हिटलर धडका देत असताना आणि कित्येक दिवस अन् रात्री तोफा आणि बंदुका यांचा वर्षाव होत असतांनादेखील नागरिकांनी विंटर पॅलेसमधल्या कलाकृतींचे प्राणपणाने संरक्षण केले. त्यानंतर वेढा उठला पण युद्ध चालूच होते. तेव्हा देखील हीच कळकळ पुन्हा दिसून आली. म्युझियमची आणि तिथल्या कलावस्तूंची जी काय मोडतोड झाली त्या सर्वांची डागडुजी करण्याकरिता सोविएत सरकारने प्रचंड रकमेची तरतूद केली आणि सर्व कलावस्तू पुन्हा पूर्वीच्या अवस्थेमध्ये आणण्यात आल्या. लवकरच तो म्युझियम जनतेसाठी खुला करण्यात आला. प्रत्येक वर्षी हर्मिटाजला ३५ लाख प्रवासी भेट देतात. जे या म्युझियमबाबत तेच तेवढ्याच प्रमाणात इतरही म्युझियमबाबत आणि शिल्पांबाबत दिसून येते. मानवसमाजाच्या गौरवशाली परंपरांचा, संस्कृतींचा वारसा जतन करून ठेवणारी अशी ती ऐतिहासिक केंद्रे बनलेली आहेत.

लेनिनग्रादच्या भरचौकात चार्लस् डार्विन यांचा पुतळा पाहून आपणास आश्चर्याचा धक्का बसला असं खाडिलकर, अगदी निष्कपटपणे सांगून जातात. समाजवादी समाजपद्धतीच्या राष्ट्रीय अहंकारविरहित अशा वैज्ञानिक - बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनाचा हा साक्षात पुरावा असल्याचे ते मानतात.

सोविएत संघराज्यात कलावंत, स्थापत्यशास्त्रज्ञ, कवी, लेखक, शास्त्रज्ञ, मूर्तीकार यांना बहुमानाने वागविले जाते याची ते नोंद घेतात. प्रतिभा अन् गुणवत्ता मग ती कोणत्याही क्षेत्रातली असो, तिच्यावर तिच्या कर्त्याची नोंद

गौरवाने केली जाते. कोणा मंत्र्याने कोनशीला बसविली व कोणाच्या हस्ते अनावरण झाले यांची नावे कोठेही झळकताना आढळत नाहीत.

"माझी अशी समज होती" ते म्हणतात, "की समाजवादी देश म्हणजे एक उपयुक्ततावादी समाज असला पाहिजे. पण मला आनंदाश्चर्याचा धक्काच बसला. रशियामध्ये कला आणि कलावंत यांच्याबद्दलचे प्रेम अमर्याद असल्याचे जाणवले. ते म्हणतात,

"कम्युनिझम म्हणजे विळा आणि हातोडा. एक ऊग्र चेहरा, खडबडीत हात अन् कर्कश आवाज. कम्युनिझम आणि संस्कृती – हा विरोधाभास आहे. "जुने ते सोने असले तरी ते जाळूनच टाकले पाहिजे." आजतागायत भारतीय कम्युनिस्टांनी निर्माण केलेली प्रतिमा ही अशी आहे. पण प्रत्यक्षात मला जे आढळले ते हेच की या समाजवादी देशामध्येच कलेला तिचे योग्य स्थान आणि मोल लाभले आहे."

इतकी वर्षं खाडिलकरांनी कम्युनिस्टांबद्दल ही जी प्रतिमा बाळगली, अन् कम्युनिस्ट आणि सौंदर्यशास्त्र यांच्यात दोन ध्रुवांइतके अंतर आहे असे जे मानले त्याबाबत मी एवढेच म्हणू शकेन की विकृत कल्पनाशक्तीपुढे त्यांनी शरणागती पत्करली. अनेकदा असं घडतं, अन अनेकांच्या बाबतीत ते घडू शकतं.

खाडिलकर हे हाडाचे पत्रकार आहेत. तिसऱ्या पिढीचे जन्मजात पत्रकार असंही म्हणता येईल. संपादक या नात्याने त्यांनी आपल्या आजोबांची अन् वडिलांची गौरवशाली परंपरा पुढे चालविली आहे. भारतीय कम्युनिस्टांना ज्या कोपरखळ्या ते अधूनमधून मारतात त्या पाहता त्यांच्या मनात भारतीय कम्युनिस्टांविषयी आदरभाव नसल्याचे उघडपणे दिसून येते हे जरी खरे असले तरी आपल्या वृत्तपत्राद्वारे ते कामगारांचा आवाज व लोकशाहीचा आवाज बुलंद करीत आहेत, यात शंका नाही. भारतीय कम्युनिस्टांचे शहाणपण, त्यांचे सामान्यज्ञान, भारतीय परंपरा अन् वास्तवता याबाबतचे त्यांचे आकलन, याबाबत ते साशंक आहेत. पण त्याकडे आपण तूर्तास दुर्लक्ष करूया. शिव्या खाणे तर आम्हा कम्युनिस्टांच्या पाचवीला पुजलेलेच आहे. कधी कधी लायकीपेक्षा अधिक शिव्या, आम्ही केलेल्या, अथवा केल्या असं मानल्या गेलेल्या, पापांबद्दल मिळण्याचं भाग्य आम्ही उपभोगित आलो आहोत. पण म्हणतात ना, "निंदकाचे घर असावे शेजारी." जो आपले दोष दाखवतो तोच आपला खरा मित्र असे मानून आम्ही शिव्या खात-खातच टिकून राहू असा आम्हाला विश्वास वाटतो.

पण तो काही मुद्दा नाही.

(३) सोविएत संघराज्यासमोर खड्या ठाकलेल्या समस्या

खाडिलकरांनी स्वतःच म्हटल्यानुसार, त्यांच्यावर सर्वांत जास्त प्रभाव जर कसला पडला असेल तर तो म्हणजे सोविएत संघराज्याने केलेल्या प्रगतीचा. अर्थात, अमेरिका देखील एक प्रगत देश आहे. पण त्यांना जास्त प्रभाव जर कशाचा वाटला तर तो ह्याचा की १९२० पर्यंत रशियासमोर अशा समस्या खड्या ठाकलेल्या होत्या की ज्या आपणासमोर आजही खड्या आहेत. पण स्वातंत्र्यानंतर ३६ वर्षे उलटून गेल्यानंतर देखील त्या समस्या आपण दूर सारू शकलेलो नाहीत. याउलट ३५ वर्षांच्या कालावधीत रशियाने त्या समस्या दूर तर सारल्याच पण पुढेही भरधाव प्रगती केली. वाचकांना खाडिलकर स्मरण करून देतात की क्रांतीनंतर ५ वर्षेपर्यंत रशियाला १४ साम्राज्यवादी सत्तांकडून होणाऱ्या बाहच हस्तक्षेपाला अन् स्वाऱ्यांना तोंड द्यावे लागले. त्याचवरोबर, साम्राज्यवादी शक्तींच्या पाठिब्याने, देशांतर्गत सत्ताभ्रष्ट प्रतिक्रांतिकारकांनी चालविलेल्या दीर्घकालीन यादवी युद्धालाही तोंड द्यावे लागले. त्यानंतर, त्यांना ४ वर्षे फॅसिझमविरोधी युद्धाच्या आगीत होरपळावे लागले. ज्यात २ कोटींहून अधिक संख्येने जनता प्राणास मुकली. एवढेच नव्हे, तर त्याच्या भूभागापैकी विस्तीर्ण प्रदेश बेचिराख झाला. त्यामुळे देशाची प्रगती १० वर्षांनी मागे पडली. अशा तऱ्हेने, अन्मापासून सोविएत संघराज्याला पुनर्उभारणीसाठी व नवसमाजरचनेसाठी केवळ ३५ वर्षेच लाभली.

आज भारताला भेडसावणाऱ्या मागासलेपणा, निरक्षरता, दारिद्र्य, बहुभाषिकता, धर्मभेद इ. ज्या समस्या आहेत त्या सर्व त्यांच्याहीसमोर होत्याच. जाता जाता, खाडिलकर वाचकांना स्मरण करून देतात, की भारताप्रमाणेच सोविएत संघराज्यामध्ये देखील मुस्लीमधर्मीय अनुयायांची संख्या दुसऱ्या क्रमांकाचीच होती. आणि तरीदेखील, राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेतून उद्भवणाऱ्या उद्वेगाने खाडिलकर प्रश्न करतात : या समस्या ते का आणि कसे सोडवू शकले? याउलट आपण मात्र त्याच समस्यांच्या गदारोळात गुंतून पडलो आहोत अन् अधिकाधिक खोल गर्तेत जात आहोत. असं का? आप-

ल्यात कुणी असा हरीचा लाल नाही का की जो स्वतःला प्रश्न विचारू शकेल की त्याच परिस्थितीमध्ये असणाऱ्या आपल्या देशामध्ये असे का घडू नये? अन् घडायचे तर ते घडावे कसे?

मी देखील परदेशांत काही दिवस जाऊन आलेलो आहे. खाडिलकरांप्रमाणे मी देखील सोविएत संघराज्यात पंधरवडा घालविलेला आहे आणि इतरही समाजवादी देशांमध्ये काही दिवस जाऊन आलो आहे. याच भावना माझ्याही मनात उचंबळून आल्या हे कबूल करायला हरकत नाही. आणि म्हणूनच ह्या भावना खऱ्या नाहीत असं जर कुणी सुचवील किंवा दुसऱ्या देशाशी आपल्या देशाची तुलना करणे कमीपणाचे आहे असे जर कुणी मानेल तर त्याच्याशी मी कदापी सहमत होऊ शकणार नाही.

खाडिलकरांच्या सूक्ष्मदृष्टीने हेही अचूक हेरले की, अमेरिकेच्या विकासाच्या पातळीने परमोच्च बिंदू गाठलेला आहे. याउलट, रशिया अद्यापही विकासाच्या काठावरच आहे. आणि शांतता आणि शांततापूर्ण निर्मितीसाठी आणखी २५ वर्षांचा कालावधी मिळाला तर अमेरिकेला मागे टाकून तो बराच पुढे निघून जाईल. या ठिकाणी रशियाच्या प्रगतीच्या मार्गात कोणते घटक आडवे येत आहेत त्याकडेही जर खाडिलकरांनी वाचकांचे लक्ष वेधले असते तर वाचकांच्या ते हिताचे झाले असते.

समाजवाद, राष्ट्रीय मुक्ती आंदोलन, सामाजिक प्रगती यांच्याशी जन्मजात शत्रूत्व असलेल्या आणि इतिहासाच्या कालचक्राचे काटे उलट दिशेने फिरवू पाहण्याची मनोराज्ये उराशी कवटाळणाऱ्या अमेरिकेच्या नेतृत्वाखाली असलेल्या साम्राज्यवादी शक्तींनी अण्वस्त्रयुद्धाच्या धमक्यांनी अन् शस्त्रास्त्रसाठ्यांच्या लष्करी तळांनी सोविएत संघराज्याला घेराव करुन वेठीला धरले असल्याकारणाने त्यांच्याशी सतत मुकाबला करण्यामध्ये सोविएत संघराज्याला बरीच शक्ती पणाला लावावी लागते. ही गोष्ट निळूभाऊंच्या सूक्ष्म नजरेतून निसटली की त्याचा उल्लेख करायचे त्यांच्याकडून अनवधानाने राहून गेले? सोविएत संघराज्याच्या चहूबाजूंना लष्करी तळांचे वर्तुळ निर्माण करायचे, ६ मिनिटांच्या आत सोविएत संघराज्यातील कोणत्याही लक्ष्यावर आघात करू शकतील अशी प्रक्षेपणास्त्रे पश्चिम यरोपच्या भूमीवर पेरायची, (खुद्द अमेरिकन जनतेच्या सामाजिक - सुरक्षासुविधांचा बळी देऊन अमेरिकेतील लष्करी-औद्योगिक कारखान्यांना गडगंज नफे कमावून देणाऱ्या) शस्त्रास्त्रव्यापाराची स्पर्धा सुरु ठेवायची, हे साम्राज्यशाहीचे जागतिक डावपेच आहेत. या सर्वांमुळे सोविएत संघराज्याला आपल्या उत्पन्नाचा व उत्पादनक्षमतेचा बराचसा हिस्सा लष्करी गरजांच्या व प्रतिहल्ल्याच्या साधनांच्या निर्मितीसाठी खर्च करावा लागतो. केवळ स्वतःच्या सुरक्षिततेसाठीच नव्हे तर समाजवादी

जगासाठी व तिसऱ्या (असंलग्न) जगासाठी देखील. इतर अनेक विकसनशील देशांप्रमाणेच आपण भारतीय देखील आज अनिच्छेने शस्त्रास्त्रस्पर्धेच्या जाळचामध्ये ओढले जात आहोत. पृथ्वी आणि त्यावरील सबंध मानवसमाज यांच्या डोक्यावर आज अण्वस्त्रयुद्धाचे ढग जमू लागलेले आहेत. या ग्रहाला सर्वनाशापासून वाचविण्यासाठी पृथ्वीवरील जीवसृष्टी जिवंत ठेवण्यासाठी आणि समग्र मानवसमुदायाला अधिक चांगले जीवन उपलब्ध करून देण्यासाठी अण्वस्त्रयुद्धापासून त्यांचे संरक्षण करणे यासाठी चालू असलेला शांतता आणि निःशस्त्रीकरणाचा लढा ही समस्या अव्वल महत्त्वाची समस्या झालेली आहे. क्रांतीनंतर जो जाहीरनामा घोषित करण्यात आला होता त्यातली पहिली घोषणा जी शांततेची घोषणा होती ती काही केवळ तोंडदेखली घोषणा नव्हती तर अव्वल महत्त्वाची घोषणा होती.

आज संरक्षणासाठी शस्त्रास्त्रनिर्मिती करण्याकरिता जी उत्पादनक्षमता आणि उत्पादनसाधने खर्ची टाकावी लागतात त्यांचा वापर जर सोविएत नागरिकांच्या हितासाठी करता आला असता आणि वैज्ञानिक व तंत्रशास्त्रीय क्रांतीमुळे लागत असलेल्या नवनव्या शोधांचा पुरेपूर वापर सामाजिकदृष्टचा उपयुक्त उत्पादनांसाठी करता आला असता तर समाजवादाचा विकास किती जलदगतीने झाला असता याची कल्पना करणे इतके कठीण आहे काय? आणि दारिद्रच, उपासमार अन् निरक्षरता यांच्याविरुद्ध झुंज देत असणाऱ्या विकसनशील देशांच्या दृष्टीने ते वरदान ठरले नसते का?

या संदर्भात खाडिलकरांच्या लेखांकडे वळल्यानंतर आपण असंही म्हणू शकतो की, त्यांनी हचा साऱ्या प्रश्नासंबंधी लिहिले नाही—कारण त्यांच्या विषय-मर्यादेबाहेरचा तो विषय होता. पण एवढे निश्चित की, सोविएत संघराज्यातून विशेषतः ज्या देशाला युद्धांमुळे सर्वात जास्त हानी पत्करावी लागली अशा देशातून फेरफटका मारताना शांतता आणि शांततापूर्ण निर्मिती-बाबत सोविएत जनतेला वाटणारी कळकळ पाहून कुणीही भारावून गेल्याखेरीज राहत नाही. शांतता आणि विकास यांच्यातील अतूट सांगड कुणाच्याही ध्यानात आल्यावाचून राहत नाही. सोविएत संघराज्याने आजवर केलेली प्रगती आणि तिची अंगभूत क्षमता अन् पुढील विकास यांची मोजदाद करताना जागतिक तणावाच्या, युद्ध आणि शांततेच्या, आंतरराष्ट्रीय संदर्भाकडे जर कुणाचे दुर्लक्ष झाले तर ते समर्थनीय ठरू शकणार नाही. क्रांतीनंतरच्या सुरुवातीच्या कालखंडात साम्राज्यवादी हस्तक्षेप, यादवी युद्ध व फॅसिझमविरोधी युद्ध यांच्या हल्ल्यांमुळे झालेल्या विनाशाचा फटका सोविएत संघराज्याला बसल्याची नोंद घेणाऱ्या खाडिलकरांनी सोविएत संघराज्यातील

समाजवादी विकासाच्या भवितव्याबाबत बोलताना जर ह्या घटकांचाही विचार केला असता तर ते अधिक बरे झाले असते.

"प्रगत समाजवादा"चे गतिशास्त्र हे असे आहे. त्याचे अंतर्भूत चैतन्य हे असे आहे, की रेगनच्या आक्रमक धोरणांपायी आंतरराष्ट्रीय परिस्थिती फार मोठ्या प्रमाणावर खालावलेली असली तरी सोविएत संघराज्यामध्ये दिनांक १ डिसेंबर १९८३ पासून अनेक उपभोग्य वस्तूंच्या किंमती उतरविणे त्यांना शक्य झालेले आहे. खाडिलकर यांच्या निरीक्षणास, एका दृष्टीने पुष्टी देणारी अशीच ही घटना असल्याकारणाने अगदी अलिकडच्या काही निर्णयांचा उल्लेख वाचकांच्या माहितीसाठी मी केला तर तो अप्रस्तुत होणार नाही, असे मला वाटते. कारण खाडिलकर परत आल्यानंतर व त्यांचे लेख प्रसिद्ध झाल्यानंतर हे निर्णय घोषित झालेले आहेत.

किरकोळ वस्तूंच्या किंमतींमध्ये वार्षिक २,६०० दशलक्ष रुबल्सनी कपात करण्यात आलेली आहे. म्हणजे जवळजवळ ३,४०० कोटी रुपये. याचा अर्थ सोविएत ग्राहकांच्या बचतीमध्ये तेवढी वाढ झाली. सरकारी ग्राहकमूल्य समितीचे अध्यक्ष ग्लुश्कोव्ह यांनी ही कपात जाहीर करताना सांगितले की, गेल्या २० वर्षांमध्ये जनतेचे खरे उत्पन्न जवळ जवळ दुपटीहून अधिक इतके वाढले आहे. सामाजिक सुरक्षा सुविधांमध्येही फार मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यात आली आहे आणि जवळजवळ ३७,००० दशलक्ष रुबल्स (सुमारे ४८,००० कोटी रुपये) इतक्या रकमेची आता पेन्शन निधीसाठी तरतूद करण्यात आली आहे.

"सर्व सोविएत जनतेला शाळा, उच्चशिक्षणसंस्था, हॉस्पिटले, वाहचरुग्णसेवा आणि इतर शैक्षणिक, सांस्कृतिक - शैक्षणिक, वैद्यकीय आणि क्रीडाविषयक संस्थांचा विनामूल्य लाभ घेता येतो. सार्वजनिक उपभोग - निधीमधून या साऱ्या सुविधांचा खर्च चालतो. या निधीमधून जनतेला मिळणाऱ्या वेतन आणि अन्य लाभाची रक्कम १९८२ मध्ये १,२८,००० दशलक्ष रुबल्स (सुमारे १,६६,००० कोटी रुपये) इतकी होती. म्हणजेच दरडोई जवळजवळ ४७० रुबल्स (६,१०० रुपये) होती.

"१९७० पासून देशामध्ये जवळजवळ १३०० दशलक्ष चौरसमीटर जमिनीवर राहती घरे उभारण्यात आली आहेत. सध्या नागरी लोकसंख्येपैकी जवळजवळ ८० टक्के लोक सर्व सोयींनी सुसज्ज अशा घरांमध्ये राहतात व त्यांची एकूण आखणी आणि सुविधा यांच्यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यात आल्या आहेत.

घरभाडे, वाहतुकीचे दर, सार्वजनिक सुविधांच्या वापराचे दर आणि दैनंदिन सेवांचे दर कमीत कमी पातळीवर ठेवण्यात आले आहेत आणि

लोकसंख्येच्या सर्व विभागांना ते परवडणारे असेच आहेत. या सेवासुविधांसाठी प्रत्यक्षात लागणाऱ्या खर्चापैकी ७० टक्के रक्कम म्हणजे ८००० दशलक्ष बल्स (१०,००० कोटी रुपये) पेक्षा अधिक एवढी रक्कम दरसाल सार्वजनिक उपभोग निधीमधून सरकारतर्फे भरण्यात येते.

मूलभूत गरजेच्या पदार्थांच्या किंमती स्थीर असतात. पाव आणि बेकरी यातून निर्माण होणाऱ्या पदार्थांच्या किंमती १९५४ च्या पातळीवर आहेत. मांस आणि दुग्धजन्य पदार्थांच्या किंमती गेल्या २१ वर्षांत म्हणजे १९६२ पासून बदललेल्या नाहीत. काही विशिष्ट प्रकारच्या वस्तूंच्या एकूण किंमतींमध्ये गेल्या २८ वर्षांत केवळ ९ टक्के वाढ झाली आहे. परंतु त्याचबरोबर त्याच कालावधीमध्ये वेतनामध्ये १५० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

(४) पूर्व-सोविएत मध्य-आशियाई देशांमधील 'चमत्कार'

मध्य आशियामध्ये सोविएत क्रांतीने घडवून आणलेले दूरगामी अन् मूलगामी बदल पाहून खाडिलकर तर अत्यंत भारावून गेलेले दिसतात. ज्या तीन मध्य-आशियाई प्रजासत्ताकांना त्यांनी भेटी दिल्या त्यांच्या वर्णनावरून हे दिसून येते. एकेकाळी रशियाच्या झारशाही राजवटीमध्ये हा भूप्रदेश अज्ञानांधाकाराच्या व मध्ययुगीन पुराणमतवादाच्या गर्तेत पार बुडालेला होता. तीन युद्धखोर खानांच्या अधिपत्याखाली येथील मुस्लीम जनसमुदाय मुल्ला-मौलवींच्या पूर्णपणे अंकीत होते. हया विस्तीर्ण भूप्रदेशामध्ये १०० टक्के निरक्षरता होती. स्त्रियांवर बुरखा घालण्याची सक्ती होती व त्या घरांमध्ये बंदिस्त होत्या. विस्तीर्ण भूभाग ओसाड वाळवंट होते. दारिद्रय अन् रोगराई यांच्याशी जनसामान्यांचे जीवन निगडीत होते. लुटारू अन दरोडेखोरांच्या या प्रदेशावर सतत टोळधाडी येत असत. तथापि, हया भूप्रदेशाशी आपले ऐतिहासिक लागेबांधे आहेत. तैमूरलंग आणि बाबर यांच्या स्वाऱ्या येथूनच आपल्या भूमीवर चाल करुन येत व आपल्या इतिहासाच्या विकासक्रमाला कलाटणी देत. आज काही दशकांच्या कालावधीत हया ठिकाणी संपूर्ण परिवर्तन घडवून आणलेले आपणास पाहावयास मिळते.

मुल्लामौलवी, आणि अमीरांचे प्रभुत्व येथे संपुष्टात आलेले आहे. जेथे १०० टक्के निरक्षरता होती तेथे आज १०० टक्के साक्षरता आढळून येते. जिथे लीपी नव्हती तेथे आज वाङ्मय बहरलेले आढळून येते. स्त्रियांची सर्वार्थांनी मुक्तता झालेली आहे. त्यांनी बुरखा झुगारुन दिला आहे. त्या उच्च, शिक्षण घेत आहेत आणि डॉक्टर, शिक्षिका, भूगर्भशास्त्रज्ञ, कलाकार, पक्षनेत्या, व्यवस्थापक इत्यादि नात्यांनी प्रत्येक क्षेत्रात त्या पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकारासाठी स्पर्धा करीत आहेत. पाण्याच्या एका थेंबासाठी जेथे रक्ताचे पाट वाहत तेथे हजारो किलोमीटर्सपर्यंत वाहणारे पाण्याचे कालवे वाहताना आढळून येतात. एकेकाळी वैराण वाळवंट असलेल्या हया प्रदेशात विस्तीर्ण प्रदेशावर हिरवीगार वृक्षराजी आढळून येते. अत्याधुनिक तंत्रशास्त्रावर आधारित असे मोठमोठे

औद्योगिक कारखाने येथे उभारलेले आहेत. एकेकाळी भटके आणि मेंढपाळ असलेल्यांची मुले अन नातवंडे आता अत्याधुनिक यंत्रे चालवितात. शतकांच्या जुन्यापुराण्या वस्त्या म्हणजे अक्षरशः मातीची खुराडी होती. अन वाजूला नजरेत भरणाऱ्या मशिदी अन दर्गे. त्यांची नावे आज इतिहासजमा झालीत. अन् त्या ठिकाणी आता अत्याधुनिक शहरे वसलेली आहेत. तेथे उद्याने, वस्तुसंग्रहालये, अत्याधुनिक राहती घरे, दुतर्फा वृक्षराजी असलेले प्रशस्त रस्ते, विज्ञान आणि कलांच्या शिक्षणसंस्था, ग्रंथालये आणि सांस्कृतिक सभागृहे इत्यादि आढळतात. मैदानांमध्ये ड्रॉइंग बोर्डवर रेखाटलेले, निसर्गाचे परिवर्तन घडवून आणणारे आणि त्याचे लाभ समाजाला मिळवून देणारे महत्त्वकांक्षी प्रकल्प आढळतात. ते प्रकल्प प्रत्यक्षात अवतरण्यात दिरंगाई होण्याला काही कारण झालंच तर ते एवढंच की त्या प्रकल्पाचे नैसर्गिक समतोलावर काय परिणाम होतील याच्या उत्तराचा शोध चालू असेल. खाडिलकरांनी हचा साऱ्या गोष्टींची नोंद घेतलेली आहे आणि पुढे अप्रतिम उपहासाने ते म्हणतात की भारतात सध्या अस्तित्वांत असलेल्या परिस्थितीत असा एखादा प्रकल्प रेखाटण्यात आलाच तर पावलोपावली त्यात खाजगी हितसंबंधी अन परस्परविरोधी दावेदार अडथळे आणल्याखेरीज राहणार नाहीत. मध्य आशियात वाळवंटातून कालवे वाहतात. अन नद्यांचे प्रवाह माणसांच्या भल्यासाठी वळविण्यात येतात. याउलट आपल्याकडे, असले प्रकल्प कागदावरच धूळ खात पडून राहतात अन गंगाजल कुंभातच बंदिस्त राहते अन त्याच्या दर्शनानेच लोक पापमुक्त होताहेत.

धर्माला त्याची जागा दाखवून देण्यात आली असून धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक खाजगी बाब वनलेली आहे. मशिदी कायम आहेत अन ती ऐतिहासिक स्मारके बनलेली आहेत. इस्लामी धर्म–संमिती मशिदी अन मदरसांची अन्य धार्मिक संस्थांची व्यवस्था पाहते. खाडिलकरांनी याचीदेखील नोंद घेतली आहे की, सर्व मुल्ला-मौलवी होऊ इच्छिणाऱ्यांना धार्मिक प्रशिक्षणावरोबरच तत्त्वज्ञान, इतिहास, भूगोल, रशियन भाषा आणि अन्य विषयांचा अभ्यासक्रम देखील पूर्ण करावा लागतो. त्यामुळे त्यांना आधुनिक दृष्टिकोन प्राप्त होतो. एका मुल्लाने त्यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले, "सोविएत संघराज्यामध्ये धर्म हा फक्त घर आणि मशिदींपुरता मर्यादित आहे. सत्ता ही कामगार-वर्गाच्या हाती आहे आणि मालकी (सामाजिक उत्पादन साधनांची) राज्याची म्हणजे समग्र समाजाची आहे. थोडक्यात म्हणजे, कम्युनिझमच्या दिशेने प्रगती करण्याच्या मार्गामध्ये धर्म आडवा येऊ शकत नाही.

ताश्कंदचे सविस्तर वर्णन करताना खाडिलकर सांगतात की, १९६६ च्या भूकपानंतर हे शहर अक्षरशः जमीनदोस्त झाले होते. पण ते पुन्हा

उभारण्यात आले. पण या खेपेस स्थापत्यशास्त्रातील अगदी अलिकडच्या संशोधनाचा वापर करून त्यांची अशा तऱ्हेने उभारणी करण्यात आली की संभाव्य भूकंपनापासून त्याला धोका पोहोचू नये. सोविएत साम्यकुलातील प्रत्येक प्रजासत्ताकाकडून ह्या शहराच्या पुनर्उभारणीसाठी मदतीचा पूर लोटला. त्यामुळे पुनर्स्थापित ताश्कंद म्हणजे सोविएत संघराज्याच्या सामुदायिक इच्छाशक्तीचे अन् परिश्रमशीलतेचे स्मारक बनलेले आहे. "राष्ट्रीय एकात्मता" म्हणतात ती ही, साक्षात जीवनातली एकात्मता! आपण नेहमी ऐकतो तसली केवळ बोलण्यातली एकात्मता नव्हे !

ह्या "मध्य आशियातील चमत्कारा"च्या मुळातली कारणमीमांसा करतांना मात्र खाडिलकर गडबडतात अन् गोंधळतात. ह्या विशिष्ट विभागातील लेखांची शीर्षके पाहिली तरी त्यातून परिवर्तन प्रक्रियेबाबतची त्यांची समज आणि पूर्वग्रहदूषित दृष्टी उघड होते. उदाहरणार्थ, "रशिया आणि इस्लामी तलवार." "इस्लामी धर्मवेड नष्ट केले" इ.

इराण, अरब दुनिया, पाकिस्तान आणि बांगला देश यांच्याप्रमाणे सोविएत मध्य - आशियाई प्रजासत्ताके ही इस्लामी राज्ये नाहीत याबद्दल त्यांना विशेष समाधान वाटते. नाहीतर "पान - इस्लामवाद" आणि "हिरवा चाँद" यांचा भारताला फार मोठा धोका निर्माण झाला असता. आणि याच दृष्टिकोनातून अफगाणिस्तानमध्ये रशियन लष्कराच्या उपस्थितीचे खाडिलकर स्वागत करतात. पण त्या पाठिंब्याची त्यांची स्वतःची अशी वेगळीच कारणे आहेत. त्यांच्या मते, यामुळे इस्लामी धर्मवेडाला आवर घातला जाईल, खरीखुरी प्रगती होईल आणि झिया राजवटीकडून भारतावर होणाऱ्या संभाव्य हल्ल्यांची शक्यता संपुष्टात येईल.

"व्यक्ती ज्या समाजात जगते, वाढते तशीच तिची जाणीव बनते" असं म्हणतात. या बाबतीत ज्या विशिष्ट हिंदू सामाजिक वातावरणात खाडिलकर वाढले त्यातच त्यांचे हिंदू मन घडले आणि म्हणून वस्तुस्थितीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही तसाच बनला. हे जरी खरे असले आणि सोविएत मध्य-आशियाई राष्ट्रे आणि अफगाणिस्तानबाबतचा खाडिलकरांचा दृष्टिकोन, कितीही विकृत असला तरी देखील त्यांच्याशी रा. स्व. संघ - भा. ज. पक्षासारखे "हिंदू राष्ट्रा"चे पुरस्कर्ते, सहमत होणार नाहीत. कारण ते लोक संपूर्णतः साम्राज्यशाहीधार्जिणे आणि कट्टर सोविएतविरोधी आहेत.

"मध्य - आशियाई चमत्कारा" मागील कारणमीमांसा करताना झालेला खाडिलकरांचा गोंधळ, सोविएत नेते शराफ राशिदेव आणि चेर्नेन्को यांची त्यांनी जी वचने उधृत केलीत त्यावरूनच दिसून येतो. त्याबाबत सोविएत नेत्यांच्या म्हणण्यानुसार, हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी कठोरपणे, चिका-

टीने आणि चिवटपणाने सर्वांगीण लढा द्यावा लागला. बिकट वाटेवरून वाटचाल करावी लागली. परिश्रमपूर्वक शैक्षणिक आणि विकासाचे कार्यक्रम अंमलात आणावे लागले तेव्हाच कुठे या मध्ययुगीन, जुलमी, सरंजामी, धर्मांध समाजरचनेचे रुपांतर एका अत्याधुनिक समाजवादी समाजरचनेमध्ये झाले. या प्रक्रियेमध्ये, हजारो कम्युनिस्टांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. ज्या स्त्रियांनी बुरखा झुगारून देण्यात पुढाकार घेतला त्यांना दगडांनी ठेचून मारण्यात आले. त्यांची खांडोळी करण्यात आली.

परंतु याच्यामागे "दडलेले सत्य" जरी व्यक्त झालेले नसले तरी खाडिलकर असा अंदाज बांधतात की सोविएत नेत्यांनी जरी तसे म्हटले नाही तरी देखील कम्युनिस्टांनी अनेक मुल्ला - मौलवींना व धर्मवेडचांना हे परिवर्तन घड़वून आणण्यासाठी कंठस्नान घातले असणारच. यावरून उघडच दिसून येते की, क्रांती एकदा घडून आली की तिचा प्रगतीचा झपाटा किती सामर्थ्यशाली असतो याची पूर्ण जाण खाडिलकरांना नाही. १९१७ मधील क्रांतीचा, रशियातील युरोपीय भागातील विजयाचा, शतकांनुशतके दडपल्या गेलेल्या अन दैन्यावस्थेतल्या, पौर्वात्य जनतेवर केवढा जबरदस्त प्रभाव पडला होता त्याचे मूल्यमापन खाडिलकर अचूकपणे करू शकलेले नाहीत. काल-परवापर्यंत खिवा, बोखारा आणि तुर्कस्तानी खानांच्या पायाखाली कण्हत-कुथत जगणाऱ्या व मुल्ला - मौलवींच्या प्रभावाखाली असणाऱ्या मुस्लीम जनसमुदायांना परिवर्तनाच्या झंझावाताने झपाटून टाकले होते. बिजलीच्या झगझगाटाने युगानुयुगांच्या अंधःकाराचा पडदा फाडून टाकला. आपल्या रशियन बांधवांच्या (त्या काळातही त्या प्रदेशामध्ये ते कामे करीतच होते.) हातात हात घालून, स्थानिक मुस्लीम कामगारांनी आणि गरीब किसानांनी क्रांतीचे निशाण हाती घेतले. प्रतिक्रांतिकारक शक्ती (ज्यात धर्मवेडे मुल्ला-मौलवी देखील मोठ्या-प्रमाणावर होते.) अमीर, सरंजामदार आणि पिळणूक करणारे इतर यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यांनी कंठरवाने प्रचारी घोषणा करून मागासलेल्या जनसमुदायांना फसविण्याचा व "धर्मविरोधी बोल्शेविकां"च्या विरुद्ध भडकविण्याचा जिवापाड प्रयत्न केला. परंतु खाडिलकर यांनी स्वतःच नोंद केल्याप्रमाणे नोव्हेंबर १९१९ मध्ये खिवा खानाच्या सरंजामी प्रतिगामी सैन्याचा लाल सेनेने निःपात केला आणि लवकरच कामगार–किसानांच्या लाल सेनेने केलेल्या ४ दिवसांच्या मोहिमेनंतर बोखारा अमीरात कोसळून पडली. मुस्लीम गरीब जनता क्रांतीच्या बाजूने निर्धारपूर्वक खडी राहिल्याखेरीज हे कधी तरी शक्य झाले असते का? म्हणून तिथे जे घडले ते म्हणजे "क्रांती विरुद्ध प्रतिक्रांती." क्रांतीच्या शक्तींनी प्रतिक्रांतीच्या शक्तींचा पाडाव केला. आपले बुरखे झुगारून देण्याचे अन् स्वातंत्र्य घोषित करण्याचे स्फुरण स्त्रियांना

लाभले ते त्यामुळे. त्यानंतर मध्य - आशियाई जनतेला (तुर्कमान, उझबेक, ताजिक, कझाग, किर्गीझ) राष्ट्रीय स्वायत्तता, समाजवादी औद्योगिकीकरण, सांस्कृतिक क्रांती (निरक्षरतेचे निर्मूलन, स्त्रियांची मुक्तता, राष्ट्रभाषची व राष्ट्रीय बुद्धिजीवीवर्गाची निर्मिती, आधुनिक वैज्ञानिक शिक्षण आणि राष्ट्रीय व समाजवादी संस्कृतीचा फुलोरा इ.), सरंजामदारांच्या जमिनींचे गरीब किसानांना वाटप, आणि त्यानंतर शेतीचे सामुदायिकीकरण इ. अशा चौफेर मार्गांनी क्रांती दृढमूल करण्यात आली. नवजीवनाच्या उभारणीमध्ये तेच जनसमूह अधिकाधिक क्रियाशील आणि समरस झाले होते. त्याखेरीज हे परिवर्तन घडून येऊच शकले नसते. निळूभाऊ खाडिलकरांना हचा प्रक्रियेची जाण असल्याचे दर्शविणारी काही वाक्ये अधूनमधून आढळतात. तरीसुद्धा त्यावर हिंदू पंथप्रवृत्तीचे आवरणही घट्ट चिकटून बसल्याचे "इस्लामची पकड छिन्नविच्छिन्न झाली" आणि "इस्लामी धर्मवेड नेस्तनाबूत झाले" अशा वाक्यांतून दिसून येते. "एका बाजूला कडव्या कार्यकर्त्यांचा प्रचार, दुसऱ्या बाजूला सत्तेचा वापर, आणि त्याच वेळी गरिबांपर्यंत पोचणारा प्रचार अशा तऱ्हेने तीन दिशांनी हल्ला चढविण्यात आला आणि अशा तऱ्हेने हचा प्रजा-सत्ताकांना उर्वरित देशाच्या पातळीवर आणन ठेवण्यात आले." किंवा, "जर पक्ष मजबूत नसेल तर एकटा पुरोगामी हुकूमशहा काही करू शकणार नाही. तो लष्कराच्या जोरावर समाजाला दडपू शकेल पण बदलू शकणार नाही आणि त्यामुळे तोच एक दिवस उखडला जाईल. भारताच्या सातपट ज्या देशाचा विस्तार आहे अशा सोविएत युनियनमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे जाळे पसरले असल्याने आणि मार्क्स - लेनिनच्या विचारांनी कार्यकर्ते तितकेच कडवे बनले असल्यामुळे सरकारी पाठिंबा लाभताच लढा देऊन कायापालट होऊ शकला" असे जेव्हा खाडिलकर म्हणतात तेव्हा त्याचा अर्थ काय लावायचा?

अशा काही वचनांमधून त्यांची समज अचूक असल्याचे जाणवते. परंतु "ख्रिश्चन धर्म, इस्लाम आणि हिंदु धर्म" या शीर्षकाखालील आणि इतर काही अग्रलेखांमध्ये खाडिलकरांचा स्वतःचा धार्मिक पूर्वग्रह असल्याचे जाणवते. त्याबाबत सविस्तर चर्चा आपण पुढल्या विभागामध्ये करू.

खाडिलकरांना लागलेला "रशियाचा शोध" आणि सोविएत दौऱ्यातील त्यांचे अनुभव आणि त्याबाबत त्यांनी जे काय म्हटले आणि त्यातून ते जे काय शिकले त्याबाबत तूर्त एवढे पुरे. माझ्याविषयी बोलायचे तर मला हे कबूल केलेच पाहिजे की त्यांच्याइतके विविधांगी दर्शन मी घेऊ शकलो नसतो. मी फार तर काही नकारात्मक बाबी किंवा काही उणीवा पाहू शकलो असतो. ज्या खाडिलकरांच्या नजरेला कदाचित दिसल्या नसतील किंवा त्याबाबत त्यांनी लिहिलेही नसेल. पण मी "आदर्श समाजरचना" किंवा "सर्वगुण-

संपन्न माणूस" मात्र शोधू शकलो नसतो. पण या प्रश्नाच्या बुडाशी जाण्याचा मी प्रयत्न केला असता की, ह्या क्रांतिकारी प्रक्रियेमागील प्रेरक शक्ती कोणत्या? म्हणून, एक कम्युनिस्ट या नात्याने आमच्यावर जो आरोप करण्यात आलेला आहे, की सोविएत संघराज्य आणि समाजवादी समाजरचना याबद्दल काहीतरी अतिरंजित अवास्तव प्रतिमा उभी करण्याचा आम्ही प्रयत्न केला व भारतीय जनतेसमोर खोटे "स्वप्नरंजित चित्र" उभे केले किंवा ठाकरे म्हणतात त्याप्रमाणे दिशाभूल करणारा प्रचार आम्ही केला, तर हा आरोप मी कदापि मान्य करू शकणार नाही. खाडिलकर यांची तक्रार – जिला नंतर ठाकरे यांनी त्यांच्या विशिष्ठ भाषेमध्ये आरोपाचे स्वरूप दिले– की त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी जे पाहिले ते रशियासंबंधीचे सत्य आम्हाला कुणी कधी सांगितलेच नाही, तर हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. या विषयावर अनेक पुस्तके आणि लेख आजवर लिहिले गेलेले आहेत आणि ते सर्व काही भारतीय कम्युनिस्टांनी लिहिलेले नाहीत. एकाचा उल्लेख केला तरी पुरेसा आहे. १९३० साली गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेली "रशियाहून आलेली पत्रे" ही काही एका कवीची कल्पनेची भरारी नव्हती. तर जगासमोर उघडे केलेले ते वास्तव चित्रण होते. तेव्हा खाडिलकरांना जर कुणाला दोषी ठरवायचे असेल तर साम्राज्यवादी प्रचारमाध्यमांनी केलेल्या विकृतीकरणाला त्यांनी दोष द्यावा–तो अर्थात त्यांनी जाताजाता दिलेला आहेच. परंतु त्यांनी भारतीय कम्युनिस्टांना तरी निदान त्यांच्या माळेत गुंफू नये.

(५) खाडिलकरांनी मांडलेले प्रमुख सिद्धांत

सोविएत संघराज्यात समाजवादाने मिळविलेले यश प्रत्यक्ष पाहून लक्षात घेतल्यानंतर श्री. खाडिलकर काहीसे आश्चर्यकारक आणि विलक्षण चमत्कारिक विधान करतात, की सोविएत समाजवादी पद्धतीने मार्क्सवाद खोटा पाडला, मार्क्सने व्यक्त केलेले भविष्यकालावावतचे अंदाज आणि त्याने मांडलेले सिद्धांत चुकीचे आणि अव्यवहार्य असल्याचे सिद्ध केले. रशियन क्रांती आणि त्यानंतरच्या अनेक वर्षांतील प्रत्यक्ष व्यवहार पाहता रशियन समाजवादाने मार्क्सचे पोथीप्रामाण्य फेकून दिले आहे. मार्क्स आणि मार्क्सवाद आता तेथे नामस्मरणापुरताच उरलेला आहे. खाडिलकरांच्या एकूण वृत्तीचा सारांश सांगायचा तर तो एका घोषणेत व्यक्त होऊ शकेल. "मार्क्सवाद मृत झाला आहे ! समाजवाद चिरायु होवो !"

याची नोंद खरे तर, आम्ही गभीरपणे घेतली नसतीही. पण सोविएत वास्तवतेचे निरीक्षण करतांना ते कोणत्याही तऱ्हेने विरोधी अथवा पूर्वग्रहदूषित दृष्टीने निरिक्षण करीत नव्हते हे आम्ही वर म्हटलेच आहे. त्यांनी जे शेरे मारलेले आहेत ते गांभीर्यपूर्वक मारलेले आहेत. एवढेच नव्हे तर पुढे जाऊन मार्क्सवादाच्या "थडग्यावर" आपला स्वतःचा "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"चा इमला उभारण्यास ते निघालेले आहेत: "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" वरील त्यांच्या पहिल्याच अग्रलेखाचे शीर्षक आहे "मार्क्सने माणसापुढे हात टेकले."

खाडिलकर यांच्या अनेक मुद्यांमध्ये उघडपणे आढळून येणारी दोषस्थळे दाखवून देऊन वादस्पर्धेचे गुण मिळविण्यात आपण वेळ वाया दडवण्यांत अर्थ नाही. अथवा निरनिराळ्या ठिकाणी केलेल्या निरनिराळ्या विधानांमधील सहज नजरेत येण्यासारख्या विसंगतींकडे बोट दाखवीत बसण्याचीही गरज नाही.

तर त्याऐवजी, सोविएत प्रयोग आणि इतरत्र आलेले अनुभव लक्षात घेता मार्क्सवाद "थडग्यात गाडण्यात आला आहे" हा त्यांचा दृष्टिकोन मांडण्यासाठी त्यांनी जे सिद्धांत मांडले आहेत त्यापैकी तीन महत्त्वाचे सिद्धांत आपण निवडू या.

त्यांचा पहिला सिद्धांत असा आहे की, एकोणिसाव्या शतकामध्ये औद्योगिक क्रांती आणि भांडवलशाहीचा विकास यांचे केंद्रस्थान इंग्लंड हे होते. आणि त्यामुळे अर्थातच, तेथे निर्माण झालेला मजबूत, सुसंघटित आणि उत्कृष्ट असा कामगारवर्ग लक्षात घेता पहिली समाजवादी क्रांती इंग्लडमध्येच घडून येईल, असे मार्क्सने भाकित केले होते. परंतु त्याऐवजी प्रत्यक्षांत मार्क्सच्या मृत्यूनंतर ३४ वर्षे उलटून गेल्यानंतर "ज्या देशातील भांडवलदारी विकास इंग्लंड व जर्मनीच्या मानाने फार मागे पडलेला होता." अशा मागासलेल्या रशियामध्ये पहिली यशस्वी समाजवादी क्रांती घडून आली.

त्यांचा दुसरा सिद्धांत असा की मार्क्सने म्हटले होते की, "प्रत्येकास त्याच्या कामानुसार" जेथे मोबदला मिळतो अशा समाजवादाचे रुपांतर "प्रत्येकास त्याच्या गरजेनुसार" मोबदला मिळेल अशा "कम्युनिझम"मध्ये होईल. त्यानंतर शासनयंत्रणा नष्ट होईल. कारण माणूस आणि समाज एका परिपूर्ण अशा अवस्थेला पोहोचल्याकारणाने शासनयंत्रणेची गरजच उरणार नाही. खाडिलकर यांच्या मतानुसार सोविएत समाजवादी पद्धतीने असे दाखवून दिले आहे की, हे संपूर्णपणे अव्यवहार्य आहे. समाजवाद प्रस्थापित होईपर्यंत मार्क्सने भाकित केल्याप्रमाणे कमी-अधिक प्रमाणात घटना घडल्या हे जरी खरे असले तरी मार्क्सच्या "कम्युनिझम"च्या दिशेने पुढे वाटचाल होण्याची सुतराम शक्यता दिसत नाही. कम्युनिझमच्या दिशेने निघालेली रशियाच्या विकासाची गाडी समाजवादाच्या स्टेशनला पोहोचली आणि तेथेच कायमची थांबली. आणि हे आहे खाडिलकरांचे मत आणि ते स्वाभाविकही आहे. कम्युनिझमच्या अधिक वरच्या अवस्थेची संकल्पना ही दिशाभूल करणारी आहे. आणि आम्हा भारतीयांना आकर्षण जर कशाचे असेल तर प्रत्यक्ष समाजवादाचे. रशियाची वाटचाल, अगदी मंदगतीने का असेना पण कम्युनिझमच्या दिशेने चालू आहे काय ? त्याला खाडिलकर यांचे 'नाही' हेच निःसंदिग्ध उत्तर आहे.

त्यांचा तिसरा सिद्धांत असा आहे की, भविष्यकाळातील कम्युनिस्ट समाजाचे "गणित" मांडताना, मार्क्स या शास्त्रज्ञाने, 'माणूस' आणि त्याचा "अंगभूत स्वभाव" विचारातच घेतला नाही. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला भगवद् गीता सांगताना माणसाच्या सहा मानवी अंगभूत विकारांचा उहापोह केला आहे. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह हे सहा विकार अर्थात षडरिपू मानवी स्वभावात सदैव असतात. ते नियंत्रणात ठेवता येतात आणि ठेवले पाहिजेत. पण ते कधीही नष्ट करता येत नाहीत. कारण ते अंगभूत आहेत. सोविएत पद्धतीने त्यांचा वापर माणसाच्या आणि समाजाच्या हितासाठी करण्याच्या दृष्टीने त्यांना "काबूत" ठेवले आहे. पण तेवढेच, त्यापेक्षा अधिक काही नाही !

खाडिलकरांच्या ह्या सिद्धांतांचा आपण आता उहापोह करू.

मार्क्स हा असा एक शास्त्रज्ञ आणि विचारवंत होता की ज्याने अहोरात्र कष्ट करून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनासंबंधी नैसर्गिक आणि सामाजिक विज्ञानासंबंधी, समाजाच्या इतिहासपूर्व कालासंबंधी आणि इतिहासासंबंधी प्रत्येक अंगोपांगाच्या वास्तव घटनांची जंत्री केलेली होती आणि त्या सर्वांची उकल त्याच्या दृष्टीसमोर होत होती. गोळा केलेल्या त्या प्रचंड माहितीचे त्याने विश्लेषण केले आणि अविश्वसनीय असे काबाडकष्ट उपसून आणि अभ्यास करून त्यानें त्या विश्लेषणातून निष्कर्ष काढले. निसर्ग, सामाजिक विकास, इतिहास, तत्त्वज्ञान आणि त्यावर उभारलेला "इमला" इत्यादि सर्व क्षेत्रांमध्ये जे गतीचे नियम गतिमान असतात त्यावरील अज्ञानाची पुटे त्याच्या प्रतिभेने खुली केली. आपणासाठी एक वारसा ठेवून तो गेला – घटना समजून घेण्याची, ज्या क्रांतिकारी प्रक्रिया घडत असतात त्यांचे विश्लेषण करण्याची वैज्ञानिक पद्धती त्याने आपणाला दिली. आपल्या आयुष्याच्या कालखंडामध्ये जे सामाजिक परिवर्तन घडत असते त्यामध्ये "कृतीची दिशा दाखविणारे होकायंत्र" त्याने आपणासाठी ठेवले. तो कोणी ज्योतिषी नव्हता. मार्क्स या एकाच व्यक्तीमध्ये परिश्रम करणारा एक शास्त्रज्ञ आणि विचारवंत आणि क्रांतिकारक कृती करणारा एक अशा दोन व्यक्तिमत्वांचा मिलाफ झालेला होता. सिद्धांत आणि व्यवहार यांच्या एकरूपतेचा परमोच्च आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एकवटलेला होता. "आजवर जगाचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान्यांनी केला. पण प्रश्न आहे तो ते जग बदलण्याचा!" असे जे मार्क्सने म्हटले ते उगाच नव्हे!

भांडवलशाहीने आपल्या विकासाबरोबरच जन्माला घातलेल्या कामगारवर्गामध्ये मार्क्सच्या वैज्ञानिक दूरदृष्टीला, आधुनिक भांडवलशाहीचा कर्दनकाळ दिसला. पाश्चात्य राजधान्यांमध्ये भांडवलशाहीची वाढ झपाटचाने होत होती आणि त्याचवेळी प्रथमच नव्याने जन्मास आलेला कामगारवर्ग नुकताच कुठे आपल्या पहिल्यावहिल्या हालचाली करू लागला होता. अशा कालखंडामध्ये मार्क्स जीवन कंठीत होता. त्यामुळे त्याच्या दृष्टीसमोर एक प्रश्नचिन्ह कायम उभे असे– "भांडवलदारी पद्धतीच्या क्रांतिकारक नाशाची सुरुवात प्रथम कोण करील आणि मानवसमाजासमोर असलेल्या कम्युनिझमच्या भवितव्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गाकडे वाटचाल करण्यात अग्रेसर कोण असेल?"

हे खरेच, की सुरुवातीला त्याने ह्या आशाआकांक्षा इंग्लंडमधील कामगारवर्गावर केंद्रित केल्या. तथापि तसे करीत असताना आयर्लंडचा प्रश्न, हिंदुस्तानचा प्रश्न, ब्रिटनचे वासाहतिक धोरण आणि त्या सर्वांचा इंग्लंडच्या कामगारवर्गावर होणारा परिणाम लक्षात घेता त्याने त्या कामगारवर्गाच्या क्रांतिकारकतेविषयी शंका व्यक्त करण्यास सुरुवात केलेलीच होती. साम्राज्य

शाही ब्रिटनमध्ये "कामगारवर्गीय उमरावशाही"च्या उदयाची नोंद मार्क्सने घेतलेली होती. मार्क्सचा सहकारी, त्याचा जिगरदोस्त फरेडरिक एंगल्स याने १८९९ मध्ये लिहिले की, "सर्वांत उद्वेगजनक गोष्ट येथे (लंडनमध्ये) जर कोणती घडत असेल तर ती म्हणजे भांडवलदारी "प्रतिष्ठा" ही होय आणि जी कामगारांच्या रोमारोमामध्ये खोलवरपर्यंत भिनून गेली आहे.

खाडिलकरांनी कदाचित हे ऐकलेले नसेल, की मार्क्स आणि एंगल्स यांनीच आपल्या अखेरच्या दिवसांमध्ये, रशियातील सतत वाढत जाणाऱ्या सामाजिक चळवळीचा अभ्यास केल्यानंतर एवढेच नव्हे, तर तेथे घडणाऱ्या घटनांचा प्रत्यक्षपणे अधिक चांगल्या रीतीने त्याचा अभ्यास करता यावा या हेतूने रशियन भाषेचा अभ्यास सुरू केल्यानंतर जगाच्या त्या भागात खदखदत असलेल्या "एका अत्यंत महान सामाजिक क्रांती"विषयी भाष्य केले होते.

२७ सप्टेंबर १८७७ रोजी, म्हणजे निधनापूर्वी फक्त सहा महिने अगोदर, मार्क्सने उत्साहाने लिहिले होते की, "रशिया दीर्घकाळ उठावाच्या उंबरठ्यावर तिष्ठत आहे, त्याची सर्व गात्रे तयारीत आहेत.....प्रत्यक्ष उठाव Secundum artem (कलेच्या नियमांनुसार) होईल आणि एक सुंदर गोंगाट होईल!"....

त्याचप्रमाणे, त्याचा जीवनसाथी एंगल्स, ज्याची त्याच्या आंतरिक विचारांशी भागिदारी होती, त्याने ६ एप्रिल १८८७ रोजी एका पत्रात लिहिले होते, ". . . दुसऱ्या बाजूला असे भासते की रशियामध्ये अरिष्ट कोसळत आहे. . . . आणि एकदा का ती (क्रांती) रशियात उफाळली की, बस्स, मग पाहाच पुढे !"

तेव्हा मग प्रश्न असा पडतो की,–त्याच्या अखेरच्या दिवसांत त्याच्या अपेक्षेप्रमाणे इंग्लंडमध्ये क्रांती कधीच घडून आली नाही म्हणून वैफल्यग्रस्त होऊन पडलेला जो मार्क्स खाडिलकरांना दिसला, जो मार्क्स प्रत्यक्ष त्याच्या हयातीत "खोटा प्रेषित" किंवा "कृत्रिम शास्त्रज्ञ" असल्याचे सिद्ध झाले तो मार्क्स आहे तरी कोठे ?

आणि १९१७ च्या क्रांतीपूर्वी लेनिन यांनी मार्क्सच्या वरील विधानांकडे लक्ष वेधिले आणि त्याच्या विरोधकांना दिलेल्या सडतोड उत्तरात म्हटले,

"होय मार्क्स आणि एंगल्स यांनी क्रांतीच्या यशाची आकांक्षा बाळगल्यामुळे क्रांतीची समीपता ठरविताना अनेक चुका वारंवार केल्या असतील . . . पण अशा चुका . . . क्रांतिकारक विचारांच्या महामानवांच्या चुका, ज्यांनी क्षुद्र, सामान्य आणि क्षुल्लक कामे करणारा वर्ग म्हणून जगभर ओळखला जात असलेल्या कामगारवर्गाची पातळी उंचावण्याची आकांक्षा

बाळगली अशांच्या चुका हच्या, क्रांतिकारी दिखाऊपणा करणाऱ्या अन क्रांतिकारी लढ्यांच्या विफलतेचा, आणि प्रतिक्रांतिकारकांच्या 'घटनात्मक' स्वप्नरंजनाच्या आकर्षकतेचा गौरव करणाऱ्या, उद्घोष करणाऱ्या, त्याला उठाव देणाऱ्या सरकारी भाटांच्या, मवाळांच्या शहाणपणाच्या चुकांपेक्षा अधिक उदात्त आणि **ऐतिहासिकदृष्ट्या अधिक मौल्यवान आणि सार्थ असतात.**

"रशियाचा कामगारवर्ग आपले स्वातंत्र्य मिळवीलच पण त्याचबरोबर आपल्या क्रांतिकारक कृतीने युरोपला उत्तेजन देईल, मग त्या कृती चुकांनी भरलेल्या का असेनात. . . आणि घमेंडखोर आपल्या क्रांतिकारक कृतीच्या अचूकपणाविषयी किती का घमेंड करेनात."

आणि प्रत्यक्षात त्यांनी नेमके तेच केले ! मार्क्स-एंगल्स आणि लेनिन यांना जे वाटले नेमके तेच केले. इतिहासाने त्याची साक्ष नोंदविलेली आहे आणि सर्व जगाला ती माहीत आहे.

मार्क्सच्या विस्मयकारक शास्त्रीय परिश्रमांमुळे त्याला दूरदृष्टीचा लाभ झाला. सारे जग त्याच्या दृष्टिक्षेपात आले. त्याने इंग्लंड, आयर्लंड, भारत आणि इतर वसाहतींमधील विकासक्रमाची सूक्ष्म नोंद घेतली. त्याने प्रत्येक क्रांतिकारक कृतीच्या प्रत्येक राजकीय, सामाजिक, लष्करी अंगोपांगांचा तपशीलवार अभ्यास केला. त्याच्या जीवनकालात झालेल्या प्रत्येक युद्धाचा मग ते अमेरिकेचे यादवी युद्ध असो, १८५७ चा हिंदुस्थानी स्वातंत्र्य-संग्राम असो, फॅन्को-प्रशियन युद्ध असो वा पॅरिस कम्यूनचा उठाव आणि पराजय असो– त्या प्रत्येकाचा त्याने तपशीलवार अभ्यास केला. चीन, स्पेन आणि रशिया यांसारख्या दूरवरच्या देशांतील समकालीन घटनांचा अभ्यास केला. हच्या सर्व प्रश्नांसंबंधी त्याचे लिखाण म्हणजे इतिहासाचे, ऐतिहासिक भौतिकवादाची पद्धती लागू करण्याचे आदर्श पाठ आहेत. वास्तव घटनांमधून सामान्य विधानांपर्यंत तो जाई. काय असावयास हवे यासंबंधीच्या पूर्वसंकल्पित (स्वयंरचित) कल्पनांच्या आराखड्यांमध्ये वास्तव घटना ठाकून ठोकून बसविण्याचा तो कधी प्रयत्न करीत नसे.

कोठे आणि केव्हा एखादी क्रांतिकारक कृती घडण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याविषयीचे अंदाज किंवा मोजमाप घेण्यात चुका होऊ शकतात. अपेक्षा खोट्या देखील ठरू शकतात. पण म्हणून असे एक-दोन अंदाज चुकीचे ठरले म्हणून मार्क्सवादच फोल ठरतो असे म्हणणे हे धाष्टर्याचे ठरत नाही काय ? कोणतीही क्रांती काही कोणाच्या कोणत्याही पूर्वसंकल्पानुसार नियोजित वेळापत्रकानुसार किंवा क्रमानुसार घडत नसते आणि घडणार नाही. रशिया, चीन, विएतनाम किंवा क्यूबा कोणत्याही देशातील क्रांती का असेना. (आणि आपणास माहीतच आहे की, प्रत्येक देशातील क्रांती निरनिराळ्या

मार्गांनी होत असते) तरीदेखील मार्क्सचे मूलभूत सिद्धांत––म्हणजे, कामगार-वर्ग आणि त्याचा क्रांतिकारक, सुसंघटित अग्रदूत असा पक्ष यांची भूमिका, क्रांतिकारी शक्तींची म्हणजे कामगार, किसान आणि अन्य कष्टकरी जनता यांची युती, पिळणाऱ्या भांडवलदार-जमीनदारवर्गाचे सत्तेवरून उच्चाटण, आणि त्याच्या जागी कामगारवर्ग आणि त्याचे दोस्त यांच्या सत्तेची प्रतिष्ठापना, समाजवादी समाजरचणनेची उभारणी आणि साम्राज्यवाद्यांच्या पाठिंब्याने येणाऱ्या अंतर्गत वा बाह्य प्रतिक्रांतीचा मार्ग रोखून धरणे म्हणजेच क्रांती आणि तिचे लाभ यांचे संरक्षण करणे यासंबंधीचे मार्क्सचे सिद्धांत पूर्णपणे खरेच ठरलेले आहेत. ही कार्ये पार पाडताना चुका नव्हे, क्वचित हिमालया-एवढ्या मोठ्या चुका, होणारच नाहीत का? अशा चुका होणे शक्य आहे. त्याची किंमत क्रांतीला मोजावीच लागेल हे आपणास असख्य उदाहरणांवरून दिसून येऊ शकेल. पण त्याचा अर्थ "मार्क्सवाद" खोटा ठरला असा होऊ शकेल काय?

एवढे सारे झाले खाडिलकरांच्या पहिल्या सिद्धांतासंबंधी. त्यावरून फारतर एवढा निष्कर्ष काढता येईल की, मार्क्सच्या कार्याच्या आणि विचारांच्या ह्या अंगांची जाणीव त्यांना नसेल वा त्यांनी त्याचा पूर्ण अभ्यास केलेला नसेल. मार्क्सला खोटा सिद्ध करण्याची त्यांना फार घाई झाली म्हणून आमचा सल्ला असा की, कृपया मार्क्सला गाडून टाकण्याची किंवा बाद करून टाकण्याची, संशयास्पद किंवा वादग्रस्त पुराव्यांच्या किंवा केवळ अज्ञानाच्या पायावर मार्क्सला "गाडून" टाकण्याची किंवा नामशेष करण्याची इतकी घाई करू नका.



(६) ऑक्टोबर क्रांतीमुळे मार्क्स चुकीचा ठरला का?

सोविएत संघराज्यात समाजवादाच्या स्टेशनला आलेली गाडी कायमची थांबली आहे काय? आणि त्यावरून कम्युनिस्ट समाजरचनेच्या दिशेने ती पुढे जाईल हा मार्क्सचा सिद्धांत अव्यवहार्य असल्याचे सिद्ध होते काय? हा आता शेवट आला आहे आणि येथे आपण कायम थांबायचे आहे आणि प्राप्त परिस्थितीचा जास्तीत जास्त लाभ उठवायचा अशा निष्कर्षाला सोविएत संघराज्य आले आहे काय?

अजिबात नाही. आणि खाडिलकर आपल्या विधानांना पुष्टी देण्यासाठी स्वतः सोविएत नेत्यांच्या विधानांचा आधार वारंवार घेतात तेव्हा या विषयासंबंधी त्यांच्या विधानांपैकी काही विधानांची पुनरुक्ती जर मी केली तर मला वाटते, माझे वाचक मला क्षमा करतील.

सोविएत संघराज्य आता एका "विकसित अथवा प्रगत समाजवादा"च्या अवस्थेला आलेले आहे या गोष्टीकडे लक्ष वेधवून युरी आन्द्रोपोव यांनी आपल्या जुलै १९८३ च्या भाषणात म्हटले आहे की—

"आपण हे विसरता कामा नये की, आपण एका समाजवादी समाज-व्यवस्थेमध्ये जीवन जगत आहोत. या समाजव्यवस्थेचा विकास, समाजवादाच्या महत्त्वाच्या तत्त्वांनुसार सुसूत्र बनविणे अगत्याचे आहे. त्यात अर्थातच, "कामानुसार वाटप" हे तत्त्व अंतर्भूत आहेच. आपल्या देशात, प्रत्येकाला समान हक्क आणि समाजाबाबतची समान कर्तव्ये आहेत. भौतिक लाभ समानतेने उपभोगण्याच्या अर्थाने पूर्ण समानतेच्या दृष्टीने विचार करायचा तर हे कम्युनिझममध्येच शक्य होईल. परंतु **तत्पूर्वी आपणास बरेच अंतर कापावे लागेल.** आजच्यापुरते बोलायचे तर, सामाजिक उपभोग-निधीचा काही भाग वगळता, आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाला त्याच्या कामापैकी सामाजिकदृष्ट्या उपयुक्त अशा संख्यात्मक आणि गुणात्मक कामाच्या प्रमाणातच भौतिक फायद्यांचा उपभोग घेण्याचा हक्क आहे. आणि तेवढाच आहे. आणि याच ठिकाणी या तत्त्वांची काटेकोर मोजदाद आणि काटेकोर पालन महत्त्वाचे आहे." (जाड ठसा माझा—वर्धन).

त्याच भाषणात ते प्रांजळपणे मान्य करतात.

"अर्थात, या सर्वांचा, असा अर्थ नाही की, जी समाजरचना आपण निर्माण केली आहे ती सर्वांगपरिपूर्ण आहे. त्यात अनेक वास्तविक अडचणी आहेत. विकासाच्या सध्याच्या पातळीवर त्या अगदी स्वाभाविक आहेत. व्यक्तिवादी कारणांमुळे निर्माण झालेल्या त्रुटी त्यामध्ये आहेत. लोकांनी नेहमीच कौशल्याने व सुसंघटितपणे काम न केल्यामुळे त्या निर्माण झालेल्या आहेत. आणि सध्याच्या परिस्थितीमध्ये पक्षाचा कार्यक्रम हा सर्वप्रथम योजनाबद्ध विकसित समाजवादाच्या सर्वांगीण परिपूर्णतेचा कार्यक्रम असला पाहिजे आणि परिणामी, तो कम्युनिझमच्या दिशेने पुढील वाटचाल करणारा असला पाहिजे."

प्रत्यक्ष वास्तवतेपासून तुम्ही फार पुढे धावू शकत नाही यावर भर देताना आन्द्रोपोव, लेनिन यांच्या वचनाचे स्मरण करून देतात. "कोणत्याही तऱ्हेने अतिशयोक्ती न करता, संपूर्णपणे वस्तुनिष्ठतेने, वास्तव घटनांपासून दूर न जाता, आपण **काय आहे** (म्हणजे, प्रचलित अवस्था आणि तिची तत्त्वे) आणि **आपण काय करू इच्छितो** (म्हणजे कम्युनिझमचे उद्दिष्ट आणि त्या अवस्थेमध्ये कोणती मार्गदर्शक तत्त्वे प्रत्यक्षात परिणामकारक ठरू शकतात) ते कार्यक्रमामध्ये सांगितले पाहिजे.

(जाड ठसा आणि कंसातील स्पष्टीकरण माझे—बर्धन)

अशा तऱ्हेने खाडिलकर ज्यांची साक्ष पुढे आणतात ते सोविएत नेते आन्द्रोपोव यांच्या अधिकृत भाषणातील दोन सिद्धांत आपणासमोर येतात.

पहिला सिद्धांत असा की, अस्तित्वात असलेल्या अवस्थेचे जी 'विकसित समाजवादाची" अवस्था आहे, तिचे–प्रांजल मूल्यमापन. 'ते' करताना तिचे कल्पनारम्य चित्रण किंवा सजावट न करणे किंवा एखादी "परिपूर्ण" "व्यवस्था" म्हणून तिच्या कोणत्याही एखाद्या अंगाची अतिशयोक्तीपूर्ण रंगरंगोटी न करणे.

दुसरा सिद्धांत असा की, कम्युनिझमच्या दिशेने प्रगती करण्याचा दृढ निश्चय करणे. ते करीत असताना ते उद्दिष्ट दूरवर आहे याची आणि ते गाठण्यासाठी बराच लांबचा पल्ला गाठावा लागणार आहे याची जाणीव ठेवणे.

सोविएत नेते नम्रपणे केवळ "कम्युनिझमच्या भवितव्याला अंकुर" फुटत असल्याचा संदर्भ देतात, परंतु त्याच वेळी ते आत्मविश्वासपूर्वक सांगतात की, "हे अंकुर अधिक बळकट होत असल्याचे दिसून येते."

अत्यंत कठीण परंतु फलदायी अशा पंधरा वर्षांच्या कालखंडात ज्यांनी सोविएत संघराज्याचे नेतृत्व केले ते लिओनिद ब्रेझ्नेव यांनी आपल्या जीवनाच्या अखेरीस ज्या "**स्मृती**" लिहिल्या त्यांचा शेवट करताना तो खालील शब्दांत केला :

"आम्हाला कम्युनिस्ट म्हणतात कारण, आमच्या सर्व आशाआकांक्षा आणि कृतींमध्ये कम्युनिझमचे उद्दिष्ट स्पष्टपणे दिसू शकते . . .

"आम्हाला कम्युनिस्ट म्हणतात;

कारण आम्ही कम्युनिझमची उभारणी करीत आहोत.

"आम्हाला कम्युनिस्ट म्हणतात;

कारण आम्ही जनतेला कम्युनिझमच्या उद्दिष्टांकडे घेऊन जातो.

"आम्हाला कम्युनिस्ट म्हणतात; कारण आमच्या उदाहरणाद्वारे आम्ही सर्व देशोदेशींच्या जनतेला दाखवून देतो की हा मार्ग कम्युनिझमच्या दिशेने जातो."

ही काय केवळ पोकळ शद्वांची आतषबाजी आहे . . . ही काय एक जपमाळ आहे ? का तर ते स्वतःला कम्युनिस्ट पक्षाचे सभासद म्हणवतात आणि मार्क्सवाद–लेनिनवादावरची निष्ठा घोषित करतात म्हणून ? की कठोर वास्तवतेवर ते आधारलेले आहेत आणि भवितव्याबाबतचा दृढ निर्धार व्यक्त करणारे आहेत म्हणून ? सोविएतचे नेते हे स्वयंशील वास्तववादी नाहीत असं कुणीही म्हणू शकत नाही. स्वतः खाडिलकर देखील तसे म्हणत नाहीत, खरं तर ते त्यांच्या वास्तववादावर स्तुतिसुमनेच उधळतात.

मग इथे प्रश्न काय उरतो ?

प्रश्न असा आहे की, सध्याच्या "विकसित समाजवादाच्या अवस्थेपासून कम्युनिझमच्या उद्दिष्टाच्या दिशेने मार्ग तयार करण्यात येत आहे–तेदेखील ढगाआड लपलेल्या अनंत काळापलिकडील अनिश्चित भवितव्यात कुठे नाही तर पुढच्याच ऐतिहासिक कालखंडातच गाठले जाणार आहे. कम्युनिझम हे जसे त्यांना तसेच आम्हाला देखील केवळ एक भावनेवर आधारित अवास्तव स्वप्न वा कल्पनेचा खेळ नाही. ते एक प्रत्यक्षात उतरविता येणारे उद्दिष्ट आहे. तथापि, त्या उद्दिष्टाच्या दिशेने होणारी वाटचाल ही एका संपूर्ण कालखंडात चालणारी वाटचाल आहे.

अनेक दशके चालणाऱ्या हया कालावधीत उत्पादनशक्तींच्या विकासाची पातळी आणि म्हणूनच उत्पादन-संबंधांचे स्वरूप आणि अवस्था यांच्यात बरीच प्रगती व्हावी लागेल. स्वतः माणूस हाच प्रमुख उत्पादनशक्ती आहे, आणि त्याच्या धर्मकार्यामध्ये देखील गुणात्मक बदल घडून येणार आहे. त्या पायावर, उभारलेल्या इमल्याचे प्रतिबिंब जे समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगांमध्ये उमटलेले असेल ते मूलतः वेगळ्या प्रकारचे असेल. हया बदलांशी अतूटपणे निगडित असलेल्या जनतेच्या जाणिवेमध्येही बदल घडून येईल. पण हेच नेमके खाडिलकरांच्या अंतःचक्षूंसमोर आलेले नाही. एवढेच नव्हे, तर ते ते निःसंदिग्धपणे नाकारतात. त्यासबंधीचा विचार आपण पुढील लेखांकात करू.

खाडिलकरांच्या दुसऱ्या सिद्धांताविषयी एवढे पुरे.

कम्युनिस्टांच्या–निदान काही कम्युनिस्टांच्या लिखाणात आणि भाषणात–जर कम्युनिझमचे उद्दिष्ट हे काही फार दूरवरचे उद्दिष्ट नाही असे व्यक्त झालेले असेलच तर बदलत्या वास्तवाबाबतची ती त्यांची व्यक्तिनिष्ठ समज म्हणून ती मोडून काढायलाच हवी. वास्तवतेच्या पुढे धावणेही चूकच आहे.

उगवत्या सुप्रभातीबाबत अधीर आणि अति-उत्साही बनणे ही चूकच आहे. त्या अर्थाने पाहता खाडिलकरांनी अर्जुनाप्रमाणे जर

"व्योमिश्रेणेन वाक्येत बुद्धि मोहयसीव में ।"

(हे परमेश्वरा ! तुझ्या सत्कृद्दर्शनी परस्परविरोधी वचनांनी तू माझी विचारशक्ती संभ्रमित करीत आहेस). असे उद्‌गार काढले असते तर ते समजण्यासारखे आहे.

खाडिलकर यांच्या तिसऱ्या "षड्‌रिपु"संबंधीच्या आणि मानवाच्या अंगभूत स्वभावाच्या अपरिवर्तनशीलतेबाबतच्या सिद्धांताचे परीक्षण करण्यास सुरुवात करण्यापूर्वी आपण थोडेसे विषयांतर करू आणि मार्क्सवादाचा पाया खचतच चालला आहे असे जे आपल्या वाचकांना खाडिलकर भासवू पाहतात ते बरोबर आहे की नेमके उलटे घडत आहे त्याचा आपण विचार करूया.

(७) मार्क्सवाद-लेनिनवादाची विजयी आगेकूच....!

सोविएत संघराज्यातील एकूण परिस्थिती पाहून निळूभाऊ खाडिलकर अत्यंत प्रभावित झाले आणि सोविएत जनतेने केलेली प्रगती पाहून भारताला भेडसावणारे प्रश्न सोडविण्याचा मार्ग त्यांना गवसला ही घटनाच अतिशय बोलकी आहे. नव्याने उदयास आलेला आणि विकसित समाजवाद मरणोन्मुख भांडवलशाहीबरोबरच्या आर्थिक आणि सर्वांगीण स्पर्धेमध्ये विजयी झाल्याखेरीज राहणार नाही. सर्व देशांतील दलित आणि पिळल्या गेलेल्या कोटयवधी लोकांची मने हलवून सोडणारी आणि त्यांच्या आशाआकांक्षा उंचावणारी अशीच ती घटना असेल असे जे लेनिन यांनी विधान केले होते त्याची ही साक्ष आहे.

वादळात अथांग समुद्रावर हेलकावे खाणाऱ्या बोटीला दीपगृहाचा प्रकाशकिरण ज्याप्रमाणे मार्गदर्शन करतो त्याचप्रमाणे प्रत्यक्ष उदाहरणाची शक्ती शास्त्रीय समाजवादी विचारसरणीकडे सर्वसामान्य जनतेला आकर्षित करण्यास समर्थ ठरते. तशी "क्रांतीची निर्यात" ठरू शकत नाही. "सिद्धांताने एकदा का जनसामान्यांवर प्रभाव टाकला की, तावडतोब ती एक भौतिक शक्ती बनते" असे जे मार्क्सने म्हटले ते अगदी सार्थ आहे.

वास्तव घटनांबाबत अंध बनणेच ज्यांनी निवडलेले आहे त्यांचा अपवाद वगळता मार्क्सवादाने आज कोटयवधी जनतेला प्रभावित केले आहे. त्यांची मने जिंकली आहेत हे आज कोण नाकारू शकेल? मार्क्सवादाच्या निशाणाखाली कामगारवर्ग आणि त्याचे साथीदार यांच्या सामर्थ्याने जगाच्या लोकसंख्येपैकी एक-तृतीयांश लोकांच्या मनांवर विजय मिळविलेला आहे. मार्क्सवादाच्या बाजूने आणि विरोधी पुस्तकांचा आणि अन्य प्रचारसाहित्याचा हिमकडाच आज लोकांवर कोसळून पडत आहे. आपल्या डोळ्यांसमोर साक्षात आज दोन विचारसरणींचा जगत्व्यापी संघर्ष चालू असल्याचे आपण पाहत आहोत. एका बाजूला मार्क्सवाद आणि दुसऱ्या बाजूला मार्क्सवादाचे खंडन रकणारे लोक, जे कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने भांडवलदारी विचारसरणीपुढे शरणागती पत्करतात.

भांडवलदारी विचारसरणीच्या विरोधात क्रांतिकारी आणि मानवी असलेली कम्युनिस्ट विचारसरणी तिच्या सत्यतेमुळे आणि प्रामाणिकपणामुळे तिच्या समग्रतेमुळे आणि आशावादी स्वरुपामुळे कोटयवधी लोकांना आपल्या बाजूस वळवून घेत आहे. समाजातल्या कष्टकरी जनसमुदायांची ती विचारसरणी आहे आणि ती सतत उंचावंत आहे. ती अशा एका नव्या समाजाची विचारसरणी आहे की, जेथे पिळवणूक आणि अन्यायाला थारा नाही. राष्ट्रीय मुक्ती आणि सामाजिक प्रगतीसाठी जागतिक शांतता आणि सार्वत्रिक मैत्रीसाठी लढणाऱ्या लोकांची ती विचारसरणी आहे. जगातल्या सर्व खंडांतल्या, अगदी एकमेकांपासून दूर-दूर अंतरावर असलेल्या विएतनाम, अंगोला, एथिओपिया, निकाराग्वा, क्यूबा आणि अफगाणिस्तानसारख्या देशांतल्या लढवय्यांना तिने असीम त्यागाची प्रेरणा दिली आहे.

मार्क्सवादी आणि "सश्रद्ध" (येथे ख्रिश्चन धर्मगुरू आणि सामान्य ख्रिश्चन) यांनी अमेरिकन साम्राज्यवादी आणि त्यांचे स्थानिक "गोरिला" यांच्याविरुद्धच्या सार्वत्रिक लढ्यात एल् साल्वादोरमध्ये एकत्र रक्त सांडले.

गेल्या काही दशकांमध्ये जागतिक कम्युनिस्ट चळवळ सतत वाढत्या प्रमाणात कशी पसरत गेली ते खालील तक्त्यावरून नजर टाकल्यास लक्षात येऊ शकेल.

वर्ष	कम्युनिस्ट पक्ष अस्तित्वात असलेले देश	जगातील एकूण कम्युनिस्टांची संख्या
१९१७	१	०·४ दशलक्ष
१९६०	८७	३५·० "
१९८२	९५	७७·० "

१९१७ मध्ये रशियन क्रांती झाली त्यावेळी संख्या अवघी जेमतेम ४ लाख होती आणि तीदेखील फक्त एकाच देशात होती. १९८२ मध्ये जगातल्या ९५ देशांमध्ये ही चळवळ पसरलेली असून, त्या देशांतल्या कम्युनिस्ट पक्षांच्या नेतृत्वाखाली संघटित झालेल्या कम्युनिस्टांची संख्या ७ कोटी ७० लाख झाली. इतरत्रही मार्क्सवादी विचारसरणीला निष्ठा वाहिलेल्या गटांनी पक्ष म्हणून संघटित होण्याच्या दृष्टीने पहिली पावले उचललेली आहेत. मार्क्सवादी विचारसरणी मान्य असणाऱ्या परंतु कोणत्याही कम्युनिस्ट पक्षाचे सभासद नाहीत अशांची संख्या तर अगणित आहे. जगभर सर्वसाधारणतः हचा संख्येत वाढच होत असली तरी अर्थातच, एखाददुसऱ्या देशात या ना त्या कारणामुळे वाढत्या संख्येत घटदेखील होत असते.

भारताबाबत बोलायचे तर, आपणाला असे म्हणता येईल की, कम्युनिस्ट चळवळीत आणि कामगारवर्गामध्ये फूट पडली नसती तर कम्युनिस्ट चळवळीची वाढ झाली त्याहून अनेक पटींनी अधिक झाली असती. पण ते काहीही असो, हया सर्व वास्तव घटना लक्षात घेता मार्क्सवादाची घसरण चालू आहे, मार्क्सवाद खुद्द रशियामध्ये केव्हाच "गाडला" गेला आहे आणि आता जर काय उरले असेल तर काही मूठभर आंधळे पोथीनिष्ठ "मंत्रोच्चार" करून प्रत्यक्ष जीवनाने खोटे पाडलेल्या मार्क्सवादाच्या "पोथी"मध्ये तोंड खुपसून बसले आहेत असे म्हणता येईल काय ?

म्हणून "मार्क्स मेलेला नाही" असे आम्ही घोषित करू शकतो आणि एंगल्सच्या अमर शद्वांचा पुनरुच्चार करू शकतो : "त्याचे नाव युगानुयुगे अमर राहील !"

१९८३ हे मार्क्सच्या मृत्यूशताब्दीचे वर्ष. कुणा एकाने कुठेतरी म्हटले आहे–जरा खेदानेच–आजकाल तुम्हाला मार्क्सविषयी विचार केल्याखेरीज, बोलल्याखेरीज, लिहिल्याखेरीज, एक पाऊलही पुढे टाकता येणार नाही, मग जरी ते हजारदा त्याचे खंडन करण्यासाठी तरी का असेना ! खाडिलकर यांनी अगदी सुंदर भाषेत घोषित केले की, मार्क्सचे ग्रंथ अरबी समुद्रात फेकून दिले पाहिजेत !

हिंदुस्थानचा, इतिहास प्राचीन आणि अर्वाचीन समाज, हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीचे दूरगामी परिणाम आणि त्याचे भावी कालावर होणारे संभाव्य परिणाम, याबाबतच्या ज्ञानामध्ये मार्क्सने किती मोलाची भर टाकली होती त्याची जाणीव कदाचित श्री. खाडिलकरांना असेल–किंवा कदाचित नसेलही. त्यांनी याबाबत लिहिताना कशाच्या आधाराने लिहिले ते समजायला मार्ग नाही. पण त्यांना जर याची जाणीव झाली तर मग मला खात्री आहे की, ज्या भारतीय दृष्टिकोनाविषयी त्यांना आस्था वाटते त्या दृष्टिकोनातून तरी निदान मार्क्स आणि मार्क्सवादापासून फारकत घेण्यापूर्वी ते हजार वेळा विचार केल्याखेरीज राहणार नाहीत.

मार्क्सचे हिंदुस्थानसंबंधीचे लेख आणि त्याच्या इतर ग्रंथांतील आणि त्याच्या प्रचंड पत्रव्यवहारातील हिंदुस्थानसंबंधीचे संदर्भ हे त्याच्या अत्यंत सुपीक, समृद्ध आणि सूक्ष्म दृष्टीच्या लिखाणापैकी मानले जातात. "हिंदुस्थानच्या इतिहासावरील टिपणे" तयार करताना त्याने असंख्य मूळ कागदपत्रांचा अभ्यास केलेला होता. त्यात इ. स. ६६४ ते इ. स. १८५८ दरम्यानचे संदर्भ आहेत. त्यानंतर त्याचे (आणि त्याचा जिगरदोस्त एन्गल्स याचे) १८७५ च्या उठावाबाबतचे लेख त्या कालखंडामधील घटनांवर प्रकाश टाकण्याकरिता लिहिलेले होते.

हया लेखांमध्ये आणि भाष्यांमध्ये, हिंदुस्थानवर ब्रिटिशांनी मिळविलेला विजय आणि लादलेली गुलामगिरी, आणि ब्रिटिश राजवटीने हिंदुस्थानच्या केलेल्या पिळवणुकीच्या निरनिराळ्या पद्धती आणि प्रकार इत्यादींचे मार्क्सने सखोल शास्त्रशुद्ध विश्लेषण केलेले आहे. ब्रिटिश घुसखोरांचे लूटमारीचे धोरण आणि वासाहतिक पिळवणुकीच्या जंगली पद्धती या सर्वांमुळे १८५७ चा उठाव झाला; मग वरकरणी आणि तथाकथित कारणे काहीही असोत. मार्क्सने म्हटले आहे, "यापूर्वी, हिंदी सैन्यामध्ये बंडे झाली परंतु हा उठाव हा वैशिष्ट्यपूर्ण आणि प्राणघातक स्वरुपाचा होता . . . यावेळी प्रथमच हिंदू आणि मुसलमान यांनी आपापसातील परस्पर द्वेषभावाचा त्याग करून आपल्या समान सत्ताधीशांविरुद्ध ते एकत्र आले होते . . ." हया उठावाचे मार्क्सने 'राष्ट्रीय उठाव', 'एक पुनरुत्थान', 'ब्रिटिश राजवटीविरुद्धची हिंदुस्थानच्या जनतेची क्रांती' असे वर्णन केले आहे. हया उठावाची प्रचंड व्याप्ती आणि इंग्रजांच्या सैन्यासाठी अन्नपुरवठा आणि दळणवळणाची साधने मिळविताना नाकी नऊ आले ही वस्तुस्थिती लक्षात घेता हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांमध्ये इंग्रजांवद्दल वसत असलेली द्वेषभावना किती कडवी होती ते दिसून आले . . . इत्यादि— हे सारे लक्षात घेता मार्क्सची सहानुभूती कोणाच्या बाजूने होती ते अगदी सुरुवातीपासून स्पष्ट दिसून येते. अगदी आपल्या इतिहासातील हया घटनेच्या कालावधीत जे अत्याचार करण्यात आल्याचे म्हटले जाते आणि ज्याबाबत इंग्रज लेखकांनी मोठमोठे ग्रंथ लिहिले त्याबाबतदेखील मार्क्सने लंडन टाइम्सच्या मि. रसेल नामक वार्ताहराचे वचन उद्धृत केले आणि म्हटले, "वाहवा ! हिंदू आणि शिख हा ब्रिटिश सोजिराच्या अतुलनीय आदर्श योद्धचापेक्षा अधिक शिस्तीचा, कमी चोरटा, कमी लुटारू आहे ! परंतु आतापर्यंत आपण फक्त एखाददुसरा ब्रिटिश नोकरीत असलेला पाहिला. आता आपण ब्रिटिश सैन्याकडे एक दृष्टिक्षेप टाकूया, तो सामुदायिकपणे "लूटमार" करतो. आणि पुढे मार्क्स या "सामुदायिक लूटमारीच्या" घटना उद्धृत करतो.

निळूभाऊंना जर हया सर्व घटनांची माहिती असती तर त्यांना मार्क्सच्या **शास्त्रशुद्ध पद्धतीची** आणि १९ व्या शतकाच्या पाचव्या दशकापर्यंतच्या हिंदुस्थानच्या परिस्थितीसहित वस्तुस्थितीचे विश्लेषण करून ती जाणून घेण्यासाठी त्या पद्धतीचा वापर त्याने कसा केला याचे दर्शन निळूभाऊंना निश्चितच झाले असते हा विचार व्यक्त करणे मी टाळू शकत नाही. हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीने कशी विध्वंसक भूमिका बजावली, तिने हिंदुस्थानच्या समाजाच्या चौकटीची कशी मोडतोड केली, त्यानंतर त्या राजवटीची पुनर्निर्मितीची भूमिका पार पाडताना नव्या समाजाच्या भवितव्यासाठी भौतिक पाया घालण्याबाबत "अजाणता ती राजवट इतिहासाच्या हातातले

हत्यार" कशी बनली; आणि सरतेशेवटी, नवी समाजरचना उभारण्याकरिता साम्राज्यवादी सत्तेच्या जोखडाखालून हिंदुस्तानच्या जनतेने स्वतःला मुक्त करून घेण्याकरिता तिच्यामध्ये राजकीय परिवर्तन होणे जरूर आहे हा निष्कर्ष मार्क्सने काढला हे सारे जर निळूभाऊंना समजले असते तर मग त्यांना हेही समजले असते की मार्क्सवाद ही काही "पोथी" नाही तर ती एक पद्धती आहे, एक रस्ता आहे, कृतीचा एक मार्गदर्शक आहे. आणि त्याची त्यांनी कृतज्ञतापूर्वक नोंद घेतली असती हे मी खात्रीने सांगू शकतो.

अखेर मार्क्सनेच १८५३ मध्ये लिहिलेल्या हिंदुस्थानवरील लेखांमध्ये हिंदुस्थानच्या तथाकथित "आदर्श" ग्रामरचनेवर कोरडे ओढताना म्हटले होते की, ही रचना "वंशपरंपरागत श्रमविभागणीवर आधारलेली रचना असून त्यावरच हिंदुस्थानातील जातिव्यवस्था आधारलेली आहे. हिंदुस्थानच्या प्रगतीच्या आणि सामर्थ्यवाढीमधले हे निर्णायक स्वरूपाचे अडसर आहेत" आणि मार्क्सनेच, हिंदुस्थान हा "लूटमारीचे भक्ष्य बनणे अपरिहार्य" आहे याच्या कारणांवर अचूक बोट ठेवले पण त्याचवरोबर त्या "समृद्ध देशाला" आणि त्याच्या "हिंदुस्थानी स्वभावाला" प्रणाम केला. त्याचे शब्द असे आहेत :

"काहीही घडले तरी अखेरीस दीर्घकालाने का होईना, त्या महान आणि अद्‌भुतरम्य देशाचे पुनरुज्जीवन झालेले आपणास पाहावयास मिळाल्याखेरीज राहणार नाही. या देशातले शांत नेटिव लोक अगदी तळागाळाच्या वर्गातले देखील, इटालियन लोकांपेक्षा अधिक चतुर आणि सुरेख आहेत. त्यांच्या नम्रतेमध्ये देखील एक प्रकारचा उमदेपणा आहे. त्यांची स्वाभाविक नम्रता गृहित धरून सुद्धा. त्यांनी आपल्या शौर्याने ब्रिटिश अधिकाऱ्यांना गोंधळून टाकले. त्यांचा देश हा आपल्या भाषा, आपले धर्म, यांचे उगमस्थान आहे. जाट लोकांमध्ये आपल्याला प्राचीन जर्मन पाहावयास मिळतो आणि ब्राम्हणांमध्ये प्राचीन ग्रीक पाहावयास मिळतो."

हया भावना याहून अधिक चांगल्या शद्वांत कुणी व्यक्त करू शकेल काय ?

कितीही उतारे दिले तरी त्यांची गोडी अवीट आहे, तेव्हा येथेच थांबू या ! मार्क्सवाद जिवंत आहे आणि खरा आहे एवढेच दाखवून पुरेसे नाही तर ज्यांना भारताचा उज्जवल भविष्यकाळ घडविण्यासाठी त्याचा भूतकाळ जाणून घ्यायची इच्छा असेल अशा सर्व देशप्रेमी भारतीयांच्या दृष्टीने मार्क्सवादाला विशेषच महत्त्व आहे. याकडे आपण थोडे नतर वळू. परंतु दरम्यान आपण पूर्वीच्या विभागात उल्लेखिलेल्या खाडिलकरांच्या तिसऱ्या सिद्धांताचा ऊहापोह करू.

(८) "माणूस" अपरिवर्तनीय आहे काय ?

खाडिलकर यांचा **तिसरा सिद्धांत**—"षडरिपु" सिद्धांत. समाजवादाच्या विकासाची एक विशिष्ट अवस्था आणि त्या अवस्थेची "कम्युनिझम"च्या दिशेने पुढील प्रगती याबाबत खाडिलकर यांच्या विचारांचा हा "मूलभूत" गाभा आहे.

त्यांच्या दृष्टीने काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह हे षड्रिपू मानवी स्वभावाचे मूलभूत गुणधर्म आहेत आणि "प्रत्येकास त्याच्या गरजेप्रमाणे" ह्या तत्त्वावर आधारलेल्या वाटपपद्धतीला ते प्रतिबंध करतात. खाडिलकर असा दावा करतात की, माणसाचा हा "मूलभूत स्वभाव" मार्क्सने लक्षात घेतला नाही. आणि म्हणून मार्क्सवादाला त्याच्या कम्युनिस्ट समाजरचनेच्या ध्येयासहित माणसापुढे पराभव पत्करणे भाग आहे. माणूस–आजवर जसा होता तसाच आज आहे आणि तसाच पुढेही राहील.

असं जर आहे तर मग सोविएत समाजामध्ये समाजवाद प्रगती कसा करतो आणि पुढे कसा जातो ? समाजवादाची उभारणी तरी कशी होते ? खाडिलकर म्हणतात, शासनयंत्रणा आणि समाज यांच्या साधनांचा वापर करून काही प्रमाणात मानवी विकारांवर नियंत्रण ठेवून आणि समाजाच्या हितासाठी वापरून अधिक उत्पादन मिळविण्यासाठी व भौतिक प्रेरणांद्वारे लोकांना भौतिक साधनसंपत्तीचे आमीष दाखवून इ. मार्गांनी त्याच विकारांना समाजाच्या हितासाठी कामाला जुंपूनच केवळ हे करणे शक्य आहे.

मानवाच्या ह्या सार्वत्रिक मूलस्वभावाबाबतच्या आपल्या निरीक्षणाच्या समर्थनासाठी खाडिलकर प्राचीन ग्रंथांमधील उतारे उद्धृत करतात. परंतु येथे आम्ही असे सांगू धजतो की, या ग्रंथांचा त्यांनी लावलेला अन्वयार्थ हा एकतर्फी आणि अपुरा आहे.

आपले प्राचीन ऋषी-मुनी केवळ माणूस हा स्वतःपुरताच अशा दृष्टीने विचार करीत होते असे मानणे चुकीचे होईल. उलटपक्षी, ते माणूस –समाजाचा एक घटक–या दृष्टीनेच विचार करीत होते आणि तसे म्हणतही होते. काळाच्या ओघात त्यांच्या ह्या सामाजिक संबंधांना "वर्ण" आणि "जाती"च्या कोषामध्ये एक व्यक्ती म्हणून बंदिस्त करण्यात आले व कालां-

तराने समाजाची धारणा करणारा तो धर्म, अशा धर्माशी माणसाचा संबंध जोडण्यात आला आणि इथून वेगळा मार्ग सुरू झाला. धर्माचे उल्लंघन करणे हे पाप समजण्यात येऊ लागले आणि त्याला त्याबद्दल कठोर शिक्षा मुक्रर करण्यात आली. याउलट, समाजात प्रत्येक व्यक्तीला नेमून दिलेले कर्म करून धर्मपालन करणे हे पुण्य समजले जाऊ लागले आणि त्याबद्दल त्याला बक्षीस मिळण्याचा हक्क प्राप्त झाला. "कर्मसंहिता" त्याच सामाजिक संदर्भात अंमलात आली.

मानवाचे "मूलभूत" विकार आदि काळापासून त्याच्या वर्तणुकीवर परिणाम करतात आणि ते त्रिकालाबाधित आहेत असे आपल्या ग्रंथपुराणांनी मानले होते हे ऐतिहासिकदृष्ट्या खरे आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर द्यायचे तर महाभारताच्या "शांतिपर्वा"मध्ये भीष्माचार्यांनी दिलेल्या शिकवणुकीकडे लक्ष वेधणे उपयुक्त ठरेल. खाडिलकरांच्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत डांगे यांनी अगदी योग्य तऱ्हेने या प्रश्नाला स्पर्श केलेला आहे.

युधिष्ठिराच्या प्रश्नाला उत्तर देताना भीष्माचार्य म्हणतात :

न वै राज्यं न राजा–सी
नच दंडो न दांडिकः ।
धर्मेणैव प्रजाः सर्वा
रक्षन्ति स्म परस्परम् ॥ . . . वगैरे.

आदिम भूतकालात, कृतयुगात राज्यही नव्हते अन् राजाही नव्हता. शासन साधनेही नव्हती किंवा शास्ताही नव्हता. समग्र समाज धर्मबंधनांनी बंदिस्त होता आणि प्रत्येकजण इतर सर्वांचे संरक्षण करीत होता आणि इतर सर्वांचे पालनपोषण करीत होता. अशा तऱ्हेने प्रदीर्घ कालावधी उलटला. लोकांना त्या काळात कठोर परिश्रम करावे लागत. हळूहळू ते मोहाला बळी पडले. त्याबरोबर त्यांच्यातली एकात्मता आणि नैतिक संतुलन नष्ट झाले. त्यामुळे धर्माची अधोगती झाली. लोभाच्या ते आहारी गेले आणि त्यांच्यापाशी जे नव्हते ते आता अधिकाधिक मिळविण्यासाठी ते धडपडू लागले. हे राजा ! मग कामवासना त्यांच्यावर स्वार झाली. त्यानंतर ते क्रोधाला आणि परस्पर मत्सराला बळी पडले.

मग सारे देव एकत्र जमले आणि ब्रम्हदेवाकडे गेले. ब्रम्हदेवाने त्यांना धर्मस्थापना करण्याचे आश्वासन दिले–नव्या कालखंडासाठी (युग) आचारसंहिता ती हीच. त्याने "त्रिवर्ग" निर्मिती केली. तीच नवी दंडनीती–नवी शासनपद्धती इ. सुरुवातीस, एकाद्या व्यक्तीने धर्माचे उल्लंघन केले तर

समुदायाकडून त्याची निर्भत्सना होऊ लागली. समाजाचा ठपका ही पुरेशी शिक्षा होती. परंतु ह्या पुढच्या अवस्थेत शासनयंत्रणेने लादलेली शिक्षा आणि दंडनीतीने हस्तक्षेप केला आणि असे पुढे चालू राहिले.

हे मूलगामी परिवर्तन कसे घडून आले ? भीष्माचार्यांच्या वचनांमध्ये पुष्कळसे पुरावे असे आढळतात की, ज्यांच्या आधारे असे दाखवून देता येते की हा बदल क्रांतिकारी सामाजिक परिवर्तनामधून घडून आला. हत्यारे, नैसर्गिक उपजीविकेची साधने, भौतिक उत्पादन यांच्यामध्ये जसजशी सुधारणा होत गेली तसतसे "अतिरिक्त" (जादा) उत्पादन होऊ लागले. त्याच्या वाटपाची सांगड लोभ आणि अधिकाधिक मिळविण्याची धडपड यांच्याशी घालण्यात आली. सुरुवातीला संपूर्ण समुदाय समग्र समाजाच्या व त्यातील प्रत्येक व्यक्तीच्या किमान गरजा भागविण्यासाठी जेमतेम पुरेल इतके उत्पादन करण्यासाठी कठोर परिश्रम करीत असे. "गणसंघा"मध्ये "माझे" काय अन् "तुझे" काय असा भेदभाव नव्हता व असणेही शक्य नव्हते. ही काही कोणा कवीची कपोलकल्पित कथा नाही, तर अगदी प्राथमिक आदिम साम्यकुल समाजरचनेची वास्तव परिस्थिती होती. येथे एका गोष्टीची नोंद घेतली पाहिजे की, भीष्माचार्यांनी, ज्या समाजरचनेमध्ये उत्पादनशक्ती अत्यंत खालच्या पातळीला होत्या आणि एक प्रकारचा एगॅलिटेरिॲनिझम (लोककल्याणवाद) नांदणे क्रमप्राप्त होते, ती समाजरचना आदर्श मानली नव्हती. परंतु नंतर, "अतिरिक्त" (जादा) उत्पादन होऊ लागले आणि त्याच्या भोगाच्या प्रश्नाबाबत भेदभाव होणे अपरिहार्य झाले. त्यातूनच मग वर्गभेद उद्‌भवले. आणि ज्या विकारांची नोंद खाडिलकर घेतात ते निर्माण होऊ लागले. वर्णाश्रम धर्माने निर्माण केलेल्या वर्गभेदाच्या समाजरचनेमध्ये "दंड" (सक्ती), त्यासाठी शासनयंत्रणा ही समाजरचनेची एक अत्यावश्यक गरज निर्माण झाली. भीष्माचार्यांनी ती सविस्तरपणे मांडली आहे. त्यात राजांची तसेच राजांचा नोकरवर्ग आणि अधिकारीवर्ग यांची कर्तव्ये आणि गुणधर्म, निरनिराळ्या क्षेत्रातील कारभारपद्धती, अंतर्गत आणि बाह्य सुरक्षितता इ.संबंधी आचारसंहिता दिलेली आहे.

वर दिलेल्या माहितीवरून हे स्पष्ट होते की, माणसाचे विकार समाजाच्या विकासाच्या एका विशिष्ट अवस्थेत दृष्टीस पडू लागले आणि आपला प्रभाव गाजवू लागले. सामाजिक-आर्थिक विकासाशी त्यांचा प्रत्यक्षपणे संबंध जोडणे म्हणजे हा प्रश्न अगदी सोपा करण्यासारखे होईल. तथापि माणसाच्या ह्या विशिष्ट सामाजिक मानसशास्त्रीय गुणधर्माचे मूळ समाजविकासाच्या विशिष्ट अवस्थेमध्ये आहे याबाबत शंकाच असू शकत नाही.

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः

(स्वधर्मामध्ये मृत्यू येणे श्रेयस्कर. परधर्म हा भयप्रद असतो). येथपर्यंत "धर्मा"चे महत्त्व प्रतिपादन करताना आपल्या पूर्वजांनी माणसाने आपले विकार दडपले पाहिजेत, त्यांना काबूत ठेवले पाहिजे आणि सरतेशेवटी त्यांच्यावर मात केली पाहिजे, असा आदर्श लोकांसमोर ठेवला होता. जो कोणी ही अवस्था प्राप्त करील तो "स्थितप्रज्ञ"– परिपूर्ण माणूस. स्थिरवृत्ती असलेला शहाणा—एक आदर्श व्यक्तिमत्व बनतो. निर्भय, प्रक्षुब्ध न होणारा, मनावर ताबा असणारा, समाजाविषयी आपल्या कर्तव्यांची जाणीव असणारा, निर्लोभी, निर्मोही इ. गुणांनी परिपूर्ण असा क्वचितच आढळणारा आदर्श माणूस बनतो.

परंतु उपनिषद आणि गीता परंपरेने अशा "परिपूर्ण माणसा"चा विचार करताना समाजापासून अलगपणे त्याचा विचार केला. प्रस्थापित वर्गांच्या प्रभुत्वाखाली असलेल्या आणि लोभ, मोह आणि परस्परांविषयीच्या मत्सराने ग्रासलेल्या समाजातील एका बेटाप्रमाणे त्याचा विचार केला. असल्या समाजपद्धतीविरुद्ध बंड करून उठण्याऐवजी हा "आदर्श माणूस" संन्यस्त बनून जीवनमुक्त बनतो. कनिष्ठ मानवप्राण्यांचे संघर्ष, दुःख, गोंधळ यांच्यापासून अलिप्त आणि विरक्त बनतो. सामान्य जनसमूहापासून तो स्वतःला अलगपणे एक "आदर्श व्यक्ती" म्हणून उंचावतो.

याबाबत असाही मुद्दा उपस्थित होऊ शकतो की, "स्थितप्रज्ञ" ही अपवादात्मक व्यक्ती असते आणि माणूस हा "षड्रिपूं"च्या आधीन असतो. हया सर्वसाधारण सिद्धांताला अशा अपवादामुळे बाधा येऊ शकत नाही. ते काहीही असो. पण येथे ज्या मुद्यावर भर द्यावयाचा आहे तो मुद्दा असा की, माणूस जर अपरिवर्तनीय आणि त्याच्या विकारांचा त्रिकालाबाधित "कैदी" असेल तर मग आपल्या प्राचीन ऋषिमुनींनी केलेली आवाहने निरर्थक आणि व्यर्थ ठरतात. त्यांनी व्यक्तिगत मुक्तीचा प्रचार केला. त्याचे कारण एवढेच की, ते वर्ग-वर्णांनी विभाजित समाजरचनेचे ते पुरस्कर्ते होते. म्हणून आणि त्यांची सारी दूरदृष्टी गृहित धरूनदेखील त्यांच्या जागतिक दृष्टिकोनाला भविष्यकाळातल्या वर्गविहीन समाजरचना दृग्गोचर होणेच अशक्यप्राय होते.

माणसाच्या अंगभूत विकारांवर आधारून त्याच्या वर्तणुकीविषयी आणि सामाजिक आचारसंहितेविषयी त्रिकालाबाधित असा एखादा सिद्धांत मांडणे म्हणजे उत्क्रांत परिवर्तनाच्या पूर्णविरामाचा सिद्धांत मांडणेच होय. माणूस हा निर्विकार, अपरिवर्तनीय असा प्राणी आहे असे म्हणण्यासारखे ते होईल.

त्याची परिणती अखेरीस उत्क्रांतीच्या खोल गर्तेत घेऊन जाण्यातच होईल. हा सिद्धांत अशास्त्रीय आणि अतर्क्य आहे. ही एक निराशावादी, दैववादी संकल्पना असून ती मानवसमाजाला निराशावादात गुरफटून टाकणारी आहे. प्राणिमात्रांत सर्वश्रेष्ठ ठरलेल्या मानवाला कमीअधिक प्रमाणात नैसर्गिक विकारांच्या आधीन असणाऱ्या जनावरांच्या पातळीला मानवाला नेऊन सोडणारी आहे. येथेही, आपणास अनुभव आहेच, की पाळीव प्राण्यांमध्ये पाशवी विकारांमध्ये काही प्रमाणात परिवर्तन होते आणि ते खाणाखुणांना प्रतिसादही देतात. त्यांच्या "प्रतिक्षिप्त क्रिया" मानवाच्या सामाजिक वातावरणांनी "नियंत्रित" बनतात.

याशिवाय त्याबाबत असाही प्रश्न उपस्थित करता येऊ शकतो : सर्वच मानवी मनोविकार सदासर्वकाळ अपायकारक, हानीकारकच असतात का? अगदी समाजवादी आणि कम्युनिस्ट समाजरचना जरी घेतली तरी त्यातदेखील योग्य परिस्थितीत त्यांना आवाहन करूच नये असं आहे का?

पहिले असे की, "षडरिपुं"मध्ये समाविष्ट असलेले काही मनोविकार अगदी प्रचलित समाजरचनेतदेखील नैतिक उद्दिष्टे साध्य करू शकतात. उदा. मातेचे अपत्य-वात्सल्य, जे प्राथमिक अवस्थेत त्याच्या जीवनाची अन पालन-पोषणाची हमी देते, किंवा मातृभूमी आणि जनता यांच्याविषयीचे प्रेम, अन् वर्ग-शत्रूंविषयी सर्व प्रकारच्या दडपशाहीविषयी व अन्यायाविषयी वाटणारा द्वेष इत्यादी. दुसरा मुद्दा असा की, प्रचलित वर्गीय, पिळणूक करणाऱ्या अशा व्यक्तिवादी समाजरचनेमध्ये अयोग्य उद्दिष्टांसाठी ज्या मानवी मनोविकारांचा वा अधिक चांगल्या शब्दांत बोलायचे तर "भावनां"चा वापर अयोग्य उद्दिष्टांसाठी केला जातो त्याच भावनांचा वापर अगदी प्रगत समाजवादी समाजरजनेमध्ये किंवा भविष्यकालीन कम्युनिस्ट समाजरचनेमध्ये समाजवादाच्या व कम्युनिझमच्या उदात्त उद्दिष्टांसाठी, मानवमुक्ती व समाज आणि निसर्ग यांच्यापासून मानवाचा विभक्तपणा नष्ट करण्यासाठी केला जातो तेव्हा मानवाच्या मनोविकारांच्या प्रश्नांकडे बदलत्या संदर्भात बघितले पाहिजे. सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून अन् असमानतेपासून मुक्त अशा, खऱ्याखुऱ्या मानवी आणि न्याय्य अशा, समाजनिर्मितीच्या दिशेकडे नेणारे ते सारे सत्य आणि इष्ट असते असे कम्युनिस्ट नितीशास्त्र आणि नैतिकता मानते.

माणसाच्या वासना-विकार, वर्तणूक, दृष्टिकोन, आचारसंहिता—हे जे सारे समग्रपणे माणसाच्या सामाजिक जाणीव आणि मनोवस्था निश्चित करते ते खालील घटकांनी मिळून बनलेले असते :

१) शतकांपासून चालत आलेल्या सामाजिक जीवनाच्या आचार-

संहिता. कारण सामाजिक जीवनासाठी त्या अपरिहार्य असतात व त्यांच्या-खेरीज सामाजिक अस्तित्वच अशक्य असते.

२) वर्ग-भेदावर आधारित समाजव्यवस्थेमध्ये प्रभुत्व गाजविणाऱ्या वर्गांनी आपल्या विशेषाधिकारांच्या समर्थनासाठी माणसावर लादलेल्या नीति-नियमांची आचार–संहिता.

३) दडपणाऱ्या वर्गाचे प्रभुत्व झुगारून देण्याची घोषणा करून आपल्या लढ्यामध्ये अंतर्भूत असलेल्या बलिदानाच्या आणि शौर्याच्या गाथा गाणाऱ्या अशा दडपल्या गेलेल्या आणि बंडखोर विभागांचे नीतिशास्त्र.

माणूस, मानवी समाज आणि **बाह्य पर्यावरण** यांच्यामधील द्वंद्वात्मक (अंतर्विरोधी) परस्परसंबंधच माणूस आणि मानवी समाज यांची उत्क्रांती निश्चित करतात. कृतिशीलपणे वस्तुस्थितीमध्ये परिवर्तन करणे म्हणजेच मानवी जाणिवेमध्ये परिवर्तन करणे. याउलट, सामाजिक वास्तवतेतील परिवर्तनासाठी निसर्ग-नियमांवर प्रभुत्व मिळविण्यासाठी आणि मानवाच्या उत्क्रांतीला पुढे नेण्या-करिता त्यांचा वापर करण्यासाठी मानवी जाणीव **अत्यावश्यक** असते. मानवी जाणीव ही मानवाचा स्वतःचा विकास आणि समग्र समाजाचा विकास यांनी मिळून बनलेली असते.

आजचा माणूस हा शतकांपूर्वीच्या माणसाहून भिन्न आहे आणि भविष्य-काळातला माणूस अपेक्षित त्याच मार्गाने उत्क्रांत झाल्याखेरीज राहणार नाही, हे निःसंशय. आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक ती भौतिक आणि आत्मिक परिस्थिती बदलून माणूस त्याचबरोबर आपली सांस्कृतिक, सामाजिक आणि आत्मिक पातळी उंचावून स्वतःला देखील बदलतो.

माणूस हा "चिंतनशील प्राणी" आहे "समाजप्रिय प्राणी" आहे म्हणूनच केवळ ती एकमेव प्राण्याची जात अशी आहे की, जी सतत आपल्या अस्ति-त्वाच्या पद्धतीबरोबरच आपल्या सवयी, वासना–विकार, आणि दृष्टिकोन यांच्यामध्ये सतत परिवर्तन घडवून आणत आलेली आहे. हे परिवर्तन काही आपोआप किंवा संयगतीने झालेले नाही. तथापि, ह्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत परिवर्तनाची गती येणाऱ्या प्रत्येक युगाबरोबर वाढतच गेलेली आहे. म्हणूनच सर्व प्राणीमात्रांमध्ये एखाद्या ठोकळेबाज परंपराबद्ध प्राण्यापेक्षा माणूस हा सर्वांत जास्त संयोगक्षम (परिस्थितीशी जुळवून घेणारा) आकारशील आणि परिवर्तनशील प्राणी आहे––केवळ त्याच्या "बाह्य भपक्या"बाबतच नव्हे, तर "अंतर्गत गाभ्या"बाबत देखील.

मार्क्सने म्हटले आहे की, "इतिहास म्हणजे मानवी स्वभावाचे अहर्निश चालणारे परिवर्तन." अर्थात येथे इतिहासाची गणना तो वर्षांच्या, दशकांच्या

किंवा शतकांच्या मापाने करीत नाही; तर युगांच्या मापाने करतो—पूर्वी म्हटल्याप्रमाणे, जरी प्रत्येक युगात परिवर्तनाची गती सतत वाढतच असते तरीही.

"मानवी स्वभावाच्या परिवर्तना"ची मार्क्सवादी संकल्पना आणि उपनिषदाच्या तत्त्वज्ञान्यांची संकल्पना यांच्यामध्ये फरक आहे तो असा की, ज्या पर्यावरणात (बाह्य परिस्थितीत) माणूस जगतो आणि कष्ट करतो ते पर्यावरण आणि सामाजिक जीवनाची परिस्थिती हे दोन्हीही घटक एकत्रितपणे मानवी व्यक्तिमत्वावर प्रभाव पाडतात ह्या भूमिकेकडे उपनिषदकारांचे दुर्लक्ष झाले. समाजाची आदिम साम्यकुलीन अवस्था पार भूतकाळात विरून गेल्यानंतर उत्क्रांत झालेल्या वर्ग-भेदावर आधारित समाजव्यवस्थेमधील तत्त्वज्ञ या नात्याने समाज आणि निसर्ग यांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी अव्याहत चालत असलेल्या लढ्यांपासून अलिप्तपणाने मानवमुक्तीच्या प्रश्नांकडे ते पहात होते. त्यांच्या दृष्टीने मानवाचा स्वतः विरुद्धचा अंतर्गत लढा हाच निर्णायक लढा होता. दबाव आणणाऱ्या सामाजिक परिस्थितीविरुद्धचा लढा त्यांना निर्णायक वाटत नव्हता. म्हणून त्यांनी आपली दृष्टी अंतर्मुख केली आणि समाज आणि निसर्ग यांच्यात परिवर्तन घडवून आणल्याखेरीज माणसाचे "परिपूर्ण माणसामध्ये" परिवर्तन करण्याच्या गोष्टी त्यांनी केल्या. याचा अर्थ असाच होतो की, "स्वर्ग आणि जीवनमुक्ती"चा प्रचार करून त्यांनी या जगातल्या पिळवणूक करणाऱ्या समाजरचना दृढ करण्याची सेवा बजावली किंवा कसे हा भाग निराळा. त्याची चर्चा येथे जरुरीची नाही.

तेव्हा हा "षडरिपु"—सिद्धांत, त्यातील ऐतिहासिकतेच्या उणिवेमुळे, मानव आणि मानवी स्वभाव यांच्या संमिश्र आणि अनेक घटकांच्या बहुअंगी मिश्रणाचा विचार न करण्याच्या चुकीमुळे आणि मानव आणि त्याचा स्वभाव हा त्रिकालाबाधित अपरिवर्तनीय आहे ह्या अशास्त्रीय दृष्टिकोनामुळे फेटाळून लावणे भाग आहे.

हे झाले खाडिलकरांच्या तिसऱ्या सिद्धांतासंबंधी.

आता आपण "विकसित समाजवादा"च्या प्रवक्त्यांना समाजविकासाची ही अवस्था परिपूर्ण करण्याबाबत आणि कम्युनिझमच्या दिशेने प्रगती करण्याच्या भवितव्याबाबत काय म्हणावयाचे आहे त्याच्याकडे आपण वळूया.

(९) 'नवा माणूस' उदयास येण्यासाठी आवश्यक असलेली परिस्थिती

समाजाच्या उत्पादक शक्तींची आणि प्रमुख उत्पादक शक्ती या दृष्टीने स्वतः माणूस आणि त्याचे श्रमकार्य (कष्ट) यांची सध्याची विकासाची पातळी लक्षात घेता सोविएत समाजामध्ये "विकसित समाजवाद" कशा प्रकारे कार्य करतो? या समाजात माणसांची ज्ञानेंद्रिये, वासना-विकार आणि एकूण मनुष्यस्वभाव कशा प्रकारे व्यक्त होतो? पुढील विकासाच्या दृष्टीने त्यात काही आशेला जागा आहे का?

या मुद्याबाबत, स्वतः यूरी आन्द्रोपोव यांची विधानेच आपण उद्धृत करूया.

"'माझे स्वतःचे" खाजगी मालकीचे याचे रूपांतर "आपल्या" सर्वांच्या सामायिक मालकीमध्ये होणे ही काही साधीसुधी बाब नाही. . . . समाजवादी क्रांती पार पाडणाऱ्या जनतेला दीर्घकाळपर्यंत समग्र सार्वजनिक संपत्तीच्या सर्वोच्च आणि अविभक्त मालकीच्या आपल्या नव्या स्थानाला साजेसा आकार स्वतःला द्यावा लागेल. एक प्रकारच्या सामुदायिक मनोवृत्तीचा आणि वर्तणुकीचा विकास करून स्वतःला आर्थिक, राजकीय आणि वाटल्यास मानसिक दृष्ट्या घडवावे लागेल. . . . "'माझे स्वतःचे" याचे रूपांतर "आपले सर्वांचे" याबाबत बोलताना हे विसरून चालणार नाही की, ही एक प्रदीर्घ काळ चालणारी गुंतागुंतीची प्रक्रिया आहे आणि ती सोपी करता उपयोगी नाही. अगदी ज्यावेळी सामाजिक उत्पादनसंबंध अंतिमतः प्रस्थापित होतील त्यावेळी देखील काहींच्या व्यक्तिगत सवयी कायम टिकून राहतील आणि कदाचित त्यांची पुनरावृत्ती देखील होऊ शकेल. उदा. समाजाच्या हितसंबंधांना बाधा आणून नफे मिळविण्याचा प्रयत्नही केला जाणे शक्य आहे. मार्क्सच्या परिभाषेत सांगायचे तर, श्रमापासून अलगपणाचे ते परिणाम आहेत आणि ते, जरी अलगपणा यापूर्वीच नष्ट झालेला असला, तरीदेखील मनामधून आपोआप किंवा अचानक विरून जाणार नाहीत,"

सोविएत समाजात सध्याच्या विकासावस्थेत अद्याप अस्तित्वात असलेल्या नकारात्मक बाबींकडे (उणिवांकडे) काणाडोळा करण्याचा अथवा त्यांच्या मूल-

कारणांवर पडदा टाकण्याचा यत्किंचित देखील प्रयत्न करण्यात येत नाही. "विकसित समाजवादा"च्या पुढील परिपूर्णावस्थेकडे जाण्याच्या कार्याचा केंद्र-बिंदू 'सोविएत माणूस' हाच आहे. एक प्रकारच्या समाजवादी व्यक्ति-मत्वाच्या एका 'नव्या माणसा'च्या घडणीसाठी प्रयत्नशील राहणे हाच आहे. असा 'नवा माणूस' की जो वर्गभेदांवर आणि पिळवणुकीवर आधारलेल्या समाजरचनेचे व्रण आणि जन्मखुणा यापासून मुक्त असेल. हे काय अशक्यप्राय ध्येय आहे ? व्यर्थ धडपड आहे ?

या कार्याबाबत सोविएत नेते किती गांभीर्याने विचार करताहेत आणि हया कार्याला त्यांनी कशा तऱ्हेने स्वतःला जुंपून घेतले आहे हे जून १९८३ मध्ये कॉन्स्तान्तिन चेर्नेन्को यांनी सोविएत संघराज्य कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय समितीला सादर केलेल्या अहवालातील खालील उताऱ्यावरून जाणून घेता येऊ शकते :

"कॉमरेड्स, दारुबाजी, गुंडगिरी, सामाजिक मालमत्तेची लुबाडणूक, चोरी आणि जुगारी, लाचखोरी आणि पैसे खाण्याची अपप्रवृत्ती इत्यादींविरुद्ध अत्यंत प्रखरतेने लढा करण्यापासून नव्या माणसाचे शिक्षण अलग काढता येणार नाही. कष्टकरी जनतेच्या चिंतेला अन संतापाला पात्र ठरणाऱ्या हया गलिच्छ अपप्रवृत्तींमध्ये केवळ लोकांच्या जाणिवेमध्ये आणि वर्तणुकीमध्ये असलेले "भूतकाळातले अवशेष" अशा दृष्टीने पाहणे चुकीचे ठरेल. यापैकी अनेक "व्रणां"ची कारणे आमच्या प्रचलित व्यवहारामध्ये, हया अथवा त्या कामगाराच्या चुकीमध्ये, आपल्या विकासक्रमातील खऱ्याखुऱ्या समस्या आणि अडचणींमध्ये, शैक्षणिक कार्यातील आपल्या उणीवांमध्ये शोधल्या पाहिजेत..... समाजवादी साम्यकुलीन जीवनाच्या नीतीनियमांचा भंग करणाऱ्यांकडे, मग ते कोणीही असोत, त्यांच्याविरुद्ध असहिष्णुतेचे वातावरण आपण निर्माण केले पाहिजे आणि त्यांच्याविरुद्ध लोकमत संघटित केले पाहिजे.

ज्याला आपल्या परंपरेत "धिक् दंड" आणि "दंड" नीती म्हणतात—म्हणजेच लोकमताचा बडगा यांची सांगड घालण्याचाच हा प्रकार आहे.

"हया साऱ्या जागतिक अपप्रवृत्ती" आहेत असे आपल्या देशांत नेहमी जे ऐकायला मिळते, तशा प्रकारची सबब सांगण्याचा प्रयत्न आपणास येथे आढळत नाही. किंवा अखेरीस माणूस हा "स्खलनशील" प्राणी आहे आणि हया त्याच्या मूलभूत विकारवासना आहेत आणि त्यांचा तो असहाय बळी आहे वगैरे वगैरे सांगून त्यांच्याविरुद्धचा लढा सोडून दिला जात नाही.

समाजवादातील वस्तूंचे कामाप्रमाणे वाटप या तत्त्वाची भौतिक बाजूच खाडिलकरांनी पाहिली आहे. त्यांनी असा निष्कर्षही काढला आहे की, याचा अर्थ मानवाच्या अंगभूत स्वभावाशी या पद्धतीने जुळवून घेतले आहे. परंतु

येथे केवळ आर्थिक बाजूच काही महत्त्वाची नाही. त्याची वैचारिक आणि नैतिक बाजू तर त्याहूनही अधिक महत्त्वाची आहे.

क्रांतीच्या अगदी आरंभीच्या काळापासून जेव्हा लेनिन यांनी स्वत: "सुब्बोतनिक्स"—म्हणजे शनिवारी, रविवारी, सुटीच्या दिवशी आणि इतर काही विशिष्ट प्रसंगी "श्रमदान–मोहीम" हाती घेतल्याकारणाने श्रमाकडे एक प्रकारच्या प्रतिष्ठापूर्वक नजरेने पाहण्याच्या एका नव्या घटकाचा शुभारंभ करण्यात आला. सोविएत संघराज्य आणि अन्य समाजवादी देशांमध्ये हा घटक सतत वाढत्या प्रमाणामध्ये समाजवादी श्रमकार्यातील एक सामर्थ्यशाली असा कायमस्वरूपी घटक बनून राहिला. शांतता-आंदोलन साम्राज्यवादाविरुद्ध लढणाऱ्या जनतेच्या पाठिंब्यासाठी आंतरराष्ट्रीय भ्रातृभावी साहाय्यनिधी जमा करणे यांसारख्या निधी-उभारणीच्या भव्य मोहिमा संघटित करताना समाजवादी देश अशा भावनांचा वापर करून घेतात. "साखानोवाइट चळवळ" हे देखील सामुदायिक श्रमदान मोहिमेसारख्या समाजवादी स्पर्धेचे एक उदाहरण आदर्श म्हणून दाखवता येईल. जीवनात सरतेशेवटी जे जे म्हणून नवे आहे, उगवते अन वाढते आहे ते सरतेशेवटी विजयी ठरल्याखेरीज रहात नाही. खऱ्याखुऱ्या समाजवादामध्ये आपण श्रमाकडे पाहण्याचीही एक नवी वृत्ती अशा दृष्टीनेच पाहिले पाहिजे.

मानवाच्या श्रमकार्यात आणि सामाजिक जीवनात तो केवळ भौतिक मूल्यांचे उत्पादन करतो असे नव्हे, तर त्याचबरोबर आपला विविधांगी स्वभाव विकसित करतो, आपली इच्छाशक्ती कसोटीला लावतो, आपली नवनिर्माणक्षमता पूर्णत्वाला नेतो आणि भविष्यकाळातल्या नव्या समाजरचनेचा निर्माता म्हणून स्वत:ला घडवितो. चेर्नेन्को यांनी पुढे आपल्या अहवालात नेमके हेच म्हटले आहे. :

"माणसाने स्वत:ला बदलल्याखेरीज समाजाचे क्रांतिकारक परिवर्तन अशक्य आहे. आणि आपला पक्ष हचा प्रतिज्ञेपासून सुरुवात करतो की, नव्या माणसाची घडण हे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट आहे एवढेच केवळ नव्हे, तर कम्युनिझमच्या उभारणीची ती अत्यावश्यक पूर्वअटही आहे. . . . .

"तथापि, हे विसरता कामा नये की, नवा माणूस निर्माण होण्याची प्रक्रिया ही जितके जीवन अखंड आणि गुंतागुंतीचे आहे तितकीच अखंड आणि गुंतागुंतीची आहे."

हचा प्रक्रियेला किती कालावधी लागेल? कदाचित काही दशके. एखादे शतक किवा त्याहूनही अधिक. परंतु इतिहासात एक शतक हा काही दीर्घ कालावधी नाही; जरी एखाद्या व्यक्तीच्या जीवनाच्या कालावधीशी किंवा एखाद्या पिढीच्या अपेक्षांशी तुलना करता तो प्रदीर्घ कालावधी आहे.

"प्रत्येकाकडून त्याच्या क्षमतेनुसार, प्रत्येकास त्याच्या गरजेनुसार" हा सिद्धांत उत्पादक शक्तींच्या पुढील विकासामुळे आणि श्रमशक्तीच्या उत्पादन क्षमतेत अफाट वाढ झाल्यामुळे लोकांच्या जाणिवेत आणि मानवाच्या श्रमकार्यामध्ये जे गुणात्मक बदल घडून येणार आहेत त्यांना लागू आहे. केवळ भौतिक पायाच्या स्वरुपाशीच नव्हे, तर स्वतः मानवाशी प्रत्यक्षपणे त्या सिद्धांताची सांगड आहे. गरजेच्या शक्तीशी जीवनाला जमवून घेता यावे यासाठी मानव आणि समाज यांना ज्या मार्गाने वाटचाल करावी लागेल तो मार्ग तो सिद्धांत आखतो. 'श्रम म्हणजे सक्ती' हे त्याचे स्वरूप बदलून 'श्रम म्हणजे एक सृजनशील अत्यावश्यकता' आहे असे मार्क्सने म्हटले आहे.

म्हणून, हा सिद्धांत अंमलात आणला तर ऐतखाऊ मिळकत, गलथान काम, कामचुकारपणा असल्या प्रमादांना तोंड द्यावे लागेल हा प्रश्नच गैरलागू आहे. कारण हा सिद्धांत काही समाजाच्या आजच्या अवस्थेत आणि मानवाच्या जाणिवेच्या आजच्या पातळीवर लागू करण्यात येणार नाही. मार्क्सला खाडिलकर जे दूषण देतात त्याच्या नेमके उलट, लेनिनने म्हटले आहे.

"मार्क्सने स्वप्नरंजन करण्याचा आणि जे ज्ञात होऊ शकत नाही त्याबाबत बसल्याजागी कल्पनेचे मनोरे रचण्याचा प्रयत्न केल्याची यत्किंचितदेखील खूण सापडू शकत नाही. एखादा निसर्गशास्त्रज्ञ एखाद्या नव्या जीवशास्त्रीय जातीप्रकाराचे संशोधन करण्याचा प्रश्न ज्या मार्गाने हाताळेल, नेमक्या त्याच मार्गाने मार्क्सने कम्युनिझमच्या प्रश्नाचे संशोधन केले. एकदा का त्या शास्त्रज्ञाला अमूक अमूक मार्गाने अमूक अमूक अशा निश्चित दिशेने ती बदलत गेली हे समजले की बस." (लेनिन : निवडक ग्रंथ : २५)

समाजवादी क्रांतीच्या आणि विज्ञान आणि तंत्रज्ञानातील क्रांतीच्या मुळाशी माणूस आहे असे आम्ही मार्क्सवादी मानतो. तो एकाच वेळी क्रांतीची प्रेरक शक्ती आणि तिचे उद्दिष्ट देखील असतो. तो आद्य प्रेरक असतो. मार्क्सने त्याच्या एकूण "हिशेबात" माणूस विचारात घेतलाच नाही असे म्हणणे म्हणजे, सौम्य शब्दांत सांगायचे तर नेम पार चुकला! मानवाच्या सर्व विधायक क्षमता मुक्त करणे आणि ज्यामध्ये सहजसाध्य होईल असे आवश्यक ते सामाजिक संबंध निर्माण करणे यातच समाजवादी मानवतावाद सामावलेला आहे. स्वतः मार्क्सचेच वचन उद्धृत करायचे तर, "मानवासाठीच मानवाचा विकास" ह्यातच मानवाच्या कार्याचे आणि जीवनाचे सार्थक आहे.

थिल्लर किंवा यांत्रिक भौतिकवाद्यांवर टीका करतांना मार्क्सने लिहिले आहे की, "भौतिकवाद्यांचा सिद्धांत सांगतो की, माणसे ही परिस्थितीने आणि पालनपोषणाने घडतात आणि म्हणून बदललेली माणसे ही अन्य परिस्थिती

आणि बदललेल्या पालनपोषणाने घडतील. पण हे भौतिकवादी हे विसरतात की, माणसेच परिस्थिती बदलतात आणि शिक्षकालाच शिक्षणाची गरज असते...

"बदलती परिस्थिती आणि मानवी कृती यांचा मेळ केवळ **क्रांतिकारी व्यवहारामध्येच** तर्कशुद्धपणे समजू शकतो."

समाजवादी पद्धतीने प्रथमच माणूस आणि माणूस, माणूस आणि समाज, आणि माणूस आणि निसर्ग यांच्यातील विरोध नष्ट केला. आणि म्हणूनच स्वतः माणसाच्या सर्वांगीण आणि समतोल विकासासाठी वास्तव परिस्थिती समाजवादाने निर्माण केली.

(१०) प्रत्यक्ष वास्तवता आणि भारतीय कम्युनिस्टांची तथाकथित पापकृत्ये

खाडिलकरांच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" मधील अनेक घटकांचा परामर्श घेण्यापूर्वी भारतीय कम्युनिस्टांबाबतच्या त्यांच्या मूल्यमापनाचा आपण विचार करूया. ते म्हणतात, इतकी वर्षे सोविएत समाजपद्धतीविषयीचे खरे स्वरूप लोकांना उमगले नाही. त्याला अन्य कोणाहीपेक्षा सर्वांत जास्त जबाबदार कोण असतील तर ते भारतीय कम्युनिस्टच. सोविएत संघराज्य, समाजवादी आणि कम्युनिझमविषयी लोकांच्या मनात गैरसमज निर्माण करण्यास तेच सर्वांत जास्त कारणीभूत आहेत.

याबाबत त्यांची वस्तुनिष्ठता अन नम्रता आपण घटकाभर बाजूला सारु. खाडिलकर पुढे म्हणतात, आजतागायत सोविएत संघराज्याला भेट देणाऱ्या लोकांत तीन प्रकारचे लोक असतात. – एक "बाटलीवाले" (बाटलीबाज) दुसरे "पालखीवाले (अमेरिका-धार्जिणे सोविएत - विरोधी अशा नानी पालखीवालासारख्या व्यक्ती) आणि "पोथीवाले" (मार्क्सवादाला पवित्रग्रंथ मानून त्याची पूजा करणारे पोथीवादी) .

महत्प्रयासाने ओढूनताणून केलेला एक "विनोद"यापलिकडे या विधानाला काहीएक अर्थ नाही. पण स्पष्ट बोलायचे तर ह्या विनोदाने कुणाचीही करमणूक होणार नाही. हे वर्णन आमच्या काळजाला झोंबते म्हणून नव्हे, तर खाडिलकरांच्या पूर्वी सोविएतला भेट देऊन आलेल्या लोकांवर अन्याय करणारे असे ते वर्णन आहे. वस्तुस्थितीचे निरीक्षण करून सत्य कथन करणारा एकमेव काय तो मीच अशा उग्र अहंकाराचा दर्प निर्माण करणारा तो आत्मगौरव वाटतो. "संजय" आणि "नारद" या दोघांचेही व्यक्तिमत्व आपल्या ठायी एकवटले आहे अन बाकी साऱ्यांमध्ये सामान्य निरीक्षण क्षमताही नाकारणारे ते विधान वाटते. परंपरेने आणि व्यवसायाने स्वतःला "पत्रकार" म्हणविणाऱ्याच्या बाबतीत तरी असला अहंकार अशोभनीय वाटतो.

सोविएत संघराज्याविषयी अपप्रचार अन विकृत माहिती प्रसृत करणे ही काही आजकालची नवी बाब नाही, अन ती केवळ भारतापुरतीच मर्यादित

नाही. साम्राज्यवादी प्रचारमाध्यमे आणि त्यांचे देशातील गल्लाभरू दलाल अन स्वप्नाळू भोळसट यांनी केलेले त्यांचे अंधानुकरण प्रत्येक दिवशी, प्रत्येक तासागणिक अपप्रचाराची राळ उठविण्याचे कार्य अव्याहत चालवीत आलेले आहेत.

सोविएत राज्याची स्थापना झाल्याक्षणी–अगदी क्रांतीची पहाट झाल्याक्षणी–जगभरचे भांडवलदार झोपेतून खडबडून जागे झाले अन ह्या नवोदित क्रांतीच्या सूर्याची किरणे जर इतरत्र फाकत गेली तर आपली धडगत राहणार नाही हे त्यांनी वेळीच हेरले. आणि त्या क्षणापासून साम्राज्यवादी प्रचारयंत्रणेने सोविएत संघराज्याविषयी कम्युनिस्टांविषयी अन सोविएत संघराज्याचे नेते आणि पक्ष यांविषयी धादांत असत्य, अर्धसत्य, कपोलकल्पित भाकडकथा, प्रसृत करण्याचे कार्य अखंडपणे चालविले आहे. स्त्रियांचे अन मुलांचे सामुदायिकीकरण, कुटुंबसंस्था व लैंगिक पावित्र्य यांचे विघटन आणि अधःपतन, चर्च, मशिदी इ. धर्मस्थळांचे उच्चाटन, खाजगी मालकीचे सार्वत्रिक सामायिकीकरण, कंठस्नान, राक्षसी दडपशाही इ. इं. असंख्य कपोलकल्पित कथांचे पेव फोडण्याकरिता तथाकथित खास वार्ताहरांच्या वृत्तप्रसारण यंत्रणा स्थापन करून त्याद्वारे "खास आतल्या गोटातून" मिळविलेल्या वृत्तांचे प्रसरण अखंडपणे चालविण्यात येत आहे. त्या सर्वांचा येथे परामर्श घेणे जरुरीचे नाही. कारण फार पूर्वीच आपल्या पूर्वजांनी सांगून ठेवलेले आहे : "सत्यमेव जयते नानृतं"– (अखेर सत्याचाच जय होतो – असत्याचा नव्हे.)

आजही, अजूनही, असत्य प्रचारकांचे धंदे संपलेले आहेत असे नाही. मग ते सोविएत संघराज्याविषयी असो वा भारतीय कम्युनिस्टांविषयी. अगदी अलिकडेच दक्षिण कोरियन विमान प्रकरणी हेरगिरी करणाऱ्या विमानाला अनेक पूर्वसूचना देऊनसुद्धा जेव्हा सोविएत भूप्रदेशात अतिक्रमण करणे त्याने चालूच ठेवले तेव्हा त्याला नाईलाजाने जमीनदोस्त करण्यात आले. त्यावेळीही रेगन आणि त्याचे जगभरचे व भारतातले ढोलपिटे प्रचारक यांनी २४० निरपराध जिवांच्या हत्येबद्दल नैसर्गिक शोकाचे सोविएत-विरोधी असत्य अपप्रचाराची राळ उडविण्यासाठी कसे भांडवल केले ते सर्वांना ज्ञात आहेच. त्यावेळी आपल्या देशातल्या भोळसटांनी सोविएतला किती शिव्या मोजल्या. व्हिएतनाम, निकाराग्वा, एल् साल्वादोर आणि अगदी अलिकडे ग्रेनाडामध्ये ज्यांनी अमानुषपणे हजारो नव्हे; लाखो निरपराध लोकांना यमसदनी पाठविले व ज्यांनी सात्विक संतापाचा देखावा करून किती गॅलन नक्राश्रू ढाळले—अन ते देखील मानवी हक्कांच्या संरक्षणाचा टेंभा मिरवीत – त्यांच्याबद्दल या भोळसटांनी क्षणभरही विचार केला नाही. सोविएतच्या गुन्हेगारीच्या भाकडकथा प्रसृत करणारे देखील हेच लोक – दुसरे कुणी नाहीत हे लक्षात घ्या. खोटचा अपप्रचाराचे हे ढग विरून

सत्यप्रकाश बाहेर यायला बरेच दिवस जावे लागले अन मगच खरे गुन्हेगार कोण ते जगाला उमगले.

फार पूर्वी, म्हणजे १९२० साली, जेव्हा नवोदित सोविएत राज्याभोवती साम्राज्यवादी शक्तींनी चौफेर "पोलादी पडदा" उभारून त्याची कोंडी केली होती अन् सत्य माहिती बाहेर येऊ देणे अशक्य करून टाकले होते, त्यावेळी भारताचे थोर राष्ट्रीय नेते लाला लजपतराय दूरदर्शीपणाने म्हणाले होते :

"सोविएत रशियाविषयी अँग्लो–इंडियन वृत्तपत्रे अहोरात्र खोट्या भाकडकथा प्रसृत करीत असतांना हिंदुस्थान सरकार या प्रश्नाची दुसरी बाजू जाणून घेण्यास लोकांना मज्जाव करीत आहे. युरोपमध्ये सत्य दोन प्रकारचे असते. (अ) भांडवलदारी अन सरकारी सत्य... आणि (ब) समाजवादी अन श्रमिकांचे सत्य.——

"सत्याची दुसरी बाजू जाणून न घेता पहिल्या प्रकारचे सत्य स्वीकारायला हिंदुस्थान सरकार आम्हाला भाग पाडत आहे. दुर्दैवाने, सत्य हे आता सत्य राहिलेलेच नाही. एका बाजूने ते भांडवलदारी अन साम्राज्यवादी सत्य असते तर दुसऱ्या बाजूने ते समाजवादी सत्य असते. एक तर ते भांडवलदारी किंवा मध्यमवर्गीय असते. किंवा समाजवादी असते. संपूर्ण सत्य जाणून घ्यायचे तर त्याचे तिन्हीही प्रकार जाणून घेतल्यानंतरच त्याबाबतचे मत बनविणे शक्य आहे. युरोप आणि अमेरिकेमधील माझा स्वतःचा अनुभव असा आहे की कोणत्याही भांडवलदारी किंवा साम्राज्यवादी सत्यापेक्षा समाजवादी –अगदी बोल्शेविक सत्य हे केव्हाही अधिक विश्वासार्ह आणि मानवी असते."

अगदी घटकाभर भारतीय कम्युनिस्ट हे खाडिलकरांच्या लेखातून भासतात तसे निर्बुद्ध अन मठ्ठ आहेत हे गृहित धरले, तरी सुद्धा सहा दशके उलटल्यानंतर सत्प्रवृत्त आणि दूरदर्शी लोकांना सत्य अन असत्य यात फरक करणे का कठीण वाटावे ?

नाही, खाडिलकरजी, तुम्ही स्वतः वृत्तपत्रसृष्टीशी निगडीत आहात—— चतुर्थस्तंभाचे एक मान्यवर घटक आहात. साम्राज्यवादी प्रचारमाध्यमे अन त्यांचे आपल्या देशातले ढोलपिटे यांची भयानक धक्कादायक "असत्य प्रचार" करण्याची ताकद किती आहे हे तुम्हाला नसेल तर अन्य कुणाला ठाऊक असणार ? गोबेल्सला लाजवील अशा तऱ्हेने "काळचा"ला "सफेदी" फासण्यात आणि युद्धखोरांचा घूत्कार हे शांतताप्रीय कबुतरांचे घुमणे आहे असा आभास निर्माण करण्यात त्यांचा हात कोण धरू शकेल ? कम्युनिस्ट हे साक्षात "सैताना"चे अवतार आहेत आणि म्हणून त्यांच्याविरुद्ध रेगन आणि त्यांचे बॅन्डवाले यांनी आज "जेहाद" पुकारलाय हे खरे नाही काय ? निळूभाऊ; तुमच्या स्वतःच्या क्षेत्रात जे तुम्ही सहजपणे जाणू शकता तेच सतत परि-

वर्तनशील अशा समाजरचनेवर प्रभाव पाडत असताना तुम्हाला कसे जाणवत नाही? नवी वृत्तप्रसारण यंत्रणा असण्याची गरज तिसऱ्या जगातील लोकांना जी आज जाणवू लागलीय ती यामुळेच नव्हे का?

भोळ्याभाबड्या वाचकांच्या मनावर असत्याचा प्रभाव किती हळूवारपणे करण्यात येतो पाहा. उदाहरणच द्यायचे तर "नवाकाळ"चेच देता येईल. एका लेखकाने खाडिलकरांच्या लेखांचे कौतुक करताकरताच हळूच अशी एक "पुडी" सोडून दिली की भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जनरल सेक्रेटरी कॉ. राजेश्वर राव यांनी मुस्लिम लोकांना २० टक्के राखीव जागांची मागणी केली आहे. भारतीय कम्युनिस्टांच्या विरुद्ध अल्पसंख्यांकांना खुष करण्याच्या कम्युनिस्टांच्या नेहमीच्या धोरणाचा एक नमुना म्हणून सदर लेखकाने हे उदाहरण दिले. पण हे "सत्य" हचा विद्वान लेखकांना कुठे गवसले? अन सदर लेखकाच्या हचा "अद्भुत शोधा"ला खाडिलकरांच्या स्तंभात जागा कशी मिळाली? तेव्हा असं हे "सत्य" प्रसृत्त होत जातं.

किंवा दुसरं उदाहरण घेऊ. समाजवाद म्हणजे संपूर्ण खाजगी मालमत्ता ताब्यात घेऊन मालकी हक्क संपुष्टात आणणे हा नेहमीचा एक अपप्रचार. छोटे दुकानदार, छोटे जमीनमालक आणि अगदी छोट्याशा हातमागाचा किंवा शिवणयंत्राचा मालक यांना समाजवादी गोटापासून घाबरवून दूर राखण्याकरिता भांडवलदारवर्गाने निर्माण केलेले हे प्रचारतंत्र. खाडिलकर आपणास सांगतात की सोविएत संघराज्यात त्यांना असे आढळले की, एखाद्या व्यक्तीला पाहिजे असल्यास स्वतःचे घर बांधता येते (पण ते दुसऱ्याला भाड्याने देता येत नाही) एखाद्या सामुदायिक शेतकऱ्याला स्वतःच्या मालकीचा स्वतःपुरता शेतजमिनीचा तुकडा वाळगता येतो. त्यात स्वतःच्या गरजेपुरता भाजीपाला करता येतो किंवा कोंबड्या पाळता येतात. (परंतु दुसऱ्याला मजुरीने कामाला ठेवता येत नाही.) शिवाय कपडे, टी. व्ही., रेफ्रिजरेटर, मोटार आणि स्वतःसाठी आणि आपल्या कुटुंबियांसाठी आवश्यक त्या गरजेच्या इतर गोष्टी स्वतःच्या मालकीच्या ठेवता येतात. हे ठीक. पण ते पुढे असं सुचवितात की या बाबतीतल्या "चुकीच्या कल्पना" निर्माण होण्यास भारतातले मार्क्सवादी कारणीभूत आहेत. पण असे करण्याने आपल्या स्वतःच्या आणि त्याचप्रमाणे इतरांच्या देखील चुकीच्या कल्पनांचे खापर बिचाऱ्या कम्युनिस्टांच्या माथ्यावर फोडून ते मोकळे होतात असे नाही का? सामान्य बुद्धी असलेल्या प्रत्येकासाठी येथे पुन्हा हे सांगायला हवं का की मार्क्सने जी "मृत्युघंटा वाजवली ती भांडवलदारी (सामाजिक उत्पादन-साधनांच्या) खाजगी मालकीची (सर्व खाजगी मालकीची नव्हे) म्हणजे अशी खाजगी मालकी की ज्यात एक व्यक्ती इतरांची पिळवणूक करते त्याच्या

श्रमाचे लाभ स्वत: उपटून नफा कमावते ? याबाबतीत गैरसमजाला जागाच कुठे आहे– मार्क्स-बाबत किंवा त्याच्या भारतातल्या अनुयायांबाबतही?

भारतातल्या कम्युनिस्टांच्या सद्सद्विवेकबुद्धीवर अनेक "चुकांचा" बोझा आहे यांत शंका नाही. पण त्या मान्य करण्याचे धैर्यदेखील त्यांनी दाखविलेले आहे. तसे करतांना देखील त्यांनी "कबुलीजबाब" देण्याच्या मनोभूमिकेतून ते केलेले नाही. तर चुका मान्य करणे, झालेल्या चुकांपासून शिकणे, त्यांची पुनरावृत्ती होणार नाही याविषयी जागरुक राहणे आणि छोट्या चुकांचे रुपांतर "हिमालयाएवढ्या चुका करण्यात" होऊ न देणे हीच क्रांतिकारक चळवळीची कसोटी असते. हजारो पापे करणाऱ्या, वारंवार मार्ग बदलणाऱ्या किंवा मध्येच "इकडून" "तिकडे" जाणाऱ्या किंवा कोल्हांटवड्या मारणाऱ्या कोणत्याही भांडवलदारी पक्षाने आपण पूर्वी चुकलो हे कधी तरीमान्य केले का ? उलट आपण पूर्वी कधी चुकलोच नाही आणि आतादेखील बरोबरच आहोत असा हेकेखोरपणा अन मुजोरीच ते करतात. त्यांचे वर्तन म्हणजे संधिसाधूपणाचा आदर्श पाठच असतो, – राजकारण म्हणजे संधिसाधूपणा असे आज जे समिकरण झालेले दिसते अन "राजकारणी" लोकांबद्दल सर्वसामान्य जनतेमध्ये जो अविश्वास आणि साशंकता आढळून येते त्याचेही कारण तेच आहे.

पण सोविएत क्रांती अन समाजवाद याबद्दलचे सर्वच "गैरसमज" निर्माण झाले त्याचे मूळ गुन्हेगार कम्युनिस्ट असे नाहक आरोप त्यांच्या माथी मारू नका. अज्ञान आणि पूर्वग्रह यांची भली जाडजूड भित फोडून गेल्या पाच दशकांमध्ये समाजवाद आणि सोविएत समाजाने मिळविलेल्या यशःसिद्धीचा प्रचार आजवर कम्युनिस्टांनी नव्हे तर कुणी केला ? आजवर खाडिलकरांनी आपल्या कानांवर पडदा पाडून घेतला अन डोळे मिटून घेतले आणि आज प्रत्यक्ष तिथे जाऊन आल्यानंतर त्यांच्या कानाचे पडदे फाटले अन त्यांचे डोळे खाडकन उघडले याचा दोष कम्युनिस्टांकडे कसा काय जातो ? १९३० सालच्या ऐतिहासिक कॉन्ग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव जो पास झाला त्यापूर्वी दीर्घकाळ संपूर्ण स्वातंत्र्याच्या घोषणेचा प्रचार संघटित करण्यात कम्युनिस्ट नव्हते तर कोण होते ? सरंजामदारी नष्ट करून 'कसेल त्याची जमीन' याची हमी देणाऱ्या जमीनसुधारणा कायद्याच्या मागणीचा पुनरुच्चार करून कष्टकरी जनसमुदायांचे प्रश्न वेशीवर टांगून भारतीय स्वातंत्र्याला खराखुरा अर्थ प्राप्त करून देण्यासाठी लढे लढवले ते कुणी ? चालू शतकाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दशकापासून कामगार, किसान, विद्यार्थी इ.च्या वर्गीय जनसंघटना उभारण्याचा प्रारंभ करून इतरांना साहाय्य कम्युनिस्टांनी नव्हे तर कुणी केले ? त्यात इतरही होते आणि त्यांचा सहभाग विसरता येण्यासारखा नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०६०
दा. क्र. २२.३५३
निषेध ग्रंथालय

इतिहासात त्या साऱ्यांची नोंद आहे. पण ते ज्याला दिसत नाही आणि म्हणून तो जर कम्युनिस्टांचा सहभाग नाकारील तर त्याच्या डोळ्यांत मोतिबिंदू झाला आहे असेच म्हणावे लागेल. "ज्याचे माप त्याच्या पदरी टाकावे" अशी एक म्हण आहे. तेलंगणात रझाकारांविरुद्ध लढा देऊन हजारो कार्यकर्त्यांचा बळी देऊन कसणाऱ्या शेतकऱ्यांना जमिनीचे वाटप करण्यात कम्युनिस्टांनी पुढाकार घेतला म्हणूनच ना तथाकथित "भूदान" "आंदोलन" आणि भूमिहिनांना जमीन वाटप सुरू झाले? अशी जंत्री फार मोठी देता येईल. आजदेखील, साम्राज्यशाहीविरोधी, जागतिक शांततेसाठीच्या लढ्यात, राष्ट्रीय एकता आणि एकात्मता, सर्व प्रकारच्या जातीयतावादी, जमातवादी आणि फुटीरतावादी शक्तींविरुद्ध पुढाकार कम्युनिस्टांचाच आहे. ह्या सर्व लढ्यांमध्ये, मी पुनः सांगतो, चुका झाल्या परंतु त्याहून अधिक यशप्राप्तीही झाली. ज्यांना राजकीय हितसंबंध साधायचेत तेच फक्त यशप्राप्तीकडे डोळेझाक करतात आणि कम्युनिस्टांच्या खऱ्या आणि खोट्या चुकांचे तुणतुणे वाजवीत बसतात. पण खाडिलकरांनी त्यांच्या कळपात का जावे? पूर्वीचे काही कम्युनिस्टदेखील यशःसिद्धींकडे डोळेझाक करून पक्षावर चिखलफेक करताना दिसतात तेदेखील पक्षविरोधी शक्तींचे उखळच पांढरे करीत आहेत. ज्या थाळीत जेवायचे त्याच थाळीत थुंकायचे किंवा त्याच थाळीला भोक पाडत बसायचे असल्यापैकी आम्ही नाही.

आजवर ह्या दिशेने झालेले परिश्रम आणि त्याग जर कवडी मोलाचा असता तर समाजवादाची घोषणा आणि उद्दिष्ट आज जे सार्वत्रिक झालेले आहे व सर्वसामान्य जनमानसाची त्याने जी पकड घेतली आहे ती आज इतकी प्रभावी झाली नसती, — समाजवादाचे वैज्ञानिक स्वरूप भ्रष्ट करण्याचे निरनिराळ्या बाजूंनी जे प्रयत्न होत आहेत त्यापासून समाजवादाचे संरक्षण करणे आज सर्वात महत्त्वाचे आहे.

(११) क्रांतिकारी सिद्धांत आणि व्यवहार यांची गतिमान-परस्परावलंबी एकात्मता !

"प्रॅक्टिकल सोशॅलिझम" हया शब्दप्रयोगातील "प्रॅक्टिकल" (व्यवहार्य–व्यावहारिक) हया शद्वावर भर दिल्यास हा शद्व, हया समाजवादाची पाळेमुळे कोणत्याही सिद्धांतामध्ये रुजलेली नाहीत हे दर्शवितो. सर्व प्रकारच्या सिद्धांतांपासून आणि विचारसरणीपासून तो सर्वस्वी "मुक्त" आणि 'स्वतंत्र' आहे. हा एक अगदी व्यावहारिक – एखाद्या कृतिशील व्यक्तीचा, कसल्याही सिद्धांताविषयी डोक्याला शीण न घेता कार्ये रेटून नेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचा दृष्टिकोन आहे असे त्यावरून भासेल. काही वर्तुळांमध्ये असं म्हणण्याची एक फॅशन पडून गेलेली आहे की आपण कार्याशी प्रत्यक्ष कृतीशी बांधले गेलेलो आहोत. आणि सिद्धांतावर आपला वेळ आपण व्यर्थ दवडत नाही. म्हणजेच काही बुद्धिजीवी लोकांची ती केवळ एक चैन असते. असाच त्याचा गर्भितार्थ असतो. पण सिद्धांत म्हणजे काय ?

सिद्धांत याचा अर्थ प्रत्यक्ष व्यवहारात आलेल्या अनुभवातून काढलेला सर्वसाधारण नियम आणि त्या आधारे वास्तव जगाचे आकलन. सर्वसाधारण ज्ञानाची ती एक विशिष्ट पद्धती आणि वास्तवतेच्या अंगोपांगांचे स्पष्टीकरण असते. ज्या जगात लोक राहतात आणि श्रम करतात त्या लोकांच्या जाणिवेची आणि ज्ञानाची ती एकूण गोळाबेरीज असते. त्या दृष्टीने विचार करता प्रत्येक सिद्धांताची कसोटी सरतेशेवटी प्रत्यक्ष व्यवहारावरच लागते. आणि त्यातील सत्यतेचा तोच एक निकष असतो.

आणि म्हणूनच, आम्ही मार्क्सवादी असे मानतो की सिद्धांत आणि व्यवहार हे अतूटपणे परस्परांशी निगडीत आहेत. परस्परांपासून स्वतंत्र असे अस्तित्व त्यांना नसते आणि म्हणूनच ते परस्परांवर सतत परिणाम करीत असतात. आमच्या संकल्पनेमध्ये, सर्व प्रकारची पिळवणूक नष्ट करण्यासाठी जनसमूहांच्या प्रत्यक्ष चळवळी मार्क्सवादाच्या विज्ञानावर आधारित सिद्धांताशी मिळत्याजुळत्या असतात. कारण सरतेशेवटी भांडवलशाही नष्ट करून त्याजागी समाजवाद प्रस्थापित करण्याकरिता मार्क्सवाद समाजाच्या गतीचे

नियम शोधून काढतो. क्रांतिकारी व्यवहार आणि क्रांतिकारी सिद्धांत यांच्यातली ही एकरूपता आहे. त्यापैकी कोणताही एक घटक दुसऱ्यापासून अलग होऊ शकत नाही.

व्यवहाराची पाळेमुळे सिद्धांतामध्ये रुजलेली असण्याची गरज नाही किंवा तशी ती नसतात हा एक निव्वळ "भ्रम" आहे आणि वर्ग-विभक्त समाजामध्ये बौद्धिक आणि शारीरिक श्रम यांच्यात भेद केल्याकारणाने हा "भ्रम" निर्माण होतो. अशा परिस्थितीत, एका टोकाला, सैद्धांतिक पोकळ चर्चा, स्वप्नरंजन किंवा हवेत मनोरे बांधणे तर दुसऱ्या टोकाला केवळ प्रत्यक्ष कृती असे घडते. दोन्हींचा परिणाम एकच होतो. प्रचलित भांडवलदारी समाजरचना कायम टिकून राहणे.

खाडिलकरांच्या "सोशॅलिझम"ला आधाराला कोणत्याही शास्त्रशुद्ध सिद्धांताचा पाया नाही, त्याला पोषणाला साधन नाही, मार्गदर्शनाला दीपगृह नाही की पुढील प्रगतीसाठी अनुभवावरून सर्वसाधारण निष्कर्ष काढायला वाव नाही. एखाद्या अथांग सागरावर सुकाणू नसलेले जहाज येणाऱ्या प्रत्येक वादळाच्या लाटेवर हेलकावे खाते तसा त्यांचा समाजवाद आहे. असले जहाज कधीतरी बंदराला लागेल काय? असली पद्धती टिकू तरी शकेल काय?

खचित नाही हे उघड आहे. "सिद्धांताला नकार आणि" "व्यवहारा"चे सिद्धांतीकरण यामुळे हा व्यवहार भांडवलदारी विचारसरणीच्या हल्ल्यांना बळी पडून त्यांच्या अंकित झाल्याखेरीज राहणार नाही. आणि असे का?

त्याचे एक कारण असे की, आजच्या आपल्या समाजात भांडवलदारी विचारसरणीचे प्रभुत्व आहे. ती भूतकालाची परिणती आहे. दुसरे असे की, तिची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत, युगानुयुगांचे संस्कार आणि सूक्ष्मता तिने आत्मसात केलेली आहे आणि म्हणूनच ती नवोदित समाजवादी समाजरचनेच्या आणि तिच्या पाळेमुळांपेक्षा अधिक सामर्थ्यशाली आहे. शिवाय, तिच्या अखत्यारीमध्ये सर्वसामान्य माणसाच्या विचारांवर आणि कृतीवर प्रभाव पाडण्यास समर्थ अशी प्रचंड साधनसामुग्री आहे.

"समाजवाद" या नावाने जे काही सामाजिक-आर्थिक बदल घडवून आणले पाहिजेत त्याची अत्यंत कळकळ खाडिलकरांना वाटते हे गृहित धरले तरी ते बदल काही एखाद्या चमत्काराने किंवा "दैवी देणगी" म्हणून आस्मानातून पडणार नाहीत. तसेच केवळ "मनोराज्यमय कल्पना" करूनही ते घडणार नाही. इतिहासाने आपणास शिकविले आहे की, उत्पादन साधनांवर कब्जा असणारे, ती साधने शासनाच्या हाती स्वेच्छेने संपूर्द करणार नाहीत. एखाद्या सरकारने एखाद्या दुसऱ्या गिरणीचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी

किंवा भांडवलशाही अधिक काळ टिकून राहावी ह्या दूरदृष्टीने तिचे सुसूत्रीकरण करण्याच्या हेतूने काही उपाययोजना करण्यासाठी कायदे करणे वेगळे आणि प्रचलित भांडवलदारी पद्धती बदलणे वेगळे.

तथाकथित समाजवादी पक्षांच्या पुढाकाराखाली असलेली अनेक तथाकथित "समाजवादी सरकारे" आपल्यासमोर आहेत. ती देखील कोणत्याही प्रकारच्या विचारसरणीपासून "मुक्त" आहेत–किमान मार्क्सवादी विचारसरणीपासून मुक्त आहेत. त्याचा परिणाम काय दिसतो? त्यांनी प्रगती केली आहे. विकास साधला आहे यांत शंका नाही. युरोपमध्ये तर त्यांच्यापैकी काही तर अत्यंत प्रगत देश आहेत. परंतु त्यांची प्रगती भांडवलदारी दिशेनेच होत आहे आणि भांडवलदारी चौकटीमध्येच त्यांचा विकास होत आहे. सर्वसामान्य जनतेचे राहणीमान सुधारण्यासाठी कमी-अधिक प्रमाणावर समाजकल्याणकारी उपाययोजना त्यांच्या तोंडावर फेकलेल्या आहेत.

म्हणून खाडिलकरांच्या "सोशॅलिझम"मध्ये जर सध्याच्या पिळवणूक, दारिद्र्य, निरक्षरता, दैन्य, दुःख असलेल्या समाजरचनेत आमूलाग्र आणि क्रांतिकारक परिवर्तन आध्याहृत असेल तर असे परिवर्तन क्रांतिकारक सिद्धांतामधून स्फुरलेल्या क्रांतिकारक व्यवहाराद्वारेच घडून येऊ शकेल. आणि म्हणूनच लेनिन यांनी म्हटले आहे की, "क्रांतिकारक सिद्धांताखेरीज क्रांतिकारक व्यवहार होऊच शकत नाही."

समाजात असे परिवर्तन घडवून आणण्यास समर्थ ठरू शकेल अशा क्रांतिकारक शक्तींबाबतही खाडिलकरांनी प्रश्न उपस्थित केलेला नाही वा त्याचे उत्तरही कोठे आढळत नाही. त्यांनी फक्त एवढेच सुचविले आहे की, प्रॅक्टिकल सोशॅलिझमच्या उद्दिष्टास वाहून घेतलेल्या पोलादी शिस्तीच्या तयार कार्यकर्त्यांच्या फौजेची फक्त गरज आहे. त्या अर्थाने विचार करता, भारतामध्ये समाजवादी परिवर्तन घडवून आणण्याची खाडिलकरांची तीव्र तळमळ वैज्ञानिकदृष्ट्या साध्य होण्यासारखे उद्दिष्ट राहत नाही. आणि ते एक "स्वप्नरंजन" ठरते––देशातली सध्याची अवस्था पाहून धक्का बसलेल्या एखाद्या सत्प्रवृत्त आणि भावनाशील व्यक्तीचे केवळ एक मनोराज्य ठरते. ज्याला कुठे बळावे, पुढे कसे जावे आणि इच्छित परिवर्तन कसे घडवून आणावे तेच समजत नाही.

ह्या प्रश्नाबाबतचा खाडिलकरांच्या मनाचा गोंधळ, कसल्याही सिद्धांताशिवाय "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"वर जेव्हा ते वारंवार भर देतात तेव्हा उघडकीस येतो. ते स्वतःच एका ठिकाणी, सोविएत संघराज्यात समाजवादाच्या यशाची कारणे सांगताना मार्क्सवाद-लेनिनवादाच्या शिकवणुकीच्या मुशीत घडलेले ध्येयवादी कार्यकर्ते असलेल्या "पक्ष" संघटनेच्या भूमिकेवर भर देतात.

कदाचित त्यांच्या म्हणण्याचा अर्थ "सैद्धांतिक जडणघडण" असा नसेलही. तर केवळ "काम करण्याबाबतचा निर्धार" अन "ते कसे करावे याचे तांत्रिक ज्ञान" एवढाच असेल. आपल्या पुराणग्रंथातील एका उदाहरणाचे स्मरण मी त्यांना देऊ इच्छितो. कुरुक्षेत्रावर, धनुर्धर अर्जुनाला शस्त्रास्त्रांचे, रणक्षेत्रातील डावपेचांचे संपूर्ण ज्ञान होते. धैर्य आणि निर्धार यांचीही कमरतता नव्हती. तथापि, भगवान कृष्णांनी युगांतराचे तत्त्वज्ञान त्याला शिकवून त्याला सैद्धांतिकदृष्ट्या तयार करून त्याला आपले "विश्व-रूप" दर्शन घडवून स्फुरण देईपर्यंत तो लढ्यास तयार होत नव्हता. त्यानंतरच त्या धनुर्धराने आपले गांडीव धनुष्य उचलले अन स्वतःला लढाईत झोकून दिले.

प्रचलित समाजरचनेचे समाजवादी समाजरचनेमध्ये परिवर्तन करण्याचा सिद्धांत म्हणजेच मार्क्सवाद–लेनिनवाद. भांडवलशाहीचे उच्चाटण करून समाजवादात परिवर्तन करणे आणि कम्युनिझमच्या दिशेने आगेकूच करणे याचे सिद्धांत आणि डावपेच म्हणजेच मार्क्सवाद-लेनिनवाद. आणि म्हणूनच आपल्या पूर्वीच्या युगातील लोक कालमानपरिस्थितीनुसार सिद्धांत वा विचारसरणी असल्याखेरीज ज्याप्रमाणे व्यवहार करू शकत नव्हते त्याचप्रमाणे आपण देखील आजच्या युगात क्रांतिकारक सिद्धांताखेरीज क्रांतिकारक व्यवहार करू शकणार नाही.

तथापि, याबाबत पुढे आपण नंतरच्या विभागात अधिक चर्चा करू.

खाडिलकरांच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"चे चांगल्या शब्दांत स्पष्टीकरण करायचे तर सर्वच प्रकारच्या पोथीवादाचा अन ठोकळेबाजीचा द्वेष आणि विरोध असे करता येईल. "पोथीनिस्ट" या शब्दांचा वारंवार तिरस्कारयुक्त उल्लेख त्यांच्या लेखनात आढळून येतो. तसे असेल, तर–खाडिलकरांना "पोथीवाद"–मग तो कोणत्याही जातीचा वा धर्मपंथाचा असो–तो पाताळात गाडून टाकायचा असेल तर त्यात आम्हीही त्यांच्याशी साथीला आहोत. आम्ही मार्क्सवाद्यांनी मार्क्सवादाला कधीही पोथी मानलेली नाही तर प्रत्यक्ष कृतीचा मार्गदर्शकच मानले आहे.

रशियातल्या मार्क्सवाद्यांना क्रांतीनंतर प्रदीर्घ काळ उलटून गेल्यानंतर सोविएतमधील वास्तवतेने हे मान्य करायला लावलेले नाही की, ज्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात त्यांनी आता पोथीवाद झुगारून दिला अन ते आता वास्तववादी बनलेयत. लेनिनने फार पूर्वीच निःसंदिग्ध शब्दात स्पष्टपणे दाखवून दिले होते :

"मार्क्सचा सिद्धांत हा इतिहासाची सर्वसाधारण आणि तत्त्वज्ञानात्मक नियती आहे किंवा विशिष्ट सामाजिक–आर्थिक रचनेचे स्पष्टीकरण याखेरीज अधिक काही नाही असे कोणाही मार्क्सवाद्याने कधी मानले नाही.

कोणाही मार्क्सवाद्याने आपली सामाजिक लोकशाहीवादी मते प्रत्यक्ष वास्तवतेशी असलेल्या सुसंगतीखेरीज आणि विशिष्ट सामाजिक-आर्थिक संबंधांच्या इतिहासाखेरीज अन्य कशावरही आधारून बनविलेली नाहीत. आणि तसे तो करूही शकला नसता, कारण, सिद्धांताची ही गरज मार्क्सवादाचा संस्थापक मार्क्स याने स्वतः अगदी निश्चित रूपाने आणि स्पष्टपणाने घोषित केलेली होती आणि आपल्या एकूण विचारसरणीची ती कोनशिला बनविलेली होती."

आणि पुढे !. . . . .

"मार्क्सच्या सिद्धातांमधून मार्क्सवादी त्यातल्या बहुमोल पद्धती अगदी निःसंकोचपणे स्वीकारतात. त्याखेरीज सामाजिक संबंधांचे स्पष्टीकरण करणेच अशक्य आहे. परिणामी, ह्या संबंधांबाबतची त्यांची मते वास्तवतेशी असलेल्या त्यांच्या सुसंगतीच्या निकषावरच अवलंबून असतात. कोणत्याही प्रकारच्या अमूर्त कल्पनांवर किंवा तसल्या काहीतरी मूर्खपणावर अवलंबून नसतात."

एखादा ग्रंथ हा "पवित्र ग्रंथ" कुणीही मानण्याची गरज नाही अथवा कोणा प्रेषिताचा तो काहीतरी साक्षात्कार आहे असे मानून त्याची पूजाही करण्याची गरज नाही. तथापि, त्यापासून शिकायला हरकत नाही, त्यातले उतारे द्यायलाही हरकत नाही. सर्वसाधारण अनुभवाचा किंवा ज्ञानाचा आपण जसा उल्लेख करतो तसे अपवादात्मक लेखकांचे लेखन हे त्यासाठीच असते. आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ स्वतः खांडिलकर वेद-ग्रंथपुराणांचे दाखले देत नाहीत का, जणू काही त्यांनी मानव आणि त्याचा जागतिक दृष्टिकोन याबाबत अखेरचा शब्द उच्चारलेला आहे, अशा अर्थाने ? मग "पोथीवाले" कोण आहे ते त्यावरूनच दिसून येते.

येथील काही कम्युनिस्टांच्या काही विचारांमध्ये वा काही कृतींमध्ये "पोथीवाद" वा "ठोकळेबाजी"ची काही लक्षणे असतीलच तर भारतातील गुंतागुंतीच्या वास्तवतेच्या जाणीवेतील एक उणीव म्हणून आणि मार्क्सची पद्धती विधायक रीतीने लागू करण्याची त्याची अक्षमता म्हणून तिच्यावर टीका करावयास हरकत नाही, परंतु त्यावरून मार्क्सवादाचा उणेपणा सिद्ध करणे गैर आहे.

(१२) सर्वसाधारण गतिनियमांची संघर्षणात्मक एकता आणि भारतातील परिस्थितीची वैशिष्ट्ये !

"पोथीवादा"विरुद्धची चर्चा पुढे चालू करताना येथे दुसरा एक प्रश्न आपण स्पष्ट करूया. सोविएत संघराज्यामध्ये खाडिलकरांच्या समजुतीप्रमाणे अस्तित्वात असलेल्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"चा पुरस्कार करताना खाडिलकर म्हणतात :

"भारतात समाजवाद यायचा असेल तर तो आपल्या इथल्या लोकांच्या प्रयत्नांनीच यायला हवा; तरच तो खऱ्या अर्थाने भारतीय असेल. आपला देश रशिया किंवा चीनइतकाच सामर्थ्यशाली बनेल आणि आपल्या व्यवहारात कुणीदेखील ढवळाढवळ करू शकणार नाही. पण रशियन किंवा चिनी सैन्याच्या मदतीने जर तो आला तर पूर्व-युरोपीय देशांप्रमाणे दुसऱ्या दर्जाचे राज्य असे त्याचे स्वरूप राहील."

पूर्व युरोपीय देशांबाबत खाडिलकरांच्या अनुदार उद्‌गारांकडे तूर्त दुर्लक्ष करू. पण त्यांना आम्ही छातीठोकपणे खात्री देऊ शकतो की, "क्रांती" ही निर्यात करण्याची एक वस्तू आहे असे कम्युनिस्टांनी कधीही मानलेले नाही. तथापि आंतरराष्ट्रीय प्रतिगामी शक्तींनी कित्येक देशांमध्ये प्रतिक्रांत्यांची निर्यात केलेली आहे अन् त्या तेथे लादलेल्या आहेत. सोविएत किंवा चीन आमच्या देशात कधीतरी समाजवाद आणेल याची आम्ही भारतीय कम्युनिस्ट वाट पाहत बसलेलो नाही. ते एक क्रांतिकारक कार्य आहे अन ते आपणा सर्व भारतीय लोकांनाच पूर्ण करावे लागणार आहे. अर्थात, त्यासाठी आंतरराष्ट्रीय भ्रातृभावनेतून जगातल्या सर्व पुरोगामी आणि समाजवादी शक्तींकडून आपल्याला भ्रातृभावपूर्वक सहाय्य व पाठिंबा मिळेल याची आम्ही खात्री बाळगतो. आणि पुढे हे कार्य करीत असताना जागतिक घटनांच्या विकासक्रमाचाच एक भाग म्हणूनच आपल्या देशातल्या परिस्थितीला अन वास्तवतेला धरूनच ते कार्य आपल्याला पार पाडावे लागेल. याचाच अर्थ असा की रशियन अथवा चिनी अथवा अन्य कोणत्याही देशातल्या नमुन्याबरहुकूम भारतात समाजवाद येणार नाही. प्रत्येक देशात समाजाचे क्रांतिकारक परिवर्तन ज्याच्या त्याच्या स्वतःच्या

मार्गानेच घडून येईल. प्रत्येक राष्ट्राला इतरांपासून शिकणे शक्य आहे अन तसे त्याने शिकावे, त्यांच्या अनुभवांपासून लाभ घ्यावा, त्यांनी केलेल्या चुका टाळाव्यात, म्हणजे नव्या समाजरचनेच्या बाळंतकळा कमी करणे त्यांना शक्य होईल. परंतु प्रत्येक राष्ट्राला आपल्या येथील वास्तव परिस्थिती आणि वैशिष्ट्ये यांना अनुसरून कमी-अधिक प्रमाणात निरनिराळ्या राजकीय स्थित्यंतरातून जाणे भाग असते. हनुमान उड्डाण मारून ही स्थित्यंतरे टाळता यावयाची नाहीत अथवा कायदेशीर उपाययोजना करून वा फतवे काढून अडचणी, अडथळे बाजूस सारता येणार नाहीत. याबाबत लेनिनच्या निःसंदिग्ध वचनाची आपण आठवण ठेवली पाहिजे; "सर्व देश समाजवादाकडेच जातील. हे अगदी अटळ आहे, परंतु सर्वच देश तंतोतंत सारख्याच मार्गाने जाऊ शकणार नाहीत. प्रत्येक देश समाजजीवनाच्या विविध अंगोपांगात घडून येणाऱ्या विभिन्न समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये स्वतःच्या विशिष्ट प्रकारच्या लोकशाहीची, विशिष्ट प्रकारच्या कामगारवर्गीय हुकूमशाहीची काही तरी नवी भर घालील.

भारतीय अनुभवाच्या आधारे आपण याचे स्पष्टीकरण करू या :

भारतामध्ये भांडवलदारवर्गाच्या पक्षाचा उदय झाला तो साम्राज्यशाही-विरोधी स्वातंत्र्यलढ्यातून उदयास आलेली एक संघटना म्हणूनच झाला ही वस्तुस्थिती मान्य करणे आपणास क्रमप्राप्त आहे. त्या लढ्यात ती विजयी झाली आणि तिने सत्तासूत्रे हाती घेतली आणि आजतागायत स्वातंत्र्यलढ्याच्या गौरवाच्या सूर्यप्रकाशातच ती न्हात आलेली आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्या अनेक थोर थोर नेत्यांसारख्यांनी त्या संघटनेचे नेतृत्व केले. भारतीय जनमानसामध्ये या थोर नेत्यांना मोठे मानाचे अन आदराचे स्थान होते अन ते आजतागायत टिकून आहे. इतर अनेक निरनिराळ्या प्रवाहांनी स्वातंत्र्य-चळवळीमध्ये लक्षणीय त्याग केला. तथापि भारतीय स्वातंत्र्य केवळ आपल्याच पक्षाने आणले आणि त्यानंतरच्या यशोसिद्धी देखील केवळ आपल्याच प्रयत्नांनी साध्य झाल्या अशी घमेंड मारून भारतीय भांडवलदारवर्ग याचे सारे श्रेय स्वतःच उपटू पहात आहे. एक वर्ग या दृष्टीने भारतीय राष्ट्रीय भांडवलदारवर्गाने सत्तारूढ साम्राज्यवादी वर्गाविरुद्धच्या प्रखर लढ्यात आणि नंतरच्या परिस्थितीमध्ये अनेक क्षेत्रांमध्ये अनेक प्रसंगी साम्राज्यवाद्यांशी भागिदारी करून स्वतःचे सामर्थ्य वाढविले. तथापि, साम्राज्यशाहीबरोबरचे त्यांचे अंतर्विरोध अद्याप बोथट झालेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या धोरणांमध्ये त्या अंतर्विरोधांचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. एका बाजूला साम्राज्यवादी देशांबरोबरची भागिदारी, बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्तद्वार, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून भरमसाठ दराने कर्जे आणि त्यांच्या जाचक अटी स्वीकारणे आणि त्याचबरोबर स्वतंत्र आर्थिक

विकास, स्वावलंबी विकास, सार्वजनिक क्षेत्राची उभारणी आणि समाजवादी देशांबरोबरचे आर्थिक व व्यापारी करार अशा तऱ्हेचे आर्थिक धोरणाचे परस्परविरोधी स्वरूप असल्याचे दिसून येते.

भारतासारख्या असमान विकासाच्या विस्तीर्ण देशात – (भांडवलदारी विकासाचा जो अटळ परिपाक असतो)– मक्तेदारीपासून छोट्या मालमत्तादारांपर्यंत परस्परविरोधी विशिष्ट हितसंबंध असलेल्या विभिन्न थर आणि विभाग यांनी मिळून बनलेला असा भांडवलदारवर्ग आहे. त्याचबरोबर लोकांच्या प्रादेशिक भावनांचे भांडवल करणारे काही प्रादेशिक भांडवलदार देखील त्यांत अंतर्भूत आहेत.

स्वातंत्र्योत्तर झालेल्या औद्योगिक विकासाच्या परिणामी एक फार मोठा कामगारवर्गही उदयास आलेला आहे. अन्य कोणत्याही विकसनशील देशापेक्षा हा वर्ग त्या प्रमाणात मोठा आहे. तथापि त्यापैकी बहुसंख्य कामगार अद्याप संघटित झालेले नाहीत आणि जे काय थोडेफार संघटित झालेले आहेत ते देखील निरनिराळ्या संघटनांमध्ये विभक्त झालेले आहेत आणि निरनिराळ्या राजकीय पक्षांमागे ते विभागलेले आहेत. आणि म्हणूनच समाजामध्ये संघटित कामगारवर्गाने जी भूमिका पार पाडावयास हवी ती पाडण्यास तो अद्याप समर्थ नाही. भारतातील कामगारवर्गीय एकजुटीचे हे विशिष्ट स्वरूप लक्षात घेऊनच देशातील ट्रेड युनियन संघटना आणि महामंडळे यांच्या राष्ट्रीय मोहीम समितीची निर्मिती करण्यात आली. तेवढ्याचसाठी डाव्या विचारांच्या ट्रेड युनियन संघटनांची एकजूट, असंघटित कामगारांना सुसंघटित करण्याचे आवाहन इत्यादि कृतीची पावले त्या दृष्टीनेच टाकण्यात येत आहेत. त्यामुळेच सामाजिक आर्थिक आणि राजकीय प्रश्नांमध्ये अगदी अलिकडे प्रभावी भूमिका बजावणे कामगारवर्गाला शक्य झाले.

भारतासारख्या देशात मूलगामी सामाजिक परिवर्तनाचा विचार करताना व्यापक प्रमाणावर असलेल्या किसान वर्गाचा आणि शेतमजुरांचा विचार दूर सारणे केवळ अशक्य आहे. भारतात किसान संघटना आणि शेतमजूर संघटनांची उभारणी करणे आणि त्यांच्या विशिष्ट मागण्यांसाठी लढ्यांत पुढाकार घेणे व त्यांना पाठिंबा देणे त्यामुळेच अत्यावश्यक बनते.

एक विकसनशील देश यादृष्टीने आपल्या येथे एक फार मोठा मध्यमवर्गीय जनसमूह आहे आणि त्यात दिवसेंदिवस फेरबदल जलदगतीने होत आहे. विकासाच्या भांडवलदारी मार्गामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या सतत वाढणाऱ्या किंमती, वाढता चलनफुगवटा, वाढती बेकारी, सतत वाढत जाणारी असमानता, सामाजिक नीतिमूल्यांचा ऱ्हास ही प्रक्रिया अपरिहार्यपणे घडून येते. अशा

परिस्थितीत, युवक, विद्यार्थी, पुरोगामी बुद्धिजीवी विभाग यांच्या संघटना अन चळवळी यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते.

या विस्तीर्ण देशाचे बहुभाषी, बहुधर्मीय, बहुवंशीय स्वरूप सामाजिक आणि राजकीय जीवनात जातिभेदाना असलेले स्थान, अत्यंत विकसित विभाग आणि अत्यंत मागासलेल्या आदिवासी जमाती यांच्यातील भीषण दरी, इ. घटकांचा विचार करणे कोणीही सच्चा मार्क्सवादी टाळू शकत नाही.

एका भारतीय राष्ट्राच्या अंतर्गत अनेक राष्ट्रके, अन उप-राष्ट्रके यांचा उदय ही एक अशी घटना आहे की ही बाब चुकीच्या पद्धतीने हाताळल्यास त्यामुळे प्रादेशिक तणाव वाढून साहसवादी आणि फुटीर प्रवृत्तींना डोके वर काढण्याची संधी मिळते. भारताच्या विशिष्ट परिस्थितीत राष्ट्रीय एकता अन एकात्मता यांच्या संरक्षणासाठी सर्व प्रकारच्या जातीयवादांविरुद्ध, जमातवादाविरुद्ध आणि अन्य फुटीर प्रवृत्तींविरुद्ध तत्त्वनिष्ठ लढा क्रमप्राप्त ठरतो.

संसदीय लोकशाही आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विविध संस्था यांचा भारतीय राजकीय जीवनावर फार मोठा प्रभाव पडला आहे. भारतातील विकासप्रक्रिया आणि लोकांच्या बदलाच्या आशा यांच्यावर देखील फार मोठा प्रभाव पडला आहे. "पैशा"चे सामर्थ्य आणि "गुंडांचे सामर्थ्य" यांची वाढ होऊन देखील आपल्या दैन्यावस्थेविरुद्ध लोकांना संघटित करण्यास आणि निरनिराळ्या राजकीय प्रवाहांचा लोकांवरील प्रभाव आजमावण्यास सांसदीय लोकशाहीमध्ये वाव मिळतो. ह्या प्रक्रियेमध्ये भारतातले मार्क्सवादी केवळ सहभागी होतात एवढेच नव्हे, तर सांसदीय संस्था आणि लोकशाही हक्कांवर सत्तारुढ वर्गाकडून आणि त्यांच्या पक्षांकडून होणाऱ्या हल्ल्यांपासून आणि ते हक्क डावलले जाण्यापासून त्यांचे संरक्षण करण्यातही ते हिरीरीने व चिवटपणे पुढाकार घेतात.

आजच्या जगात भारताची भूमिका लक्षात घेता जागतिक शांततेचे संरक्षण, साम्राज्यवादी युद्धखोरी आणि शस्त्रास्त्रस्पर्धा यांना विरोध करण्याचे धोरण सरकार अवलंबीत असतानाच देशांतर्गत प्रश्नांबाबत सरकार जनहितविरोधी, लोकशाहीविरोधी धोरणाचा अवलंब करते. त्यामुळे सर्वच देशप्रेमी आणि पुरोगामी शक्तींसमोर अनेक गुंतागुंतीचे डावपेचात्मक प्रश्न उभे राहतात.

प्रदीर्घ प्राचीन आणि विकसित संस्कृतीचा वारसा लाभलेल्या भारतासारख्या देशात सामाजिक राजकीय जीवनात रुढी-परंपरा फार मोठी भूमिका बजावतात आणि सर्वच पक्षांच्या वर्तनावर आणि प्रभावावर परिणाम करतात. भारताचा भूतकालीन वारसा आणि आजचे प्रश्न यांचा संबंध अतूट आहे. जो कोणी हे जाणून घेणार नाही तो सच्चा मार्क्सवादी नव्हेच. त्याचबरोबर त्याच ऐतिहासिक परंपरेतील काय स्वीकारले पाहिजे अन काय त्याज्य ठर-

विले पाहिजे, मौल्यवान वारसा म्हणून काय जपले पाहिजे अन पुढे घेऊन गेले पाहिजे अन काय झिडकारले पाहिजे त्यात जो फरक करू शकत नाही तो देखील खरा मार्क्सवादी नाही. समाजवादासाठी लढणारा लढवय्या तर नाहीच नाही.

वरील मजकुरावरून हे स्पष्ट होईल की सर्व भारतीय मार्क्सवाद्यांपुढे एक आव्हान उभे आहे. मार्क्सवादी सिद्धांतातील त्रिकालाबाधित तत्त्वांची भारतातील वास्तवतेच्या ठोस प्रश्नांशी सांगड घालणे, सर्वसाधारण नियम विशिष्ट परिस्थितीला लागू करणे हे ते आव्हान आहे. हे यशस्वीरित्या करण्यात मार्क्सवादी समर्थ ठरलेत काय? हा एक वादग्रस्त अन व्यापक असा प्रश्न आहे. त्यात शिरणे येथे आवश्यक नाही अन शक्यही नाही. पण एवढे मात्र निश्चित की ह्या क्षेत्रात टीका आणि आत्मटीका करण्यास बराच वाव आहे. परंतु त्याची सुरुवात करायची तर त्यासाठी ह्या प्रश्नांच्या सर्व गुंतागुंतीची अन व्यापकतेची जाणीव ठेवावयास हवी.

हे सर्व घटक विचारात घेऊनच भारतीय कम्युनिस्टांनी समाजवादाकडे पोचण्याच्या राजकीय अवस्थांचा आराखडा दृष्टीसमोर ठेवला आहे आणि विकासाच्या सर्वसाधारण मार्गाच्या पायऱ्या ठरविल्या आहेत. आणि म्हणूनच समाजातल्या पिळल्या गेलेल्या सर्व वर्गांची वर्गीय युती कामगार–किसान एकजुटीच्या पायावर उभारण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. डाव्या आणि लोकशाहीवादी शक्तींची एकजूट हीच प्रचलित परिस्थितीमध्ये त्यांच्या डावपेचांचे ठोस रूप आहे. भारतीय परिस्थितीच्या वैशिष्ट्यपूर्ण तपशीलामध्येही आपशास जाता येईल. परंतु वर जो आराखडा दिलेला आहे तो खालील प्रश्न विचारण्यास पुरेसा आहे. समाजवादाकडे पोहोचण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या "नमुन्यां"चे अनुकरण करण्याची कोठे? आणि कोणत्या क्षेत्रात थोडीतरी शक्यता दिसते काय?

रशियन अथवा चिनी पद्धतीचे अंधानुकरण भारतीय कम्युनिस्टांनी केल्याचा अथवा तथाकथित आंधळी पोथीनिष्ठा त्यांनी दाखविल्याचे कोठे आढळून येते?

तेव्हा काही बाबतीत खाडिलकरांना चुकीची माहिती मिळाली असणार हे उघड दिसून येते. उदाहरणार्थ, मार्क्सवादी पोथीनुसार सर्व जमिनीचे राष्ट्रीयीकरण करण्याची घोषणा केल्याचा अन त्यामुळे शेतकरीवर्गाला समाजवादापासून दूर पळविल्याचा आरोप ते आमच्यावर करतात. पहिले असे की मार्क्सवादाने जमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे असा मंत्र कोठेही दिलेला नाही. शेतकी-प्रश्नावर निरनिराळ्या प्रकारच्या खंडांसंबंधी मार्क्सने अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत. आणि त्या संबंधीच्या अनेक भांडवलदारी सिद्धांतांचा परामर्श घेतलेला आहे. परंतु एक सार्वत्रिक उपाय म्हणून (राष्ट्रीयीकरणाचा मार्ग त्याने

कोठेदेखील सांगितलेला नाही. शेतकी संबंध, शेतजमिनीची मालकी, जमिनीची मशागत इ.चे प्रकार हे देशांच्या संख्येइतकेच असंख्य आहेत. आणि भारतासारख्या अवाढव्य देशात तर ते प्रांताप्रांतानुसार देखील भिन्न भिन्न प्रकारचे आहेत.

शांतता, भाकरी आणि जमीन ह्या तीन घोषणांवर रशियातील ऑक्टोबर क्रांती घडून आली. क्रांतीनंतर गरीब किसान आणि भूमिहीन यांच्या समित्या स्थापन करण्यात आल्या आणि क्रांतिकारकरित्या किसानांना जमिनीचे वाटप करण्यात आले. त्यानंतर एक दशकाहून अधिक काळ उलटल्यानंतर प्रत्यक्ष अनुभवाने आणि मन वळविल्यानंतर किसानांच्या मालकीच्या जमिनीच्या सहकारी सोसायटचा, सामुदायिक शेते यांची उभारणी करण्यात आली व काही शेतांचे सरकारीकरण करण्यात आले.

भारतामध्ये, जमीन सुधारणेसाठी जमीनदारी आणि मालगुजारी हक्क नष्ट करण्यासाठी, आणि कसेल त्याला जमीनवाटप करण्यासाठी आवाज सर्वप्रथम जर कुणी उठविला असेल तर तो कम्युनिस्टांनी.

कम्युनिस्ट काय सांगतात अन काय करतात याबाबत खाडिलकरांसारखी "जाणकार" व्यक्ती किती गैरसमजुती अन पूर्वग्रहाच्या आहारी जाऊ शकते ते दर्शविण्यासाठीच केवळ ह्या सर्व तपशीलाचा येथे उल्लेख केला आहे.

ह्या आणि यापूर्वीच्या विभागांचा विचार केल्यानंतर हे स्पष्ट होऊ शकेल की कोणत्याही "नमुन्या"चे अंधानुकरण करण्याचा गुन्हा भारतीय कम्युनिस्टांनी केलेला नाही. अथवा कोणत्याही तथाकथित मार्क्सवादी "मंत्रा"ची "जपमाळ" कधी जपली नाही.

याउलट त्यांच्या चुका आणि अपयश जर कशातून झाले असेलच तर ते भारतीय वास्तवतेच्या अत्यंत गुंतागुंतीच्या परिस्थितीला मार्क्सची पद्धती लागू करण्यातूनच झाल्या.

(१३) समाजवादी मानवतावाद आणि धर्म

खाडिलकर म्हणतात, "भारतातील हिंदू मनाची वेव्हलेंथ मार्क्सवादी पोथीप्रामाण्याशी जुळणार नाही. पण रशियात जे घडले आहे त्याच्याशी तत्काळ जुळणारी आहे" म्हणून, ते म्हणतात, तेथे जे घडले आहे त्याचे स्वागत करायलाच हवे. ह्याच्या समर्थनार्थ ते स्वातंत्र्यवीर सावरकरांचे वचन उद्धृत करतात.

"साम्यवाद्यांनाही कोणत्या ना कोणत्या स्वरुपात बहुसंख्य, हुषार, त्यागी म्हणून का होईना, हिंदुंच्या आणि पर्यायाने भारताच्या हिताच्या गोष्टी कराव्याच लागतील, त्यांचे सर्वच मार्ग मला आवडतील असेही नाही. पण भारत एक प्रबळ राष्ट्र ते करतीलच करतील. हे जसे निश्चित होईल तसे ते झाल्याने धर्माचे प्राबल्य कमी होईल हेही खरे. पण मी तुम्हाला विचारतो, की जुन्या रुढी, भोळसट कल्पना नष्ट झाल्या तर आधुनिक शास्त्रावर आधारलेला बहुसंख्यांना पोषक, म्हणजेच हिंदुंना आणि पर्यायाने हिंदू राष्ट्राला पोषक असा धर्म राहील ना? मग हिंदुत्वाचे आपण आग्रही लोक तरी दुसरे काय मागतो?"

येथपर्यंत, जे समाजवादीही आहेत आणि आग्रही हिंदूही आहेत त्या दोघांच्याही दृष्टीने हे ठीक. अर्थात सावरकरांचा दृष्टिकोन खाडिलकरांपेक्षा देखील अधिक व्यापक आणि अधिक विवेकी आहे. मी असं म्हणतो त्याला कारण की, "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"ची आपली संकल्पना स्पष्ट करतांना त्यात हिंदूत्वाकडे कल आणि भारतामध्ये मोठ्या संख्येने पाठिराखे असलेल्या इतर दोन धर्मांबद्दल तीव्र तिटकारा असल्याचे सतत जाणवते – ते दोन धर्म म्हणजे इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म.

सुरवातीस, क्रांती झाल्यानंतर रशियातील कम्युनिस्टांनी ख्रिश्चन आणि इस्लामी धर्मवेड कणखरपणे मोडीत काढले या विचाराने खाडिलकरांना समाधान लाभते. त्यावरून उघड दिसून येते की या प्रश्नाकडे त्यांनी आपल्या विशिष्ट रंगाच्या चष्म्यातून पाहिले. रशियन क्रांतिकारकांना, त्यांच्या विरोधात खडे ठाकलेल्या सर्वच प्रतिक्रांतिकारकांविरुद्ध खंबीरपणे लढा देऊन त्यांचा प्रतिकार मोडून काढावा लागला. त्यामध्ये अर्थातच काही धर्मगुरू पाद्री अन

मुल्ला–मौलवी देखील होतेच. परंतु प्रत्यक्षात क्रांतीने सर्वच प्रकारचे धार्मिक छळ आणि भेदाभेद निकालात काढले आणि सर्वच धर्मांच्या पाठिराख्यांना संपूर्ण धर्मस्वातंत्र्य दिले जे झारशाहीमध्ये सतत नाकारण्यात येत होते. तत्पूर्वी सरकारने केवळ रूढीप्रिय चर्चलाच आश्रय देऊ केला होता. बोल्शेविकांनी कोणत्याही धर्माविरुद्ध जेहाद पुकारला नाही अथवा नास्तिकता जबरीने कोणाच्या गळी उतरवली नाही. तसे करणे मूर्खपणाचेच ठरले असते आणि सर्वसामान्य जनतेपासून तेच अलग पडले असते. क्रांतीनंतर बराच काळ उलटून गेल्यानंतर देखील लेनिनने लोकांना बजावले : "धर्माबद्दल लोकांची आस्था पुनरुज्जीवित करण्याचा आणि ती नष्ट होऊ न देण्याचा खात्रीचा मार्ग म्हणजे त्याविरुद्ध युद्ध पुकारणे."

क्रांतीनंतर ६५ वर्षे उलटून गेल्यावर यासंबंधात सोविएत राज्य घटनेमध्ये खालील नोंद आढळते : "सोविएत संघराज्यातील नागरिकांना धर्मपालनाबाबत संपूर्ण स्वातंत्र्य आहे– म्हणजेच, कोणताही धर्म मानण्याचा अथवा न मानण्याचा आणि धार्मिक प्रार्थना करण्याचा अथवा निरीश्वरवादाचा प्रचार करण्याचा पूर्ण हक्क आहे. धार्मिक कारणावरून परस्पर द्वेषभाव अथवा दुजाभाव निर्माण करण्यास चिथावणी देण्यास मज्जाव आहे. सोविएत संघराज्यामध्ये चर्च शासनापासून मुक्त आहे आणि शाळा चर्चपासून मुक्त आहेत."

आणि हे काही केवळ राज्यघटनेत नुसते लिहून ठेवलेले शब्द नाहीत. तर सोविएत जीवनात ते प्रत्यक्षात उतरविलेले आहे. आणि म्हणूनच सोविएत संघराज्यात आपणास २०,००० चर्च, मशिदी आणि बुद्धविहार सांभाळलेले आढळतात अन त्यांपैकी बहुतेकांमध्ये लोक प्रार्थना करताना दिसतात. त्याचबरोबर, हेदेखील खरे आहे की लोकांवरील धार्मिक पगडा दिवसेंदिवस कमी कमी होत आहे आणि चर्च-मशिदींमध्ये जाणाऱ्या लोकांच्या संख्येत सतत घट होत आहे.

खाडिलकर वारंवार पुनरुच्चार करतात की इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म हे धर्मग्रंथाचे पावित्र्य आणि अखेरचा प्रेषित (ईश्वराचा पुत्र) मानतात म्हणून ते पोथीनिष्ठ, धर्मवेडे, असहिष्णू आणि नव्या विज्ञानाला विरोधीच असतात आणि काळाच्या ओघात उघडकीस येणाऱ्या नव्याचा स्वीकार करण्यास असमर्थच असतात. याउलट हिंदू धर्माला कोणताही एक ग्रंथ प्रमाण नाही, एकमेव आणि अखेरचा प्रेषित नाही, आणि म्हणून तो धर्म परिवर्तनशील आहे, परमतसहिष्णु आहे, नव्याने उदयात येणारे जे जे काही म्हणून स्वीकार करण्यासारखे आहे त्याचे स्वागत करणारा आहे.

यावरून खाडिलकर असा निष्कर्ष काढतात की, "बायबल किंवा कुराण

यांच्याशी समाजवादाचे जमणेच शक्य नाही." याउलट हिंदू धर्म हा एकमेव असा धर्म आहे की ज्यात समाजवाद सामावला जावू शकतो.

हिंदू भूमीमध्ये समाजवाद वाढूच शकणार नाही असे प्रतिपादन करणारांच्या तुलनेने हे खचितच अधिक चांगले पुढचे पाऊल आहे. परंतु खाडिलकरांची धर्माबाबतची मते उघडपणे, एकांगी, उथळ, पूर्वग्रहदूषित आणि अनैतिहासिक आहेत. आपल्या स्वतःच्या धर्माहून भिन्न अशा जगातल्या मोठ-मोठ्या धर्मांच्या इतिहासाचा जर त्यांनी अधिक सखोल अभ्यास केला असता तर त्यांच्या हे खचितच लक्षात आल्याखेरीज राहिले नसते की रोमन साम्राज्याच्या काळात रोममधील अमानुष गुलामगिरीच्या हालअपेष्टांमधून मुक्तता मिळविण्याच्या प्रेरणेतून ख्रिश्चन धर्म उदयास आला. तीच गोष्ट बौद्ध धर्माची. पददलितांविषयी अनुकंपा आणि दैन्य-दुःखातून सुवर्णमध्य साधण्याच्या प्रयत्नांमधून बौद्ध धर्माचा उदय झाला. तसेच इस्लाम धर्माची सुरुवात देखील त्या अज्ञानांधःकारात बुडालेल्या आपापसात लढणाऱ्या रानटी अरब टोळ्यांना संघटित करण्याच्या चळवळीमधून झाली. त्या युगात अन काळात आश्चर्यकारक अशा कडक नैतिक आचारसंहितेवर आणि समानतेच्या तत्त्वांवर आधारूनच त्या धर्माची प्रतिष्ठापना झालेली होती.

ख्रिश्चनधर्मीय देशांनी आजवर गेल्या अनेक शतकांमध्ये वैज्ञानिक आणि तंत्रशास्त्रीय क्षेत्रात जी क्रांती घडवून आणली आहे ती पाहता ख्रिश्चन धर्माच्या पुरस्कर्त्यांबाबत खाडिलकरांची मते वस्तुनिष्ठ विचार करणाऱ्या कोणालादेखील पटण्यासारखी नाहीत. त्या देशांमध्ये उत्पादन संबंधांमध्ये बदल घडून आल्यानंतर समाजाच्या अर्थरचनेमध्ये प्रचंड गतीने परिवर्तन घडवून आणणारी उत्पादनसाधने कशी निर्माण होऊ शकली, आणि त्या ज्ञानाच्या पायावरच सामाजिक, राजकीय, कायदेविषयक, सौंदर्यशास्त्रविषयक, तत्त्वज्ञानविषयक आणि बौद्धिक क्षेत्रात जो प्रचंड इमला उभारला गेला आणि जलद गतीने विकसित होत गेला आणि बदलत गेला तो कसा काय याचे उत्तर देणे खाडिलकरांना जड जाईल. अखेरीस डार्विनच्या उत्क्रांतिवादाच्या विकासाला बायबल अडसर घालू शकले नाही, किंवा गॅलिलिओ कोपर्निकस यांनी अंतराळातील ग्रहगोलांसंबंधीच्या नियमांचे जे संशोधन केले त्याला तत्कालीन धर्म पायबंद घालू शकला नाही आणि अगदी आजच्या काळात बोलायचे तर विज्ञानावर आधारित समाजवादाने (म्हणजेच मार्क्सवाद – लेनिनवादाने) जगभरच्या सर्वसामान्य कष्टकरी जनसमुदायांवर प्रभाव पाडलेला आहे. मग ते जनसमुदाय ख्रिश्चन वा बौद्धधर्मीय बहुसंख्यांक देशातले असोत नाहीतर इस्लामीधर्मीय बहुसंख्यांक देशांतले असोत, ही गोष्ट नाकारता येईल काय?

खाडिलकरांना निदान एवढे तरी माहीत असावे की गेली कित्येक

वर्षे ख्रिश्चन धर्मियांचे पवित्र स्थान मानल्या गेलेल्या रोम शहरामध्ये कम्युनिस्टांचे बहुमत आहे.

तेव्हा खरी गोष्ट ही आहे की, समाजवादाच्या उद्दिष्टाला पायबंद हा किंवा तो कोणताच धर्म घालू शकत नाही. प्रत्येक देशातली विशिष्ट वास्तव परिस्थिती आणि तेथील जनसमुदायांचे विशिष्ट दृष्टिकोन ह्यांच्या समग्र वास्तवतेवरच समाजाची प्रगती होणे किंवा ती कुंठित होणे अवलंबून असते. त्यावरच त्याच्या विकासाची गतीदेखील अवलंबून असते. आणि नेमक्या ह्याच ठिकाणी, मार्क्सवादी विचारपद्धती, ऐतिहासिक भौतिकवादाचा त्याचा सिद्धांत अचूक मार्गदर्शन करू शकतो.

ह्या प्रश्नाच्या ह्या अंगासंबंधी खाडिलकर ह्यांनी जे लिहिले आहे त्यावरून असे दिसते की, इतरांची तेवढी धर्मान्धता! चर्चने, बायबलने, ईश्वराच्या प्रेषिताने, निर्माण केलेल्या विशिष्ट धार्मिक संस्था–रुढी–परंपरा-प्रमाणेच हिंदू धर्मानिदेखील आपल्या जातिसंस्थेमध्ये समाजाला जखडून टाकले याकडे खाडिलकरांचे दुर्लक्ष झाले की काय? माणसावर आणि समाजावर जन्माने लादलेल्या असमानतेकडे आणि हिंदूसमाजाला युगानुयुगे लागलेला अस्पृश्यतेचा जो कलंक गंगाजलामध्ये बुडचा मारूनही धुतला जाऊ शकत नाही ती अस्पृश्यता निर्माण करणाऱ्या जातिसंस्थेकडे खाडिलकर काणाडोळा करणे पसंत करतात की काय?

माणूस आणि समाज यांच्या जीवनामध्ये जगातल्या सर्व मोठमोठचा धर्मांनी जी भूमिका बजावली त्यासंबंधी मार्क्सवादामध्ये प्रदीर्घ चर्चा करण्यात आलेली आहे. ह्याचा उल्लेख मी करू मागतो. पूर्वीच्या काळी (आणि काही ठिकाणी आज देखील) धर्माच्या आवरणाखाली जनतेच्या चळवळी आणि क्रांत्या झालेल्या आहेत. कारण धर्मामध्ये जीवनविषयक तत्त्वज्ञानही व्यक्त होत असते. मार्क्सवादाचा दृष्टिकोन हा सतत ऐतिहासिक भौतिकवादीच राहिलेला आहे. त्याबाबत मार्क्सचे वचन सुप्रसिद्ध आहे.

"धार्मिक दुःख हे खरेखुरे दुःख आणि खऱ्या दुःखाविरुद्ध निषेधही एकाच वेळी व्यक्त करीत असते. धर्म हा दडपल्या गेलेल्याचा- दुःखिताचा हुंकार असतो. हृदयशून्य जगाचे ते हृदय असते, चेतनाशून्य परिस्थितीची ती चेतना असते. जनतेला दुःखाचा विसर पाडणारी ती अफू असते."

अत्यंत थोडक्यात परंतु प्रभावी शद्वात मार्क्सने धर्माचे सामर्थ्य आणि उणीव व्यक्त केलेली आहे. दडपल्या गेलेल्या लोकांच्या जीवनात त्याचे स्थान कोणते ते सांगितले आहे. विज्ञान आणि मानवाचे दैव घडीवणाऱ्या आणि बदलविणाऱ्या शक्तींची जाणीव जसजशी अधिकाधिक विकसित होत जाते तसतसा सामाजिक जीवनावरील धर्माचा पगडा कमी कमी होत जातो. तरी-

देखील व्यक्तीच्या प्रक्षुब्ध मनाला आराम देण्याचे त्याचे सामर्थ्य कायमच राहते.

समाजवाद आणि धर्म यांची सांगड घालणारे किंवा धर्मावर–या ठिकाणी हिंदू धर्मावर–समाजवादाचा रंग चढविणारे खाडिलकर हे काही पहिलेवहिले नाहीत. फार पूर्वी म्हणजे १८४८ साली जगप्रसिद्ध कम्युनिस्ट जाहीरनाम्यामध्ये मार्क्स आणि एंगल्स यांनी या गोष्टींकडे लक्ष वेधलेले होते.

"ख्रिश्चन सन्यासवादाला समाजवादी मुलामा देण्याइतके सोपे काहीही नाही. खाजगी मालमत्ता, विवाहसंस्था, शासनसंस्था ख्रिश्चन धर्माने अव्हेरली नव्हती कां? त्याऐवजी दानधर्म अन दारिद्र्य, ब्रम्हचर्य अन उपवास, सन्यस्त जीवन आणि चर्चमाता यांचा प्रचार केला नव्हता कां? ख्रिश्चन समाजवाद म्हणजे दुसरे तिसरे काही नसून उमराववर्गाच्या मनोवेदना कमी करण्याकरिता पाद्र्यांकरवी दिले जाणारे पवित्र तीर्थ याखेरीज दुसरे काहीही नाही."

हा ख्रिश्चन समाजवाद आजदेखील, अनेक पाश्चात्य देशांमध्ये राजकीय भूमिका बजावीत आहे आणि मार्क्सने दूरदर्शीपणाने वर्णन केले अगदी नेमक्या तशाच पद्धतीने.

इस्लामी समाजवादाबद्दलदेखील आपण ऐकतो. आपण केवळ एक मर्त्य मानव असून सर्वसामर्थ्यशाली परमेश्वराचा दया, दानधर्म, समानता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यासाठी आपण जन्माला आलेलो आहोत. अशी निरहंकारी आणि अंतर्बाह्य शुचिता स्वतः प्रेषित महंमदाने धारण करूनच इस्लामी समाजवाद सांगितला होता ना?

विज्ञाननिष्ठ समाजवादाच्या बाजूला सतत वाढत्या संख्येने लोक जसजसे झुकू लागले आहेत तसतसा राष्ट्रवादी आणि धर्मवादी विचारसरणींचा समन्वय साधण्याचे प्रयत्न फार मोठ्या प्रमाणावर सुरू झालेले आहेत. आणि विकसनशील राष्ट्रांकरिता तिसरा मधला मार्ग शोधून काढून एक नवे व्यासपीठ निर्माण करण्यात येत आहे. हा तिसरा मार्ग म्हणजे दुसरे – तिसरे काही नाही तर राष्ट्रवाद, समाजवाद आणि धर्मवाद यांची भेसळ आहे.

पण त्यातून साधणार काय?

काही वर्षांपूर्वी "इन्डोनेशियन समाजवादा"चे संस्थापक सुकार्नो म्हणाले होते, "आपण इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मातून धार्मिक समाजवाद स्वीकारला. मार्क्सवादातून विज्ञाननिष्ठ समाजवाद स्वीकारला. त्याला राष्ट्रीयत्वाचे पाणी द्या की बस! राष्ट्रीय विचारसरणी तयार झालीच म्हणून समजा."

इस्लामी समानता आणि भ्रातृभाव आणि अरब परंपरा यांच्या मिश्रणावर आधारित "अरब समाजवादा"ची घोषणा इजिप्तचे नासर यांनी दिली होती.

असल्या भेसळ विचारसरणीची आणि तिच्या सैद्धांतिक व व्यावहारिक पायाची अस्थिरता अन ठिसूळता इतिहासाने दाखवून दिलेली आहे. त्या मार्गावरील सर्व प्रयत्न निष्फळ ठरलेले आहेत. कारण भेसळीमधल्या समाजवादावर धार्मिक पुराणमतवादाने प्रत्येकवेळी मातच केलेली आहे. आपण अनुभवलेले आहे की, सोकार्नोच्या नंतर इन्डोनेशियात कम्युनिस्टांचे अन समाजवाद्यांचे शिरकाण झाले आणि सुहार्तो सत्तेवर आला. इजिप्तमध्ये नासरच्या मागून अमेरिकन साम्राज्यशाहीचे बाहुले बनलेला इस्लामी पुराणमतवादी अन्वर सादात सत्तेवर आला. त्या दोन्हीही ठिकाणी समाजवादाची नामोनिशाणी देखील राहिली नाही.

असल्या भेसळछाप समाजवादाला कालगतीने दया दाखवली नाही. त्याबद्दल मार्क्सने पुढील भेदक उद्‌गार काढले होते:

असला समाजवाद म्हणजे

"……अर्धा विलाप अन अर्धा उपहास, अर्धा भूतकालाचा प्रतिध्वनी अन अर्धी भविष्यकाळाची दहशत यापेक्षा अधिक काही नसते; कधीकधी त्यातील कडवट, विनोदगर्भ, आणि भेदक टीका भांडवलदारवर्गाच्या हृदयाला जाऊन फारतर भिडेल, इतकेच. पण परिणामाच्या दृष्टीने म्हणाल तर ती हास्यास्पदच ठरेल कारण आधुनिक इतिहासाची गती जाणण्याची पात्रता त्यामध्ये नसते."

मानवतावादी दृष्टिकोन असलेली आणि प्रचलित समाजरचना बदलविण्याविषयी तीव्र कळकळ असणाऱ्या सहृदय व्यक्ती असल्या संकल्पनांनी कित्येकदा भारावून जातात. पण त्यातून अपेक्षित ते परिणाम त्यांना कधीच अनुभवायला मिळत नाहीत.

खुद्द आपल्या देशामध्ये १९ व्या शतकाच्या अखेरीस आणि २० व्या शतकाच्या आरंभकाळात ब्रिटिश सत्तेखाली चिरडल्या जाणाऱ्या जनतेच्या दैन्यदुःखहालअपेष्टांनी हेलावलेल्या थोर विद्वानांनी पिळवणूकविरहित अशा समाजाची स्वप्ने रंगवली नव्हती कां? विवेकानंदांनी "शूद्र-राज्य" निर्माण झाले पाहिजे असे प्रभावीपणाने म्हटले नव्हते कां? "किसानांच्या झोपड्यांमधून नवा भारत निर्माण झाला पाहिजे" असं ते म्हणत नव्हते कां?

भारताच्या झोपडी-झोपडीमध्ये जीवन जगणाऱ्या त्या कोट्यवधी दरिद्री जनतेकडे केवळ दरिद्री नारायणाचा अवतार म्हणून ते पाहात नव्हते तर आज निद्रावस्थेत असलेला परंतु उद्याच्या समाजाचा नेता या दृष्टीनेच ते पहात होते. आपल्या वैदिक परंपरेविषयीचा त्यांचा अभिमान हा साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांच्या अमानुष पिळवणुकीविरुद्ध पददलितांना संघटित करण्याचे एक साधन हचा दृष्टीने ते पहात होते. धर्म हा निद्रिस्त आणि वैफल्यग्रस्त जन-

समुदायांना जागृत करण्याचे एक साधन आहे असे ते मानीत होते. आणि म्हणूनच विवेकानंदांसारख्यांनी विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांची सांगड विवेकशील धर्म-निष्ठेशी घातली. त्यांच्या संकल्पनेतील "मातृ-धर्म" तो हाच होता. हिंदू समाजवाद अन पुराणमतवाद यांनी त्यांच्या मनात कधीच प्रवेश केला नाही. आणि म्हणूनच त्याकाळी देखील विवेकानंदांनी इषारा दिला होता की,

"सामाजिक नियम तयार करणे हे धर्माचे काम नाही... धर्माच्या परवानगीने अस्तित्वात येणाऱ्या आर्थिक परिस्थितीतून सामाजिक नियम तयार होत असतात. सामाजिक बाबतीमध्ये ढवळाढवळ करणे ही धर्माची घोडचूक आहे. ..... खरोखरच आम्हाला जर काय हवे असेल तर ते हेच की धर्माने समाजसुधारकांची भूमिका बजावू नये. परंतु त्याचबरोबर आमचा असा आग्रहही आहे की धर्माने आमच्यावर सामाजिक नियम लादू नयेत. दूर सरा! तुम्ही तुमची मर्यादा पाळा अन मग सारे काही ठीक होईल."

विवेकानंदांच्या काळानंतर एक शतक उलटून गेल्यानंतर खाडिलकरां-सारख्या विवेकशील व्यक्तीने आपल्या समाजवादाची सांगड हिंदू साहसवाद आणि भारतीय वैशिष्ठ्यवादाशी घालावी हे खेदजनक नाही काय? त्यांच्या पुरोगामी विचारांची कक्षा आकुंचित करून देशाच्या मुक्ततेबाबतच्या त्यांच्या आशावादाला बंदिस्त करण्यासारखेच ते होणार नाही का?

आज आपल्या देशामध्ये केवढा सावळागोंधळ माजलेला आहे! उदा-हरणार्थ पंजाबात एका एकांगी नेतृत्वाने धर्माची गल्लत राजकार-णाशी घातली आहे आणि महान शीख धर्माच्या शिकवणुकीचे विकृतीकरण करून ते अंमलात आणण्यात येत आहे. १७ व्या शतकामध्ये अस्तित्वात असलेल्या तत्कालिन विशिष्ठ परिस्थितीत लागू होणारी धोरणे आणि कृती यांची सांगड आजच्या २० व्या शतकातल्या परिस्थितीशी घालण्यात येत आहे. एका धर्मपंथीयांनी एखाद्या विभागामध्ये धार्मिक पुराणमतवादाचा एक नमुना सामाजिक-राजकीय जीवनात उतरवला तर इतर धर्मीयांमध्ये देखील त्याची प्रतिक्रिया होऊन त्यातून क्रिया-प्रतिक्रियांची एक मालिकाच तयार होणार नाही का? परिणाम काय? प्रत्येकजण दुसऱ्याविरुद्ध शस्त्र परजून उठेल अन त्यातून देश छिन्नविछिन्न होण्यापलिकडे दुसरे काय घडू शकेल?

अथर्ववेदामध्ये पृथ्वीला उद्देशून जे स्तोत्र गायिले आहे ते किती कॅथॉलिक, किती मानवी आणि आजच्या परिभाषेत सांगायचे तर किती धर्मनिरपेक्ष आहे. पृथ्वीवरील माणसे आणि त्यांची ब्रीदे यांच्यातील भिन्नतेची जाणीव त्यात व्यक्त होते. आणि त्यांच्यामध्ये एकता अन भ्रातृभाव नांदावा अशी भावना त्यात व्यक्त झालेली दिसते. आज एका धर्माची इतर धर्माबाबत जी कडवटपणाची भावना दिसून येते ती पाहता आपल्या आजच्या काही विचार-

वंतांपेक्षा आपले वेदकालीन पूर्वज अधिक प्रगल्भ विचारवंत होते, असे दिसून येते. तोंडाने मात्र ते आजचे विचारवंत आपल्या पूर्वजांच्या वैभवशाली परंपरांचे गोडवे गातात ! आपल्या भारतासारख्या देशात तर आज राष्ट्रीय एकात्मता आणि भ्रातृभाव नांदण्याच्या दृष्टीने अथर्ववेदातील ते स्तोत्र अतिशय चिंतनीय वाटते. त्यामुळे ते येथे उद्धृत केल्याखेरीज राहवत नाही :

"जनं विभृती बहुधा विवाचसं
नानाधर्माणं पृथिवी यथौकतम ।
सहस्त्रं धारा दविणस्य मे दुहां
धरेव धेतुर अनपस्फुरंती ।।

(हे पृथ्वीमाते, तू भिन्न भाषा आणि भिन्न धर्मपंथांच्या लोकांना त्यांच्या त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणांना अनुसरून जन्म देतेस तर कधीही न आटणाऱ्या गोमातेच्या क्षीरधारेप्रमाणे हजारो प्रवाहांनी तू मला ऐश्वर्य प्राप्त होऊ दे.)

कुणी असा प्रश्न विचारील की, सोविएतचा अनुभव आणि मार्क्सवादाचा जागतिक दृष्टिकोन निरिश्वरवाद आणि धर्मभावना एकत्र नांदू शकतील का ? त्याला आमचे उत्तर असे की,

एखाद्या व्यक्तीपुरते बोलायचे तर ते अशक्य आहे. परंतु एखाद्या समाजामध्ये वा राज्यामध्ये ते शक्य आहे. आम्ही मार्क्सवादी जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणून धर्माकडे पहात नाही. पण म्हणून काही आम्ही धर्मविरोधी ठरत नाही. त्याबाबत आमचा दृष्टिकोन ऐतिहासिक आणि विज्ञाननिष्ठ आहे. आणि त्यावर मानवतावादी दृष्टिकोनाचा पगडा आहे.

"धर्माच्या समीक्षेचा शेवट **मानवाच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ प्राणी हा मानवच आहे.** येथेच होतो" असे मार्क्सने म्हटले आहे.

आणि म्हणूनच आपण निरिश्वरवादी आहोत असे घोषित करण्याची सक्ती आम्ही प्रत्येक कम्युनिस्टावर करीत नाही. किंवा कम्युनिस्टांच्या पंथाचा अनुयायी म्हणून स्वीकार करताना किंवा सामाजिक क्रांतीकार्यात सहभागी करून घेताना निरिश्वरवाद मान्य करण्याची अटही कोणी घालीत नाही. खरं तर, प्रत्यक्ष क्रांतीकार्यात एखादी व्यक्ती किती प्रमाणात सहभागी होते आणि जनसमूहांमध्ये विज्ञाननिष्ठ विचार किती प्रमाणात प्रसृत होतात आणि त्यातील किती विचार ती व्यक्ती आत्मसात करते त्या प्रमाणातच त्यांच्या धार्मिक दृष्टिकोनाचे रूपांतर विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनामध्ये होते. यासंबंधात अमर हुतात्मा भगतसिंग यांच्या मृत्यूपत्राचा दाखला देता येईल :

फाशीच्या दारात पोहोचलेला असताना त्याने लिहिले होते : "होय मी निरिश्वरवादी आहे." त्याने ईश्वरचरणी लीन व्हावे अशी अपेक्षा केल्या-कारणानेच ते लिहिले होते.

आमचे मागणे एकच आहे--खाडिलकरांनी "समाजवादी" बनण्यासाठी आपल्या "हिंदुत्वनिष्ठे"चा त्याग करावा अशी आमची मागणी नाही. ती त्यांची व्यक्तिगत बाब आहे आणि ती त्यांनी जरूर स्वागतार्ह मानावी. प्रत्येकाला मग तो निष्ठावान हिंदू असो, मुसलमान असो, ख्रिश्चन असो, शीख धर्मीय असो वा बुद्धधर्मीय असो त्या प्रत्येकाला निरिश्वरवाद्यांच्या बरोबरीने सामाजिक क्रांतिकार्यामध्ये सहभागी होण्यास काहीही हरकत नाही. धोकादायक जर काय असेल तर ते एकच की समाजवादाची धर्माशी सांगड घालणे किंवा समाजवादाला कोणत्या ना कोणत्या तरी धर्माचा मुलामा देणे. आम्ही त्यांचे लक्ष या गोष्टीकडे वेधतो.

(१४) धार्मिक पुनरुज्जीवनवाद आणि त्याची विषारी फळे

या ठिकाणी आपल्या देशामध्ये घडत असलेल्या एकूण राजकारणाला धर्म आणि धार्मिक दृष्टिकोनाने कसे व्यापून टाकलेले आहे त्या प्रश्नाची थोडक्यात चर्चा करणे योग्य ठरेल असे मला वाटते. प्रथमदर्शनी हे काहीसे विषयांतर झाल्यासारखे भासेलही. परंतु नीट विचार केल्यानंतर ते तसे नाही हे सहज लक्षात येऊ शकेल. खाडिलकरांच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"ला धार्मिक दृष्टिकोनाचा गडद रंग आहे एवढाच मुद्दा त्यात नाही, कारण तो प्रश्न पूर्वीच्या लेखांमध्ये आपण चर्चिला आहे. परंतु त्याच संदर्भात आज आपल्या देशात घडणाऱ्या घटनांकडे जर आपण पाहिले तर एक प्रकारचा धार्मिक रूढीवाद, पुनरुज्जीवनवाद आणि सरळ सरळ परमताबद्दल असहिष्णुतेने आणि राजकारणात त्यांनी घातलेल्या धुमाकुळाने सबंध देशाचे वातावरण दूषित करून टाकण्यात आलेले आहे. त्या संबंधात ज्या "घटना" घडत आहेत त्यामागचे "गुन्हेगार" शोधून काढण्याबाबत निरनिराळचा जातीजमातींनी परस्परांविरुद्ध आरोप-प्रत्यारोप करणे चालूच आहे. परंतु यातून एक निष्कर्ष काढावयास काहीच हरकत नाही की, त्यामुळे सर्वच जातीयवादी शक्ती उफाळून येत आहेत आणि परिणामी जातीय दंगली, लूटालूट, जाळपोळ आणि हिंसाचारांना ऊत आलेला आहे.

परिणामी, राष्ट्रीय एकता आणि एकात्मतेला गंभीर धोका उत्पन्न झालेला असून भिन्न भिन्न जाति-धर्मांच्या लोकांमध्ये परस्परांबद्दल अविश्वासाचे व तणावाचे वातावरण निर्माण झालेले आहे. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य-लढ्यातील धर्मनिरपेक्षता त्याने उध्वस्त होत आहे. अशा अवस्थेमध्ये सर्वसामान्य जनता विभक्त झाल्यानंतर सामाजिक प्रगतीच्या दिशेने, समाजवादाच्या दिशेने वाटचाल होण्याची अपेक्षा करणेच निरर्थक ठरणार आहे. आणि म्हणूनच हचा प्रश्नांची चर्चा आताच आणि येथेच करणे योग्य होईल असे वाटते. आणि समाजवादाच्या दिशेने बदल घडविण्याची कळकळ असणाऱ्या कोणाला-देखील हा प्रश्न दुर्लक्षिता येण्यासारखा नाही.

१८५७ च्या उठावाचे वेळी तसेच ते उठाव दडपल्यानंतर काही कालावधी उलटून गेल्यानंतर राष्ट्रीय जागृतीचा जो कालखंड झाला त्यावेळी, तसेच दरम्यान जे छोटेमोठे उठाव स्थानिक पातळीवर झाले त्यावेळीदेखील धार्मिक भावनांना आवाहन फार मोठ्या प्रमाणावर करण्यात येत होते. आपले भूतकालातले वैभव, आपल्या प्राचीन संस्कृतीची व्याप्ती आणि खोली याविषयीचा अभिमान जागृत करण्यासाठी देशाच्या भवितव्याविषयीचा विश्वास जागृत करण्यासाठी आणि आपल्या राष्ट्रीयत्वाचा अभिमान वृद्धिगत करून, साम्राज्यशाहीने लादलेल्या गुलामी वृत्तीपासून व पाश्चात्यांच्या अंधानुकरणापासून आपली सोडवणूक करण्यासाठी त्या आवाहनाचा उपयोग निश्चितच झाला होता. "पाश्चात्यां"चे ते सारे काही चांगले असे मानणाऱ्या मूठभर उच्चभ्रूंकडून अराष्ट्रीय भावना आणि पाश्चात्यांच्या अंधानुकरणाची वृत्ती जोपासण्याच्या प्रतिकाराविरुद्धची मोहीम यादृष्टीने ते एक सामर्थ्यशाली पाऊल होते. त्यामुळे राष्ट्रीय वृत्ती जागृत करून जोपासण्याला त्याचा हातभार लागला यात शंकाच नाही. आपल्या पौराणिक ग्रंथांमध्ये सांगितलेल्या "कर्मयोगा"ने जनतेला कृतीचे आवाहन केले. वैफल्य, पराभूत मनोवृत्ती, नैराश्य यामुळे जी निष्क्रियता आणि आळशी मनोवृत्ती लोकांमध्ये निर्माण झाली होती आणि प्रतिगामी व दडपशाही करणाऱ्या शक्तींपुढे शरणागती पत्करण्याची जी प्रवृत्ती लोकांमध्ये जोपासली जात होती ती नाहिशी करण्यास त्या आवाहनाचा उपयोग झाला.

इतिहासाच्या अशा अवस्थेमध्ये तत्त्वज्ञानदेखील धर्माची सेवा बजावते आणि धर्म हीच एक प्रभावी विचारसरणी बनते.

परंतु अशा काळात आपल्या राष्ट्रीयत्वाच्या आणि आपल्या विशिष्ट सांस्कृतिक परंपरांच्या पुनरुत्थानाचे एक माध्यम आणि एक प्रतीक म्हणून धार्मिक भावनांना केलेले आवाहन आणि धार्मिक उत्सव यांचा एक दुष्परिणाम देखील झाला. तो असा की, नंतरच्या कालखंडामध्ये राष्ट्रीय चळवळीमध्ये वितुष्ट निर्माण करण्यास आणि त्या चळवळीला सुरुंग लावण्यास, "फोडा आणि झोडा" या धोरणाचा अवलंब करण्यास, ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या हाती आयतेच एक "कोलीत" मिळाले.

त्यानंतर गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळीला एक अभूतपूर्व असे सामुदायिक स्वरूप प्राप्त झाले. "दरिद्री नारायणा"ची म्हणजे सर्वसामान्य जनतेची सेवा, हिंदु-मुस्लिम-एकता, हरिजन-कल्याण, अस्पृश्यता–निवारण इ. वर गांधीजींनी दिलेला भर आणि त्यांच्याच जोडीला राष्ट्रीय नेतृत्वाचा विवेकशील सामाजिक व राष्ट्रीय दृष्टिकोन यांची सांगड गांधीजींनी घातली. परिणामी, स्वातंत्र्य–आंदोलनाला एका खऱ्याखुऱ्या धर्मनिरपेक्षतेचे व साम्राज्यशाही-

विरोधी स्वरूप प्राप्त झाले. या प्रक्रियेमध्ये, विज्ञाननिष्ठ समाजवादी विचार-सरणीचा आणि तिने राष्ट्रीय मंचावर आणलेली संयुक्त जनआंदोलने आणि वर्गीय संघटना, तसेच मानवी इतिहासामध्ये नव्या युगाचा शुभारंभ करणारी रशियन राज्यक्रांती यांचा प्रभाव दुर्लक्षिण्यासारखा खचितच नाही.

१९३१ साली कॉंग्रेसच्या कराची अधिवेशनामध्ये जो हक्कांचा जाहीरनामा मंजूर झाला होता तो जातपात, धर्म, पंथ, लिंग इ. कशाचाही भेदाभेद न करता सर्व नागरिकांना समान लोकशाही नागरिकत्वाच्या पायावरच करण्यात आलेला होता. तसेच सर्व अल्पसंख्यांकांना सांस्कृतिक सुरक्षिततेची व धार्मिक स्वातंत्र्याची हमी त्यात देण्यात आलेली हाती. राष्ट्रीय चळवळीमध्ये हे एक फार मोठे पुरोगामी पाऊल होते. धर्मातीत लोकशाहीचे हे मूलभूत धोरण हा आपल्या राष्ट्रीय चळवळीचा गाभा होय.

एक पंथ वा तत्त्वज्ञान या दृष्टीने गांधीवादामध्ये अंतर्भूत असलेल्या अनेक परस्परविरोधी बाबींच्या चर्चेमध्ये येथे शिरण्याची आवश्यकता नाही. त्याचवेळी आपण एक "सनातनी हिंदू" असल्याचे गांधीजी वारंवार सांगत असले तरीदेखील आपल्या सनातन धर्माचे प्रदर्शन करण्याकरिता मंदिरांना भेटी देणे अथवा यात्रांमध्ये सहभागी होणे, अथवा "शंकराचार्य" किंवा अन्य "धर्मगुरू"च्या पाया पडणे याची त्यांना कधीही गरज भासली नव्हती. त्यांच्या स्वभावाशी आणि एकूण विचारसरणीला असले प्रदर्शन करणे परके होते.

भारतीय राजकारणामध्ये जातीयवादाची पेरणी केली ती साम्राज्य-वाद्यांनी आणि हिंदी प्रतिगाम्यांनी.

"द्विराष्ट्र सिद्धांत" अथवा "हिंदू राष्ट्राची" घोषणा ही त्यांच्या संयुक्त प्रयत्नांचीच निर्मिती. राष्ट्रीय नेतृत्वामध्ये प्रभावी असणाऱ्या लोकांच्या डळ-मळीत, संधिसाधू आणि तडजोडवादी भूमिकेमुळे हचा विषवृक्षांना फोफावण्यास सुपीक भूमी उपलब्ध झाली हेही खरेच. परंतु ते काहीही असले तरी त्या विषवृक्षांची फळे जी आज आपणास चाखावी लागत आहेत त्या जातीयवादाचे बीजारोपण मात्र केले ते ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी व भारतातील प्रतिगाम्यांनी.

बुद्धिजीवींच्या एका विभागामध्ये–मग ते हिंदू असोत, मुस्लिम असोत, शीख असोत वा अन्यपंथीय असोत– एक जातीयवादी विषवृत्ती वसत असल्याचे आढळून येते. ही वृत्ती हळूहळू झिरपत खाली तळागाळापर्यंत पसरते. अन शेवटी सबंध समाजपुरुषामध्ये पसरते. इतिहासाचे मध्ययुगीन आणि आधुनिक अशा दोन्हीही कालखंडांचे जातीयवादी दृष्टिकोनातून हे बुद्धिजीवी विचारवंत अर्थ लावतात अन त्यामुळे तो जातीयवादी विषवृक्ष अधिकच फोफावण्यास मदत होते. इतिहासाचा असा जातीयवादी अर्थ लावण्याची

सुरुवात प्रथम जर कुणी केली असेल तर ती जेम्स मिल या ब्रिटिश इतिहासकाराने. त्याच्या आधारानेच नवशिक्षितांपैकी काही बुद्धिजीवींमध्ये हचा विषवृत्तीची लागण प्रथम ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी केली.

त्याच इतिहासावर विसंबून भारतातील काही मान्यवर हिंदू आणि मुस्लिम इतिहासकारांनी त्या विषवृत्तीचा वारसा आपणाला दिला. तथापि, गेल्या दोन दशकांमध्ये अनेक मान्यवर इतिहासतज्ज्ञांनी हचा जातीयवादी विचारसरणीवर आधारलेल्या इतिहास–लेखनाला अनेक वास्तव पुरावे आणि कागदपत्रे यांच्या आधारे आव्हान दिले असून ऐतिहासिक भौतिकवादाच्या विज्ञाननिष्ठ पायावर ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण केलेले आहे. कोणत्याही पूर्वग्रहावर आधारित चौकटीमध्ये व्यक्तिवादी, पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनामधून गोळा केलेल्या घटना कोंबून न बसविता व युद्धासारख्या नि स्वाऱ्यांसारख्या काही "अपघाती" घटनांची व राजे-राजपुत्र-राजघराणी इत्यादींच्या कहाण्यांवर आधारून त्यांनी इतिहासाचा अर्थ लावलेला नाही.

इतिहासाकडे जनसमूहाचे आंदोलन हचा दृष्टीने पाहणारी अशी ही विज्ञाननिष्ठ पद्धती आहे. हचा पद्धतीमध्ये देश–काल–परिस्थितीनुसार जनसमुदायांमध्ये भौतिक परिस्थितीमुळे निर्माण होणारे फेरबदल आणि त्या फेरबदलांच्या परिणामी त्यांच्यातील परस्पर–संबंधांत घडून येणारे सामाजिक, राजकीय, कायदेविषयक आणि नैतिक परिवर्तन इ. चा विचार करण्यात येतो. इतिहासाकडे या विज्ञाननिष्ठ भूमिकेमधून पाहिल्याकारणाने भारतीय इतिहासाला एक सामाजिक शास्त्राची पातळी प्राप्त झालेली आहे. आणि तिने इतिहासातील पूर्वीच्या विवेकशून्य जंत्री निरर्थक ठरविल्या आहेत.

आपल्या एकूण विचारांवर आणि दृष्टिकोनावर विशिष्ट "शिक्का" मारण्याचे कार्य करणाऱ्या "इतिहासकारांच्या" भारतीय इतिहासामधील सर्वच्या सर्व मूर्खपणावर प्रकाश टाकणे हचा छोटचाशा लेखांकामध्ये केवळ अशक्य आहे. पण त्यांतल्या केवळ काही बाबी नमुन्यादाखल नोंदविल्या तरी पुरेशा होतील :

ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये जो इतिहास आपणाला शिकविण्यात आला त्यामध्ये भारतीय इतिहासाचे जे कालखंड पाडण्यात आले होते ते "हिंदू अंमल" "मुस्लिम अंमल" असे होते. परंतु जो "ख्रिश्चन" धर्म ब्रिटिश राज्यकर्ते आणि जेते मानीत होते व ज्या धर्माच्या प्रसारासाठी राज्यकर्ते पाद्रचांना राजाश्रय देत होते, त्या ख्रिश्चन राजवटीच्या इतिहासाच्या कालखंडाला "ख्रिश्चन अंमल" असे म्हणण्यात येत नव्हते. तसे करण्यामागे भारतीय जनतेमध्ये एक कृत्रिम भिंत उभी करण्याचा अंतस्थ हेतू होता. हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांमधील धार्मिक लढाया असा इतिहासाचा अर्थ लोकांच्या

मनावर ठसविण्याचा आणि त्याद्वारे त्या दोन धर्मियांना परस्परांमध्ये सतत लढत ठेवण्याचा हेतू होता. परंतु वस्तुस्थिती काय सांगते ?

इस्लाम धर्म भारतात आला तो काही केवळ स्वाऱ्या करून आणि तलवारी अन् बंदुका यांच्याद्वारे मार्ग काढीत आला नाही. महंमद बिनकासीम-पासून वायव्येकडील खिंडीमधून स्वाऱ्या आल्या व जवळजवळ सात शतके निरनिराळ्या अनेक मोगल घराण्यांनी राज्ये केली हे खरे. परंतु त्या आधी कित्येक शतके पूर्वी दक्षिणेकडील किनारपट्टीवर अरब व्यापारी व्यापारा-साठी येत व तेथे वस्ती करून रहात. त्यांनी प्रथम इस्लाम धर्म भारतात आणला. त्या काळात त्या भागातील हिंदू राजांकडून त्यांना राजाश्रय देखील मिळत असे. परिणामी दोन्ही ठिकाणी स्वाभाविकपणे त्याचा भिन्नभिन्न परि-णाम दिसून येतो. उत्तरेप्रमाणे दक्षिणेकडे त्याचा वादळी परिणाम झालेला दिसून येत नाही.

परदेशातून दक्षिणेकडे येऊन कायम वास्तव्य करणारे लोक हे संख्येने त्यामानाने कमी होते. त्यामुळे हिंदू राजांवर विजय मिळविणे किंवा त्यांचा भूप्रदेश खालसा करणे त्यांना शक्यच नव्हते. त्यामुळे मुस्लिम राजघराणी तेथे अस्तित्वात येऊ शकली नाहीत. अथवा राजघराण्यांचे धर्मांतर करण्याच्या हेतूने व राजघराण्यांच्या स्थैर्यासाठी त्यांच्यामध्ये विवाहसंबंध देखील प्रस्था-पित होऊ शकले नाहीत. सामुदायिकरित्या तेथे सक्तीने धर्मांतर करण्यात आले असे दर्शविणाऱ्या घटनांचे पुरावेदेखील आढळत नाहीत. दुसरे असे की, ब्रिटिश राज्यकर्ते भारतात उदयास येण्यापूर्वी अनेक शतके मुस्लिम राजे येथे राज्य करीत होते. तथापि, त्यांनी कुराणाच्या हदीजच्या किंवा सनतच्या आदेशानुसार "इस्लाम धर्मीय राज्य" असे स्वरूप कोणत्याही राज्याला दिले नव्हते. प्रो. हबीब यांनी अचूकपणे म्हटले आहे की, "तसे त्यांनी केले असते तर एका पिढीपर्यंत देखील ते येथे टिकू शकले नसते."

तत्पूर्वी हिंदू धर्मीय (आणि तथाकथित भ्रष्ट बुद्धधर्मपंथीय देखील) लोकांनी इस्लामधर्म स्वीकारला तो "सुफी"च्या प्रभावाखाली. त्यांचे मिशनरी कार्य प्रदीर्घ काळापासून चालत आलेले होते. सुफींना राजाश्रय नव्हता. खरे तर दडपशाही आणि पिळवणूक यांच्याविरुद्ध त्यांची चळवळ चालू होती. सत्तारूढ वर्तुळांच्या पाशवी जुलूम आणि दडपशाहीविरुद्ध त्यांची चळवळ होती. त्यामुळे साहजिकच ते सर्वसामान्य लोकांमध्ये जाऊन प्रचारकार्य करीत असत. हिंदूंमध्ये संत परंपरेने जसा "भक्तिपंथ" निर्माण केलेला होता, तसे त्यांच्या कार्याचे स्वरूप होते. त्यामुळे स्थानिक जनतेशी त्यांचा अत्यंत निक-टचा संबंध होता. त्यांत हिंदू होते तसेच मुस्लिमदेखील होते. आणि "भक्ती-

पंथा"प्रमाणेच ते दया, प्रेम, सहिष्णुता व भिन्न धर्मियांबद्दल आदरभाव यांचाच संदेश देत असत.

हळदी घाटात अकबराविरुद्ध राणा प्रतापच्या सैन्याने जो विजय मिळविला त्यात हकीमखान सुरी याच्या हाताखालील वीस हजार पठाणांचा समावेश होता. याउलट, अकबराच्या बाजूला एक लाख रजपुत सैनिक राजा मानसिंग ह्याच्या सरसेनापतीपदाखाली होते. ह्या एकाच घटनेचे स्मरण केल्यास राणा प्रताप हिंदू नसता तर आपले साम्राज्य अधिक भक्कम बनविण्याकरिता तो काय कमी चिवटपणे लढला असता? आणि ज्या शिवाजीच्या वैभवाचे आपण स्मरण करतो त्या आपणा सर्वांना हे काय नव्याने सांगावयास हवे काय की, शिवाजीच्या विश्वासू सेनापतींमध्ये दौलतखान, आणि ॲडमिरल सिद्दी हंबाला यांसारख्यांचा समावेश होता आणि त्याच्या सशस्त्र सैन्यामध्ये देखील दहा हजार अरबी सैनिकांची तुकडी होती?

डॉ. विश्वंभरनाथ पांडे यांनी सांगितलेल्या एका उदाहरणावरून काही विद्वान इतिहासकार आपले ग्रंथ कसे लिहितात ते लक्षात येते.

"भारताचा इतिहास" ह्या आपल्या पुस्तकात डॉ. महामहोपाध्याय हरप्रकाश शास्त्री यांनी लिहिले आहे की, टिपू सुलतानाने मुसलमान धर्म स्वीकारण्याची सक्ती केल्याकारणाने ३००० ब्राम्हणांनी आत्महत्या केली. ब्रिटिशांविरुद्ध प्राणपणाने झुंज देणाऱ्या त्या थोर लढवय्याच्या बाबतीत असे घडणे इतके अस्वाभाविक होते की, डॉ. पांडे यांनी तावडतोब महामहोपाध्यायांना ही माहिती त्यांनी कशाच्या आधाराने लिहिली ते कळविण्याची विनंती केली. त्यावर अनेक स्मरणपत्रे पाठविल्यानंतर महाशयांनी कळविले की, म्हैसूर गॅझेटमध्ये ती माहिती आपणास मिळाली. त्यानंतर म्हैसूर विद्यापीठाचे उप-कुलगुरू डॉ. ब्रजेन्द्रनाथ सील यांना पत्र पाठवून डॉ. पांडे यांनी ह्याविषयी शहानिशा करून घेतली. त्यावेळी डॉ. सील यांनी उलट टपाली कळविले की, असली काहीही माहिती आपणास आढळत नाही. आता पुन्हा महामहोपाध्यायांना धारेवर धरण्यात आले व "बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर" असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. तेव्हा नाईलाजाने त्यांनी पळवाट काढली की, ही माहिती आपणास कुठे आढळली ते आता स्मरत नाही. विशेष नवल म्हणजे त्यांचे पुस्तक एक क्रमिक पुस्तक म्हणून मंजूर झालेले आहे.

अशाच तऱ्हेने, हिंदुस्थानात सात शतके एका पाठोपाठ मुस्लिम राजघराण्यांचे "गेलेले साम्राज्य" आणि त्याचे वैभव यासंबंधी हिन्दू वाचकांच्या मुस्लिमविरोधी भावना प्रक्षुब्ध करणाऱ्या गोष्टींबाबत काही मुस्लिम इतिहासकारांनी देखील खोडसाळपणे लिहिलेले आहे. मूर्तीभंजन आणि मंदिरांची

मोडतोड यासंबंधीच्या कथा सांगण्यात अधिक कालापव्यय न करता एवढे म्हटले तर पुरेल की, युद्धकाळात मुसलमानांप्रमाणेच काही हिंदू राजांनी-देखील काही कमी केले नाही. त्यासाठी कल्हाणच्या रजतरंगिणी किंवा परमार राजसुवत वर्माच्या कृत्यांची वर्णने वाचली तरी पुरेत. डॉ. रोमिला थापर यांनी आपल्या लिखाणामध्ये हचा बाबीकडे वाचकांचे खास लक्ष वेधलेले आहे.

माझ्यासंबंधी वाचकांचा गैरसमज होऊ नये म्हणून मला सांगावेसे वाटते की, आपल्या देशात असे अनेक इतिहासतज्ज्ञ आहेत की, ज्यांनी मूळ कागदपत्रे आणि पुरावे यांची छाननी करण्याचा त्रास घेऊन आपल्या भूतकालीन इतिहासाविषयी अनेक वास्तव घटनांचे संशोधन केलेले आहे. त्यांची नावे मान्यवरांच्या यादीमध्ये कोरलेली आहेत. ते असो. परंतु जातीयवादाचे विष सर्वत्र फैलावण्याचे जे उद्योग सध्या चाललेले आहेत त्याचे आपल्या जनतेवर आणि सर्वसाधारणपणे आपल्या राजकीय जीवनावर भीषण दुष्परिणाम होत आहेत हे कोण नाकारू शकेल ?

एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, हिंदू वा मुस्लिम राजांच्या राज्यांमध्ये युद्धे होत व विजयानंतर त्यापाठोपाठ लुटालूट, जाळपोळही होतच असे. तथापि, आजकाल होतात त्या प्रकारच्या हिंदु-मुस्लिम जातीय दंगली ब्रिटिश राजवटीत किंवा अगदी जुलमी राजवटीच्या काळांत देखील झाल्याचे आपणास कोठेही ऐकिवात नाही. आज आपण मानतो तशा प्रकारची धर्मनिरपेक्षता त्या काळात नव्हती हे खरे, पण त्याचे कारण एवढेच की, तो काळ भिन्न होता आणि समाजाची अवस्था देखील भिन्न होती. पण तरीदेखील, धर्म हा राजकारणाची बटीक होता. उलट स्थिती मात्र कधीच नव्हती.

या चर्चेमध्ये आम्हाला जावे लागले कारण नीळकंठ खाडिलकरांचे शद्ब हे हिंदू श्रोत्यांना ऐकविण्यात आलेले आहेत. आणि म्हणूनच हचाच जनविभागाला उद्देशून बोलणे आणि आमची भूमिका स्पष्ट करणे आम्हाला भाग आहे.

जातीयवाद मग तो हिंदूंचा, मुसलमानांचा, ख्रिश्चनांचा, शिखांचा वा अन्य कोणत्याही पंथाचा असो, तो सारखाच घृणास्पद आहे. त्यात निवड करण्यासारखा कोणताच नाही हे स्पष्ट आहे. परंतु त्याचबरोबर हेही निश्चित की, बहुसंख्यांकांचा जातीयवाद हा अधिक धोकादायक असतो, कारण हानी करण्याचे सामर्थ्यही त्याच्यातच अधिक असते.

धर्मनिरपेक्षतेच्या सुदृढ परंपरा आज का उध्वस्त होत आहेत ? ज्यावेळी समाज तीव्र अरिष्टाने ग्रासलेला असतो व सामाजिक जीवनमूल्ये ही सत्तारूढ वर्तुळांच्या संकुचित हितसंबंधांपुढे गौण मानली जातात, नैतिक अध:-

पतन आणि भ्रष्टाचार सर्वत्र बोकाळतो आणि मानवाच्या सदसद्‌विवेक-बुद्धीला आणि आशा-आकांक्षांना जेव्हा तडे जाऊ लागतात तेव्हा पुराणमतवाद डोके वर काढू लागतो. क्रांतिकारी समाजपरिवर्तनाची ही दुसरी बाजू आहे. एका बाजूने क्रांतिकारी समाजपरिवर्तन घडवू पाहणारे प्रचलित परिस्थितीमध्ये बदल घडवून आणून समाजाला पुढे घेऊन जाऊ पाहतात, याउलट दुसऱ्या बाजूला पुराणमतवादी प्रतिगामी भूतकालाचे तुणतुणे वाजवीत समाजाला मागे नेऊ पाहतात. सुधारणेबाबत ते क्षीण आवाज काढतात परंतु मोकाट सुटलेल्या प्रवाहामध्ये ते प्रवाहपतित बनतात आणि त्यांना अपेक्षित त्या सुधारणा घडवून आणण्यास ते असमर्थ ठरतात.

शिवसेनेचे उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर आहेच. खाडिलकरांच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"चे ठाकरे यांनी मनसोक्त स्वागत केले आणि हा "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" प्रत्यक्षात आणण्यासाठी ठाकरे यांनी देऊ केलेल्या सहाय्याचे खाडिलकरांनी कृतज्ञतापूर्वक स्वागत केले. परंतु ठाकरे हे नेहमीच आक्रमक हिंदू साहसवादी होते आणि अजूनही आहेत. तेव्हा परिणाम काय ?

दि. २३ जानेवारी १९८४ रोजी शिवसेनेचे राज्य पातळीवरील जे पहिलेवहिले अधिवेशन झाले, त्यात त्यांनी कळकळीने निर्धार घोषित केला तो कशाचा ? तर हिंदू महासभा, आर्य समाज आणि विश्व हिंदू परिषद यांसारख्या संघटनांचे ऐक्य घडवून आणण्याचा ! आणि कशासाठी ? तर हिंदूंची प्रतिष्ठा आणि अभिमान पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी ? आणि का ? तर ठरावात म्हटल्याप्रमाणे, बहुसंख्यांक असूनदेखील दुय्यम दर्जाची वागणूक म्हणे त्यांना मिळते म्हणून !

तेव्हा "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"चा बुरखा विरून गेला आणि आपल्यासमोर चेहरा उभा राहिला तो कोणता ? तर निर्भेळ आणि नग्न जातीयवादाचा ! शिवसेनेच्या इतर मागण्या म्हणजे–उदहरणार्थ, अन्य राज्यांतून महाराष्ट्रात येणारे लोकांचे लोंढे थोपवून धरण्यासाठी परवाना पद्धतीचा अवलंब सुरू करणे इत्यादी–ज्या मागणीमधून त्यांचा राष्ट्रवाद आणि देशप्रेम यांचा दावा उघडा पडतो, त्याची चर्चा आपण पुढच्या लेखांकात करू.

येथे आम्ही ज्या मुद्याकडे लक्ष वेधू इच्छितो तो असा की, समाजवादाच्या आपल्या उदात्त ध्येयाची गल्लत आपण एका विशिष्ट धर्माशी करता. त्यामुळे लवकरच तुम्हाला अनुभवावयास मिळते की, त्याच विशिष्ट धर्मातल्या व हाताशी एक अधिक सामर्थ्यशाली संघटना असलेल्या एका अंतर्बाह्य जातीयवाद्यांच्या हातातले केवळ एक साधन असे स्वरूप त्या उदात्त उद्दिष्टाला प्राप्त होते. तसे व्हावयास नको होते असे आम्हाला वाटते. पण असे कधी कधी घडते. सूक्ष्म धाग्याने का होईना पण सत्प्रवृत्त माणूस

दुष्प्रवृत्तांच्या कळपात जातो अन मग नको असलेल्या अन संशयास्पद अशा बंधनांमध्ये गुरफटला जातो.

खाडिलकरांनी सोविएत संघराज्यावर स्तुतिसुमने उधळली. कशासाठी ? तर धर्म ही प्रत्येक व्यक्तीची खाजगी बाब त्यांनी बनविली म्हणून ! धर्म घरात बंदिस्त केला म्हणून ! सार्वजनिक जीवनातून धर्माला हद्दपार केले म्हणून ! एक अनुकरणीय आदर्श म्हणून या साऱ्यांचा त्यांनी मुक्त कंठाने गौरव केला. पण मग त्यातून निष्पन्न काय झाले ?

आणि म्हणून आम्ही कळकळीने सांगतो, की सत्प्रवृत्त लोकांनी आणि पुरोगामी समाजपरिवर्तन घडवून आणण्याची मनिषा बाळगणाऱ्यांनी अन्य धर्मियांच्या विरोधामध्ये ज्यांचा जातीयवादी कल जाहीरपणे खडा आहे त्यांच्या विचारांशी आपल्या विचारांची भेसळ करू नये.

म्हणून पूर्वी व्यक्त केलेल्या अथर्ववेदातील स्तोत्राचे आपण पुनः स्मरण करूया.

> हे पृथ्वीमाते, तू भिन्न भाषा आणि भिन्न धर्मपंथांच्या लोकांना त्यांच्या त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणांना अनुसरून जन्म देतेस तर कधीही न आटणाऱ्या गोमातेच्या क्षीरधारेप्रमाणे हजारो प्रवाहांनी तू मला ऐश्वर्य प्राप्त करून दे.

ही परंपरा आम्ही स्वीकारतो व पुढे घेऊन जातो. आणि दुसरी परंपरा आम्ही नाकारतो.

(१५) साध्य आणि साधन

सोविएत संघराज्यातील समाजवादाने मिळवून दिलेल्या फायद्यांचे वर्णन करताना खाडिलकर वस्तुनिष्ठ आणि उद्‌बोधक भूमिका बजावतात. तशाच प्रकारचे सामाजिक बदल घडवून आणण्याच्या दिशेने भारताने वाटचाल करावी असे त्यांना अत्यंत तळमळीने वाटते. परंतु सिद्धांतांच्या क्षेत्रात त्यांनी जो फेरफटका मारलाय तो मात्र अनावश्यक आणि गोंधळलेला वाटतो. खरं तर आपण पूर्वीच्या लेखांकात म्हटल्याप्रमाणे सिद्धांताबाबत त्यांना फारसे गांभीर्य दिसत नाही. समाजवादाच्या विज्ञाननिष्ठ सिद्धांताविषयी ते एक प्रकारचा तिटकाराच व्यक्त करताना आढळतात. त्यामुळे या क्षेत्रात ते जेव्हा संचारतात तेव्हा त्यांची भूमिका एकप्रकारे कुचेष्टेची असल्याचे जाणवते. जणू काही सिद्धांत व्यर्थ असल्याचेच ते मानतात.

"आहेरे" आणि "नाहीरे" यांच्यातील संघर्षाचे त्यांचे स्पष्टीकरण म्हणजे प्रत्यक्ष वास्तव जीवनातील अंतर्विरोध, भांडवलशाही समाजरचनेतील वर्गसंघर्ष, दोन परस्परविरोधी शक्तींमधील एकजूट आणि लढा इ. संबंधीच्या नियमांना अतिसोपे बनविण्याचा एक प्रयत्न म्हणून आपण त्याकडे डोळेझाक करूया.

तथापि, डायलेक्टिक्स (अंतर्विरोधशास्त्र–गतिशास्त्राच्या क्षेत्रात) जेव्हा ते प्रवेश करतात आणि हेगेलला मार्क्सच्या विरोधात ते जेव्हा उभा करू पाहतात, तेव्हा तर ते अगदी शर्थ करतात. आणि सरतेशेवटी त्यांच्या विकृतीकरणाची हद्द गाठतात. डोक्यावर उभे असलेले हेगेलचे डायलेक्टिक्स मार्क्सने पुन्हा सरळ पायावर कसे उभे केले किंवा खाडिलकर मार्क्सला पुन्हा सरळ पायावर उभा करतात किंवा कसे त्याबाबतच्या चर्चेत शिरण्याची काही आवश्यकता नाही. परंतु एवढे सांगितलें तर पुरेसे होईल की, भांडवलशाही हा "थिसिस" आणि कम्युनिझम हा "अँटिथिसिस" आणि प्रॅक्टिकल सोशॅलिझम हा "सिन्थिसिस" असं म्हणणे म्हणजे "डायलेक्टिक्स" (गतिशास्त्र)ची कक्षा सोडून पार दूरवर नेम मारण्यासारखे आहे ! माफ करा, निळुभाऊ, ह्याला डायलेक्टिक्स म्हणत नाहीत. हौ तर केवळ हातचलाखी झाली. असल्या डायलेक्टिक्सबाबत आम्ही मार्क्सवादी अगदी अनभिज्ञ आहोत.

विकासाच्या प्रत्येक अवस्थेला एक विशिष्ट क्रम असतो व तो क्रम विकासाचे एक प्रकारचे सातत्य आणि सर्वसाधारण कल (दिशा) व्यक्त करीत असतो. ही त्याची पुरोगामी गती सरळसोट नसते. आणि पुढची झेप जेव्हा घेतली जाते तेव्हा प्रसंगी मागे झेप घेतल्याखेरीज ती घेता येत नसते. तथापि, समाजशास्त्रातील गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्यासाठी एखादा यांत्रिक फॉर्म्युला वापरावा अशा तऱ्हेने डायलेक्टिक्सचा वापर करण्याचे स्वप्न मार्क्सवाद कधीही रंगवीत नाही. मार्क्सचा जिगरदोस्त फरेडरिक एंगल्स याने म्हटल्याप्रमाणे, हेगेलच्या त्रि-स्थिती (थिसिस–ॲन्टिथिसिस–सिन्थिसिस किंवा नकार-स्थितीचा––नकार इ.) च्या सहाय्याने आपले म्हणणे सिद्ध करण्याचा विचार-देखील मार्क्सच्या मनाला कधी शिवला नाही. तो फक्त वास्तव प्रक्रियेचे सूक्ष्मावलोकन करून त्याची कारणमीमांसा करीत असे आणि सिद्धांत वास्तवतेशी मिळताजुळता असणे हचा एकाच निकषावर त्याची सत्यासत्यता पारखून घेत असे. कोणताही समाजशास्त्रविषयक सिद्धांत हा वास्तव प्रक्रियेचे बिनचूक प्रत्यंतर देणारा असला पाहिजे यावर त्याचा कटाक्ष असे. कणभर-देखील त्यात काही कमी अथवा काही अधिक असता कामा नये याबाबत तो अगदी काटेकोर असे. तसे नसते तर, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास आणि त्याच्या प्रत्यक्ष जीवनकालात घडणाऱ्या दैनंदिन घटना, क्रांतीचे डावपेच आणि धोरणे इ. बाबींसंबंधीच्या अंगोपांगांचा सूक्ष्म आणि सखोल व व्यापक अभ्यास करण्यासाठी त्याने जे अपूर्व कष्ट घेतले ते घेण्याची त्याला गरजच पडली नसती. एखाद्या प्रेषिताप्रमाणे भांडवलशाहीचा अस्त आणि त्या जागी एका नव्या समाजरचनेची प्रस्थापना घोषित करून तो मोकळा होऊ शकला असता.

एका ठिकाणी खाडिलकर असा प्रश्न करतात की, समाजामध्ये आणि माणसा-माणसामध्ये आपणास अनुभवावयास येणारे संघर्ष जर संपुष्टात आले तर पुढची प्रगती होईलच कशी ? त्याला आमचे उत्तर असे आहे की : नव्या आणि जुन्यातील संघर्ष, नव्यांकडून जुन्याला नकार, यांची परस्पर-विरोधी नसलेल्या अशा अंतर्विरोधांची एक मालिका चालू राहणे हेच समाजवादी आणि कम्युनिझमच्या विकासावस्थेमधील विकासाच्या गतिनियमाचे वैशिष्ट्य असते. त्यापेक्षा अधिक तर्कवितर्क किंवा भविष्यकथन आम्ही करीत बसत नाही.

पण त्याची एवढी चर्चा येथे पुरेशी आहे. भारताबाबत खाडिलकर ज्याचा पुरस्कार करतात त्याकडे आपण पुन्हा वळूया. प्रत्यक्षात ते जर कशाचा पुरस्कार करीत आहेत तर तो एवढाच की रशियातल्या इकडच्या तिकडच्या काही काटक्या गोळा करून आणायच्या आणि भारतातल्या वास्त-

वतेवर त्याचे कलम करायचे. त्यातून भारतीय प्रकारच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"चे फळ पदरी पडेल अशी आशा ते बाळगतात. त्यांच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"मध्ये भारतीय समाजातील अंतर्विरोधांचे, त्यांच्या मुळांचे, आजच्या काळापर्यंतच्या ऐतिहासिक विकासाचे सखोल विश्लेषण केलेले आढळत नाही. भितीला पाठ टेकलेल्या आणि "जैसे थे" अवस्था कायम टिकवू पाहणाऱ्या शक्ती आणि क्रांतिकारी परिवर्तनासाठी लढा करणाऱ्या शक्ती यांच्यामध्ये सध्या चालू असलेल्या प्रत्यक्ष लढचांची नोंद त्यात घेतलेली दिसत नाही. इतर वर्गांच्या बरोबरीने क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणणारा आणि समाजवादाच्या दिशेने देशाला घेऊन जाणारा वर्ग कोणता तेही त्यात कोठे दर्शविलेले नाही.

तेव्हा थोडक्यात म्हणजे "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" हे एक प्रकारचे व्यक्तिनिष्ठ समाजशास्त्र आहे आणि ते "आपणास जेथून कोठून जे जे काही चांगले दिसेल ते घ्यावे मग ते आपले आहे की परके हा तत्त्वाचा प्रश्न नसून व्यावहारिक सोयीचा आहे" या पायावर आधारलेले आहे.

खाडिलकर ज्याविषयी लिहितात वा बोलतात त्यात भारताच्या दृष्टीने काय अपेक्षित आहे यापेक्षा अधिक काही नाही. ते उद्दिष्ट कसे साध्य करायचे त्यासंबंधी त्यांना स्पष्ट जाणीव नाही. परिणामी, कम्युनिस्ट हे त्यांच्या लेखी कसलाही व्यवहार न समजणारे "पोथीवादी" यापेक्षा दुसरे काही नाही. असे लेखून त्यांनी जोडा नेमक्या चुकीच्या पायात अडकविला ! त्यांच्या नजरेतून नेमके सुटले जर काय असेल तर ते म्हणजे "प्रॅक्टिकल" प्रश्न. त्यांना अपेक्षित असलेले सामाजिक परिवर्तन कोणत्या सामाजिक शक्ती, कोणत्या वर्गांच्या युत्या घडवून आणणार आणि लढचांचे कोणते प्रकार ते हाताळणार आणि कोणते डावपेच लढविणार त्याचा मागमूसही त्यांच्या "प्रॅक्टिकल" सोशॅलिझममध्ये आढळत नाही.

पण कदाचित आम्ही चुकत असू ! कदाचित खाडिलकरांनी उत्तर दिलेलेही असेल ! एका अर्थाने त्यांनी ते दिलेले आहे. त्यांच्याच लेखातून मी एक अवतरण उद्धृत करतो.

शिवसेनेच्या दसरा संमेलनामध्ये बोलताना ते म्हणाले होते "इदं शस्त्रं इदं शास्त्रं !,....सोविएत पद्धत हे शस्त्र आणि प्रॅक्टिकल सोशॅलिझम हे शास्त्र....हा केवळ एक विचार नव्हे तर ती एक तलवार आहे आणि ही तलवार जो लढवय्या आहे आणि "नाही-रे" वर्गासाठी ज्याला लढावयाचे आहे तो उचलल्याशिवाय राहणार नाही—मग आज तो तसे करो किंवा उद्या करो हे काम पुरमय्याचे नव्हे. (उत्तरेकडील कामगारांच्या संदर्भात एका गरीब बिचाऱ्या प्राण्याच उल्लेख—ए. बी. बर्धन).

श्री. ठाकरे हे लढवय्ये आहेत आणि म्हणून त्यांनी हा विचार स्वीकारणे आणि त्याचा प्रसार करणे स्वाभाविक आहे !"

तत्पूर्वी त्यांनी हर्षभराने लिहिले होते की, सोविएत पद्धत आणि प्रॅक्टिकल सोशॅलिझमच्या त्यांच्या निरुपणामुळे दीर्घकाळ समाजवादाचे विरोधक असलेल्या बाळासाहेबांचे मतपरिवर्तन झाले.

तेव्हा खाडिलकरांच्या मते, बाळासाहेब आणि त्यांच्या निष्ठावंत सैनिकांची सेना यांचे मतपरिवर्तन झाल्यामुळे तेच आता भारतामध्ये "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" आणतील.

जाता जाता, सोविएत पद्धत आणि त्याचे जे स्पष्टीकरण ठाकरे यांनी पुढे केले आहे, त्याचा खाडिलकरांच्या मते अर्थ काय ? त्यांनी ती पद्धत म्हणजे हुकूमशाही आहे असे म्हटले आहे ! एका ठिकाणी ते स्मरण देतात की, भारताला किमान १५ वर्षे तरी हुकूमशाहीची गरज आहे असे सुभाषचंद्र बोस एकदा म्हणाले होते. ठाकरे यांच्या एकूण राजकीय दृष्टिकोनाशी आणि महत्त्वाकांक्षेशी मिळताजुळता असाच त्यांनी हुकूमशाहीचा सोयिस्कर अर्थ लावला आहे. परंतु सूक्ष्मदृष्टीच्या खाडिलकरांसारख्या विचारवंताने, ज्याला जवळून ती पद्धती अवलोकन करण्याची संधी मिळाली त्याने, सोविएत पद्धतीचे सार कशात आहे याचा सखोल अभ्यास करावयास नको होता काय ? तो जर त्यांनी केला असता तर ही एका नव्या धर्तीची राज्यसत्ता आहे हे त्यांना समजल्याखेरीज राहिले नसते. भांडवलदारवर्ग, जमीनदारवर्ग, यांसारख्या पिळणूक करणाऱ्या वर्गांना सत्तेवरून क्रांतिकारक मार्गाने यशस्वीरीत्या उलथून टाकणाऱ्या कष्टकरी जनतेच्या सत्तेचा गाभा खचितच त्यांच्या ध्यानात आला असता. सोविएत सत्तेच्या सर्व पातळ्यांवर कामगारवर्गाच्या प्रभुत्वाखाली कामगार-किसान-बुद्धिजीवी वर्गांची युती सरकारची सर्व कार्ये कशी पार पाडते ते त्यांच्या सहज लक्षात आले असते. प्रत्येक देशामध्ये बहुसंख्य जनता ही ह्याच वर्गांची मिळून बनलेली असते. आणि पिळणारे वर्ग हे अतिसूक्ष्म अल्पसंख्य लोक असतात. खाडिलकरांसारख्या सूक्ष्मदर्शी व्यक्तीला मग मार्क्सवाद्यांच्या "कामगारवर्गीय हुकूमशाही" (सर्वाधिकारी अधिसत्ता)चा अर्थ आणि त्याचे महत्त्व नक्कीच समजले असते. कोणत्याही भांडवलदारी राजवटीतल्या सर्वोच्च लोकशाहीपेक्षा उच्च पातळीची ती "लोकशाही" असते. भांडवलदारी राजवटीमध्ये प्रत्यक्ष वर्गसत्ता, धनसत्ता, शस्त्र-सत्ता (पोलिस - लष्कर इ.) मक्तेदार–नियंत्रित प्रचारसत्ता, एवढेच कशाला सार्वत्रिक मतदानावर आधारित मत-सत्ता (निवडणुकीतील निकाल नियंत्रित करणारी) ही मूलतः अल्पसंख्य मतांवरच आधारलेली असते. याउलट सोविएत सत्ता ही बहुसंख्य जनतेकडून राबविली जात असलेली सत्ता

आहे, हे त्यांच्या ध्यानात आले असते. कारण राज्यकारभाराच्या दैनंदिन बाबींवर सर्वसामान्य जनता तेथील लोकशाहीमध्ये कृतिशीलपणे प्रत्यक्ष प्रभाव पाडत असते. तेव्हा हचा कामगारवर्गीय "हुकूमशाही"मध्ये आणि जगातल्या इतर सर्व हुकूमशाहीच्या प्रकारांमध्ये जमीन - आस्मानाइतके अंतर आहे. आज सोविएतमध्ये अस्तित्वात असलेल्या लोकशाहीमध्ये अपरिपूर्णता नाही काय, उणीवा नाहीत काय, नोकरशाही विकृतीकरण नाही काय? त्याला उत्तर सोविएत नेत्यांनीच दिलेले आहे. ही अपरिपूर्णता निदर्शनास आणणारे तेच पहिले राज्यकर्ते आहेत. एवढेच नव्हे तर ती अपरिपूर्णता नाहिशी करण्यासाठी आणि लोकशाहीचा संकोच करणाऱ्या प्रत्येक घटकाविरुद्ध अविरत लढा करण्यासाठी ते अव्याहतपणे प्रयत्नशील आहेत.

जाता जाता मला सांगितले पाहिजे की, जे असावं असं वाटतं ते आहे अशा भ्रमावस्थेत ज्यांना रहावयाचे असेल त्यांना कोण रोखू शकणार! त्यांनी वाटल्यास गगनाला गवसणी घालीत भ्रमावस्थेत खुशाल राहावे. त्यांनी कल्पनेचे हवेतेवढे मनोरे खुशाल रचित बसावे. "नवाकाळ"मधील एका लेखकाने समाजवाद आणि सोविएत पद्धतीबाबत ठाकरे यांचं मतपरिवर्तन झाले असे घाईघाईने लिहून टाकले व पुढे जाऊन त्यांनी "कामगारवर्गीय हुकूमशाही"चा स्वीकार केल्याचे सर्टिफिकेट देखील त्यांना बहाल करून टाकले. त्यासाठी सदर लेखकाला बरेच लांबलचक पाल्हाळ लावावे लागले. परंतु ठाकरे यांचा योग्य तो मान राखून सुद्धा एवढेच म्हणता येईल की, ते ज्या "हुकूमशाही" बद्दल बोलतात ती अगदी सरळ–साधी नंगी–हुकूमशाहीच आहे!

इतिहास – अगदी आपल्या देशाचा देखील आपणास असे शिकवितो की, "अधिनायक" किंवा निरनिराळचा प्रकारच्या पाठिराख्यांच्या गटाचे नेतृत्व करणारे "थोर लढवय्ये" हे समाजरचना बदलू शकत नाहीत. नेते आणि प्रतिभावंत व्यक्ती आपल्यासमोर चमकतात याचे कारण एवढेच की, इतिहासक्रमाच्या विशिष्ट वळणावर ते जनसमुहांशी एकरूप होऊन त्यांचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांचे नेतृत्व करून यशोसिद्धीच्या दिशेने त्यांचे मार्गदर्शन करतात. परंतु आपणास ज्या प्रकारचे मूलगामी परिवर्तन अपेक्षित आहे आणि स्वतः खाडिलकर देखील ज्याचा उल्लेख करतात, ते म्हणजे जवळजवळ एक प्रकारची सामाजिक क्रांतीच असते. त्यात प्रचंड संख्येने असलेल्या जनसमुदायांची दडपशाहीपासून आणि पिळवणूकीतून मुक्तता अपेक्षित असते. तेव्हा, हे ओघानेच येते की, अशा कार्यामध्ये, प्रत्यक्ष ज्यांनी कृतिशील व्हावे अशी अपेक्षा असते आणि जे प्रत्यक्षात होतातही असा जनसमुदाय त्यामानाने फार प्रचंड असावा लागतो.

साहजिकच अशा जनसमुदायामध्ये कामगार, शेतमजूर, कष्टकरी

शेतकरी, मध्यमवर्गीय कामगार–कर्मचारी आणि विचारवंत, तरुण, विद्यार्थी, महिला इ. सर्वांचाच समावेश असणे अपरिहार्य आहे. ह्या विभागांची, त्यातल्या त्यात सुसंघटित कामगारवर्गाची लढचांची अन त्यागाची एक प्रदीर्घ परंपरा आहे. शहरी तसेच ग्रामीण कामगारांचे आपल्या "मालकां" विरुद्ध अन "सरकार" विरुद्ध जे लढे चालताहेत त्यामुळे त्यांची जाणीव उंचावत जाण्यास मदत होत आहे. आणि त्यातून ते अधिक सुसंघटित होत आहेत. कष्टकरी जनसमूहांच्या प्रत्येक विभागाला जीवन-परिस्थितीच्या दबावामुळे निर-निराळ्या संघटनांमध्ये एकत्रित होणे निरनिराळ्या लढावू कृती करणे, संयुक्त लढचांच्या कृती करणे आणि परस्परांविषयी भ्रातृभाव व्यक्त करणे भाग पडत आहे. परिणामी एकूण चळवळीची व्याप्ती आणि व्यापकता सतत अधि-काधिक विस्तृत होत आहे.

हे काही एकादे स्वप्नरंजन नाही–– किंवा मनोराज्य नाही तर जीव-नाची वास्तवता आहे. अशा सर्व कृतींची तपशीलवार जंत्री देणे आणि पुढील अधिकाधिक व्यापक लढचांचे संपूर्ण चित्र रेखाटणे येथे स्थलाभावी केवळ अशक्य आहे. आणि तसे ते आवश्यक देखील नाही. कारण प्रत्यक्ष आपल्या डोळचांसमोर जे काय घडत आहे ते ज्यांच्या डोळचांच्या खाचा झाल्या असतील अशा आंधळ्यांनाच केवळ दिसू शकणार नाही.

आपल्या देशाला अत्यावश्यक असे क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणणारी सामाजिक शक्ती, येथेच, ह्या जनविभागांमध्येच आपणास आढळते. साहजिकच समाजाच्या आर्थिक आणि भौतिक जीवनामध्ये असलेल्या त्याच्या विशिष्ठ स्थानामुळे, अत्यंत महत्त्वाच्या केंद्रात झालेल्या त्याच्या केंद्रीकरणामुळे आणि स्थायी आणि प्रभावी संघटना उभारण्याच्या त्याच्या क्षमतेमुळे, कामगारवर्ग हाच इतर सर्व शक्तींच्या अग्रस्थानी असणे अपरिहार्य आहे.

पण, प्रत्येक विभागामध्ये संघटना पसरविणे आणि मजबूत बनविणे, त्या त्या विभागाची जाणीव उंचावणे, निरनिराळ्या विभागांमधल्या संघट-नांच्या चळवळींचे प्रवाह एका प्रचंड प्रवाहाच्या स्वरुपात, अशा तऱ्हेने एकत्र आणणे, की जेणेकरून जुनी सडकी–कुजकी समाजरचना उध्वस्त करून त्याजागी एका नव्या समाजरचनेची प्रस्थापना करण्याचे सामर्थ्य आणि जिद्द त्यात निर्माण होईल. हे सारे कार्य काय आपोआप घडून येणार आहे? असे प्रचंड कार्य विज्ञाननिष्ठ सिद्धांत आणि क्रांतिकारी व्यवहार यांची संसूत्रपणे सांगड घालू शकेल आणि कष्टकरी जनसमुदाय हाच ज्याचा मूलाधार असेल असा राजकीय पक्षच करू शकेल नाही कां?

खेदाने म्हणावे लागते की, हे सारे खाडिलकरांनी दुर्लक्षिलेले आहे.

समाजवादाला त्याच्या विज्ञाननिष्ठ जागतिक दृष्टिकोनाचा व्यापक पाया ज्याने उपलब्ध करून दिला तो मार्क्सवादच खाडिलकर उखडून टाकू पाहतात.

देशाला समाजवादाच्या दिशेने घेऊन जाऊ शकेल असा कामगारवर्ग आणि त्याचे साथिदारवर्ग यांची मूलभूत महत्त्वाची भूमिकाच खाडिलकर नाकारतात किंवा निदान तिचे महत्त्व समजून घेण्यात अयशस्वी ठरतात.

हे क्रांतिकारक कार्य तडीस नेण्यासाठी कामगारवर्गाच्या क्रांतिकारक पक्षाची, कम्युनिस्टांची आणि त्यांच्या पक्षाची गरज खाडिलकर तुच्छतेने फेटाळून लावतात.

आणि म्हणून सोविएत संघराज्यात समाजवाद प्रत्यक्षात आलेला पाहून त्यांची जी समज त्यांना आली त्याची बहुमोल भर त्यांच्या "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" द्वारे त्यांनी एकूण समाजवादी चळवळीत घातली हे मान्य करीत असतांनाच खेदाने म्हणावे लागते की, "प्रॅक्टिकल सोशॅलिझम" म्हणजे एक प्राणवायुविरहित शरीर आहे.

खाडिलकर आणि ठाकरे, दोघेही स्वतःला "सावरकरवादी" म्हणवितात. ठाकरे यांनी तर आपला "नवा क्रांतिकारक विचार" घोषित करणाऱ्या घोषणापत्रावर रशियन क्रांतीचे स्वागत करणारी "स्वातंत्र्यवीर सावरकर सूक्ती" एखाद्या कोनशीलेप्रमाणे कोरून ठेवली आहे. "रशियन क्रांती ही आजवरच्या सर्व क्रांत्यांमध्ये एक अत्यंत अपूर्व, सर्वंकष जितकी साहसपूर्ण तितकीच भीतिदायक आहे आणि मानवी समाजरचनेचे समग्र परिवर्तन करण्याचे महान उद्दिष्ट ती दृष्टीसमोर ठेवते."

क्रांतिकारक नेत्यांच्या स्मृतिमंदिरात सावरकर हे एक अत्यंत उठावदार व्यक्तित्व म्हणून मानले जाते. भूमातेच्या चरणतलावर सेवावृत्तीने स्वतःचे शीर-कमल अर्पण करण्याची प्रेरणा त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणाने भारतीय तरुणांच्या एका समग्र पिढीला दिली. पण हे सारे गृहित धरून सुद्धा एका विशिष्ट सीमारेषेपलिकडे सावरकर पुढचे पाऊल टाकू शकले नाहीत. त्यांच्या पुढच्या राजकीय कार्याचे साधन म्हणून, आपले विचार प्रत्यक्षात उतरविण्याचे अन पुढे अंमलात आणण्याचे एक साधन म्हणून जेव्हा त्यांनी हिंदू महासभेची निवड केली तेव्हाच ते निष्प्रभ बनले. स्वातंत्र्य आणि प्रगतीच्या राष्ट्रीय उत्थानाच्या संदर्भामध्ये, त्याच्या अंतिम पर्वात, त्यांचे व्यक्तिमत्व लोप पावले. व्यक्तीची सृजनशीलता ही अखेरीस तो ज्या साधनाचा वापर करतो त्यावरूनच ठरते.

(१६) ठाकऱ्यांनी "प्रॅक्टिकल सोशॅलिझम"ला दत्तक घेतले खरे--पण कशासाठी ?

भारतासमोर आज खडचा ठाकलेल्या अशा अत्यंत धोकादायक प्रमाणापर्यंत पोचलेल्या पाच प्रमुख समस्यांची नोंद खाडिलकरांनी घेतली आहे. परिस्थितीचे पाच प्रमुख मूलघटक "पंचमहाभूते" असे त्यांनी त्यांना नाव दिले आहे. त्यांचा क्रम असा :

१) लोकसंख्येची अनिर्बंध वाढ.

२) भारतात अवाढव्यपणे विस्तारलेली मूठभर मक्तेदारांची प्रचंड वाढती संपत्ती आणि सत्ता.

३) सामाजिक–आर्थिक – आणि शैक्षणिक विषमतेवर आधारलेल्या हिंदू-धर्मांतर्गत जातीयतेचा शाप.

४) अर्थव्यवस्थेचा अत्यंत मंदगती विकास आणि विकासातील अडथळे.

५) राष्ट्रीय एकतेचा व अस्तित्वाचा संपूर्ण विध्वंस करू पाहणाऱ्या विघटनकारी शक्ती.

केवळ एवढ्याच आणि ह्या प्राधान्यक्रमाने नसल्या तरी ह्या समस्या अत्यंत गंभीर आहेत यांत शंका नाही. पण ते असो. प्रश्न आहे तो असा की, ह्यापैकी काही समस्यांच्या (अर्थात सर्वच नव्हे) मुळाशी काय आहे ? ह्यापैकी बहुतेक समस्या वाढण्याला भूमी उपलब्ध होते ती कोणती?

आजच्या आपल्या बहुसंख्य समस्यांच्या मुळाशी आपल्या देशातली भांडवलदारी पद्धती आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात जो भांडवलदारी विकासाचा मार्ग अवलंबिण्यात आलेला आहे तीच कारणे आहेत. या मार्गाने अपरिहार्यपणे वाढती विषमता, म्हणजे एका टोकाला भीषण दारिद्र्य अन दुसऱ्या बाजूला संपत्तीचे वाढते केंद्रीकरण, सतत चढत असलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती आणि चलनवाढ (भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांच्या मते विकासासाठी अटळपणे मोजावी लागणारी ती किंमत आहे.) वाढती बेकारी – (अगदी एम्प्लॉयमेंट एक्सचेंजच्या आकडेवारीनुसार जिने २ कोटी १० लाखांची मर्यादा पार केलेली आहे, त्यांत १९८२ च्या अखेरीस वैज्ञानिक आणि

तंत्रशास्त्रज्ञांची संख्याच ४ लाख ४८ हजार इतकी होती.) विकासाची मंद गती – (त्यातही विकासाची लक्षणीय असमानता, जिच्यामुळे काही विभाग अत्यंत मागास अवस्थेत ढकलले गेले आहेत. याउलट काही थोडेसे पुढे घुसलेले आहेत.) सामान्य जनतेच्या हितसंबंधांचा बळी देऊन मक्तेदार आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त कुरण उपलब्ध करून देणारी आर्थिक धोरणे (१९८२–८३ साली १४०० कोटींवर असलेल्या कर्जांचा वाढता बोझा जो १९८६–८७ पर्यंत ३१,००० कोटींवर जाईल असा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे आणि ज्यामुळे देश सावकारी पाशामध्ये गुरफटला जात आहे). स्वतंत्र स्वावलंबी अर्थरचनेची उभारणी करण्याच्या धोरणांना लागणारे सुरुंग इत्यादी इत्यादी.

खरे पाहता, आपल्या देशामध्ये विकासक्षमता फार प्रचंड आहे. नैसर्गिक साधनसामुग्री अन साठे यांची विपुलता आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यात पारंगत असे अवाढव्य मनुष्यबळ आहे. अत्याधुनिक कुशल कामगारवर्ग आहे. तसाच जिद्दीचा कष्टकरी किसानवर्ग आहे. एवढे सारे असूनदेखील आपणासमोर हचा सामस्या खडचा ठाकलेल्या आहेत आणि हे सारे कशामुळे तर विकासाचा जो भांडवलदारी मार्ग अवलंबिण्यात आला त्यामुळे. जमीनधारणा कायदा अंमलात आणण्यास आणि किसानांना त्यांच्या शेतीतून निर्माण होणाऱ्या मालाला किफायतशीर भाव देण्यास नकार हेच ग्रामीण दारिद्र्याला, त्यांच्या सांस्कृतिक मागासलेपणाला, शेतीव्यवस्थेतील रोजगारी आणि देशांतर्गत बाजारपेठांच्या नियंत्रणाला जबाबदार आहेत. तशात वारंवार येणाऱ्या दुष्काळ आणि महापुरासारख्या विध्वंसकारी तथाकथित नैसर्गिक आपत्तीमुळे आणि निसर्गाबाबतच्या भांडवलशाहीच्या लुटारू कृतींमुळे हे भीषण अरिष्ट तर अधिकच तीव्रतर बनते. (नफ्याच्या लालसेपायी होणारी जंगल तोडणी, ढोंगीपणाने तोंडाने पवित्र मानलेल्या नद्यांचे प्रदूषिकरण). भाकरी आणि काम यांच्या शोधात गोरगरिबांचे लोंढेच्या लोंढे शहरांच्या दिशेने धाव घेतात त्याच्या बुडाशी ही कारणे आहेत.

पुढे, आपला देश हा एक खंडप्राय असा विस्तीर्ण पसरलेला देश आहे. त्याचे स्वरुप बहुरंगी–विविधांगी आहे. त्यात अनेक भाषा, अनेक धर्म, अनेक संस्कृतींचा–अत्यंत पुढारलेल्यांपासून तो अगदी आदिम प्राथमिक अन मागास अशा आदिवासींपर्यंत बहुरंगी संस्कृतींचा–समावेश आहे. त्यामुळे त्या सर्वांना भारतीय जनता म्हणून भाषेच्या समानतेच्या पायावर एकत्र गुंफण्यामध्ये गुंतागुंतीच्या समस्या समोर उभ्या ठाकतात. शतकांनुशतके ज्यांना असमानतेची वागणूक मिळाली व ज्यामुळे ते मागासलेले राहिले त्यांना इतरांच्या पातळीला आणायचे तर त्यांना काही खास सवलती, सुविधा, सुसंधी देणे आवश्यक ठरते. समान आर्थिक विकास, संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य आणि खरीखुरी

धर्मनिरपेक्षता निर्माण करणे, तशात राज्याचे फेडरल स्वरूप कायम ठेवायचे. अशा समस्या उभ्या ठाकतात. आज ह्या साऱ्या समस्या किती वास्तव आणि तातडीच्या बनलेल्या आहेत हे आपण जाणतोच. भांडवलदार वर्ग आणि त्यांचा सत्तारूढ पक्ष यांची राष्ट्रीय एकता अन राष्ट्रीय एकात्मता कायम टिकविण्याबाबत संपूर्ण दिवाळखोरी सिद्ध झालेली आहे. ह्या साऱ्या उदात्ततेची पताका उंच फडकवायची तर ते कार्य कष्टकरी जनता आणि त्यांच्या संघटनांनाच आता करावे लागणार आहे.

लोकसंख्येची अनिर्बंध वाढ ही देखील एक महत्त्वाची समस्या आहे. अनेक कारणांसाठी आहे. त्यांत उदाहरणार्थ, कुटुंबकल्याण आणि स्त्री-मुक्ती इ. चा समावेश होतो. परंतु ह्या समस्येचा विचार करताना अन्य समाजशास्त्रविषयक समस्यांबरोबरच तो केला पाहिजे. आणि जन्ममृत्यूविषयक एकूण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुरोधाने तो केला पाहिजे. अन्यथा, देशातील भीषण दारिद्र्य, मागासलेपणा, वाढती बेकारी यांच्या मुळाशी लोकसंख्यावाढ हीच कारणीभूत आहे, असा जो दावा भांडवलदार आणि त्यांचे भाट करतात त्यांना एक सबब पुरविणे यापेक्षा अधिक त्यातून काही साधणार नाही.

रशियनांचा "राष्ट्रवाद" आणि राष्ट्रीय अभिमान याकडे खाडिलकर वारंवार आपले लक्ष वेधतात. अन सोविएत पद्धतीमधून तो पुढे आला असे म्हणतात. सोविएत जनतेच्या "देशप्रेमा"ची गल्लत त्यांनी "राष्ट्रवादा"शी केली आहे. रशियनांचा "राष्ट्रवाद" आमच्या माहितीनुसार, झारशाही साम्राज्यातील छोट्या छोट्या म्हणजे जॉर्जिया, अर्मेनिया, पूर्वेकडील उझ्बेकिस्तान, ताजिकिस्तान इत्यादि राष्ट्रकांचा "राष्ट्रवाद" दडपून टाकण्यामध्ये व्यक्त होत होता. असल्या प्रकारच्या "राष्ट्रवादा"पासून सावध राहण्याचा इषारा लेनिन सतत देत असत. ——मग तो "महान रशियन" प्रकारचा असो अथवा त्याच्या विरोधी असलेल्या दुसऱ्या बाजूच्या "छोट्या राष्ट्रकांचा राष्ट्रीय दुरभिमान" असो, "राष्ट्रवादा"च्या ह्या असल्या प्रकारांचा प्रादुर्भाव बहुराष्ट्रीय सोविएत जनतेमध्ये होऊ नये यासाठी अविरतपणे लढा करण्याचे आवाहन लेनिन करीत असे.

सोविएत जनतेचा स्वदेशाभिमान आणि आंतरराष्ट्रीयवाद हातात हात घालून जातात. साम्राज्यवाद्यांच्या आक्रमक कारवायांपासून जागतिक शांततेचे संरक्षण करण्याच्या प्रश्नाबाबतच्या, राष्ट्रीय मुक्तिलढे आणि पुरोगामी उद्दिष्टे यांना ते देत असलेल्या निःस्वार्थी पाठिंब्याबाबतच्या, विकसनशील देशांना स्वतःच्या पायांवर स्वावलंबी अर्थरचना उभारण्यासाठी ते करीत असलेल्या

खऱ्याखुऱ्या मदतकार्याबाबतच्या, त्यांच्या वृत्तीमध्ये दिसून येतो. जागतिक क्रांतीची प्रक्रिया पुढे नेण्यासाठी आणि आपली पृथ्वी आणि तिच्यावरील भिन्न देश हे समृद्ध जीवन जगण्याच्या दृष्टीने योग्य बनावेत यासाठी आपल्या देशाचा उदात्त स्वार्थ आणि अन्य देशांच्या जनतेचे हितसंबंध हे परस्परांशी एकरूप असावे लागतात.

सोविएत संघराज्य आणि अन्य समाजवादी देश यांच्यामध्ये जे मतभेद दिसून येतात त्यामध्ये खाडिलकरांना सोविएत संघराज्याचा राष्ट्रवादी दृष्टिकोन आढळतो. सोविएत संघराज्य आणि चीन यांच्यातील संबंध चांगले नाहीत ही गोष्ट काही गुपित नाही. समाजवादी चीनने आपल्या मोठ्या राष्ट्राच्या दुरभिमानाचा, भूतकाळातून प्राप्त केलेला, वारसा अद्याप नियंत्रित केलेला नाही. परंतु म्हणून तेवढ्यावरून हे झगडे आणि संघर्ष अंतीम स्वरुपाचे आहेत असे कोणी मानू नये व त्यावरून सिद्धांत काढण्याची घाई करू नये. त्यातून जे काय उद्भवते आहे ते वास्तव आहे आणि ते म्हणजे समाजवादी आंतरराष्ट्रीयत्वाच्या पायावर उभयतांमधील परस्पर सहकार्य कमी होण्याऐवजी उलट अधिक वाढण्याच्या **शक्यता**. ह्या प्रश्नासंबंधी बोलतांना यूरी आंद्रोपोव यांनी खुल्या मनाने म्हटलेले आहे की ——

"निरनिराळ्या समाजवादी देशांमध्ये अर्थव्यवस्था, संस्कृती, समाजवादी विकासाच्या कार्यांची परिपूर्ती करण्याबाबतचे मार्ग आणि पद्धती यांच्यामध्ये बरीच भिन्नता आहे." आणि पुढे ते म्हणतात,

"जागतिक समाजवादाच्या इतिहासाने हे सिद्ध केलेले आहे की, समाजवादाच्या आत्मविश्वासपूर्वक प्रगतीसाठी आणि निरनिराळ्या देशांमध्ये सुसंवादी संबंध प्रस्थापित करण्यासाठी समाजवादी पद्धती सर्व **शक्यता** निर्माण करते....

ह्या शक्यतांचे प्रत्यक्ष जीवनामध्ये प्रत्यंतर येण्यासाठी अचूक राजकीय धोरण असणे अत्यावश्यक असते. राजकारणामध्ये ज्याला त्याला आपापल्या चुकांची किंमत चुकती करावीच लागते. एका नव्या समाजरचनेचे शिल्पकार म्हणून आमच्यामध्ये जे काय समान आहे ते इतके महान आहे की, त्याच्याशी तुलना करता आम्हाला विभक्त करणारे हे त्यामानाने अत्यंत क्षुद्र आहे."

आता आपल्या देशाशी निगडीत असलेल्या प्रश्नांकडे वळूया. साम्राज्यशाही राजवटीविरुद्ध आपण केलेल्या लढ्यात, तसेच अन्य वासाहतिक देशांनी केलेल्या लढ्यांत "राष्ट्रवादा"ने एक पुरोगामी आणि क्रांतिकारक भूमिका बजावली. परंतु भिन्न परिस्थितीमध्ये, साम्राज्यशाहीच्या कारवाया हाणून पाडण्यासाठी ज्या काळांत विशेषतः त्यांची आंतरराष्ट्रीय एकता आणि भ्रातृभाव

अत्यावश्यक असतो अशा काळात तोच "राष्ट्रवाद" एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध झुंजवू देखील शकतो.

भारतीय कम्युनिस्टांच्या देशप्रेमाच्या प्रामाणिकपणाबाबत शंका व्यक्त करण्यास कुणी धजावू नये. आम्ही देशप्रेमी आहोत, विशेषतः आमच्या देशात आम्ही परिवर्तन घडवून आणू इच्छितो, आमच्या देशातल्या जनतेची दारूण अवस्था आम्ही संपुष्टांत आणू इच्छितो या अर्थाने तर आम्ही खचितच देश-प्रेमी आहोत. एवढ्यासाठीच आम्ही तुरुंगात गेलो, लाठ्याकाठ्यांशी मुकाबला केला आणि आमच्या पवित्र भूमीवर रक्त सांडले. आणि उगवणाऱ्या प्रत्येक दिवशी आम्ही ते कार्य चालूच ठेवलेले आहे.

ठाकरेंच्या मुखातून बाहेर पडलेल्या मुक्ताफळांचा जर आपण सूक्ष्म-पणाने विचार केला (कारण अखेरीस प्रॅक्टिकल सोशॅलिझमच्या उद्दिष्टां-साठी एक लढवय्या म्हणून त्यांची खाडिलकरांनी भलामण केलेली आहे!) तर आपणाला दिसून येते ते हेच की, त्यांचे "राष्ट्रीय" क्षितिज हे महा-राष्ट्राच्या सीमारेषेने बंदिस्त केलेले आहे आणि ते देखील जे मानतात ते मराठी-भाषिक जनतेच्या हितसंबंधापुरतेच मर्यादित आहे. दसरा संमे-लनाच्यावेळी सिंधी, तामिळी, मुस्लिम इत्यादि लोकांविरुद्ध त्यांनी जे गरळ ओकले, त्यात कोणत्या प्रकारचा "राष्ट्रवाद" व्यक्त झालेला आपण पाहिला? ज्याला "देशप्रेम" म्हणतात ते हेच का?

या सर्वांवर कळस म्हणजे शिवसेनेच्या राज्य पातळीवरील पहिल्या-वहिल्या अधिवेशनात अन्य राज्यांतून महाराष्ट्रांत येणारा लोकांचा लोंढा थोपवून धरण्यासाठी परमिट पद्धती सुरू करण्याची त्यांनी केलेली मागणी. यापूर्वी, ठाकरे यांनी "बाहेरच्या लोकांना" मुंबई शहरामध्ये प्रवेश करू देण्यास, तेथील फुटपाथ खराब करण्यास व तेथील मोकळ्या जागांमध्ये झोपड-पट्ट्या उभारू देण्यास मज्जाव करण्यासाठी काय थोड्या कर्णकर्कश आरोळ्या ठोकल्या होत्या.

असं सांगण्यात येतं की महाराष्ट्राचा आर्थिक समतोल कायम राखण्या-साठी आणि मराठी जनतेच्या न्याय्य हक्कांचे अन हितसंबंधांचे रक्षण करण्या-साठी परमिट पद्धतीची उपाययोजना आवश्यक आहे. त्याकरिता सोविएत संघराज्यात शहरात कायम वास्तव करणाऱ्यांच्या प्रवेशाला सुनियंत्रित करण्यकरिता ज्या प्रकारची परमिटपद्धती वापरण्यात येते त्याचा आदर्श सांगण्यात येत आहे.

अन्य कोठेतरी असलेली एकादी पद्धत संपूर्णपणे वेगळ्या परिस्थितीत लागू करण्याचा आणि स्वतःच्या संकुचित दृष्टिकोनातून त्याचा वापर स्थानिक पातळीवर विकृतपणे लागू करण्याचा प्रयत्न कसा केला जातो त्याचे हे एक

खास उदाहरण म्हणून सांगता येईल. ठाकरेंना हे माहीत आहे काय की एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, ग्रामीण भागामधून शहरांकडे (उदा. बिहार आणि छत्तीसगड मधून पंजाब–हरियाणा अथवा कलकत्त्याच्या महानगरीमध्ये) लोकांचे जे लोंढे येतात ते ग्रामीण दारिद्र्यामुळे, वाढत्या भूमिहीन अवस्थेमुळे, वारंवार पडणाऱ्या दुष्काळ-महापुरासारख्या आपत्तींमुळे येतात. मूळ कारणाचा समूळ नायनाट न करता उलट कशीतरी वेळ मारून नेण्याचा परिणाम काय होईल? दारिद्र्य आणि उपासमारी यांच्यामुळे गतप्राण झालेल्या कोटचवधी गोरगरीब जनतेच्या हाडांच्या सापळचांनी भारताची सर्व पठारे अन दऱ्याखोऱ्या व्यापल्या जातील अन उजाड बनतील. अन मूठभर धनवंत आणि ऐषारामी खुशालचेंडू लोकांच्या चैनीसाठी अन आरामासाठी काही थोडीशी सुंदर शहरे वाळवंटातल्या हिरवळीप्रमाणे भारतभूमीला शोभा देत राहतील.

समाजवादी सोविएत संघराज्यामध्ये अर्थव्यवस्था एका संथ गतीने विकसित होत आहे. भिन्नभिन्न प्रदेशांचा विकास नियोजित आणि संतुलित पद्धतीने घडविण्यात येत आहे. तेथे कोणीही बेकार नाही. शहरे आणि ग्रामीण भाग यांच्यातील असमानतेची दरी हळूहळू कमी करण्यात आलेली आहे. आणि सांस्कृतिक पातळीतील फरकदेखील कमी करण्यात आलेला आहे. त्यामुळे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे किंवा ग्रामीण भागांतून शहरांकडे बेकार आणि उपासमारीने गंजलेल्या लोकांचे लोंढे तेथे वाहात नाहीत. लोकसंख्येची जी काय अदलाबदल होते ती योजनाबद्ध रीतीने करण्यात येते आणि ती देखील दूरवरच्या प्रदेशांचा विकास घडवून आणण्याकरिता करण्यात येते. जशी उदा. कझाखस्तानातील ओसाड जमिनीचा विकास करतांना अथवा सैबेरियातील मौल्यवान निसर्गसंपत्तीचा वापर करण्याच्या हेतूने करण्यात आली.

राष्ट्रवादाला आंतरराष्ट्रीयवादाच्या विरोधात उभे करणे आणि नंतर राष्ट्रवाद संकुचित करीत करीत प्रथम राज्यापुरता, **मग प्रदेशापुरता किंवा एखाद्या स्थानिक विभागापुरता क्षुद्र बनविणे हे हचा असल्या "राष्ट्रवादा"चे अजब तर्कटशास्त्र आहे. याउलट आपल्या वेदातील स्तोत्रांतूनच आपण प्रेरणा घेऊ या.**

"संज्ञानं स्वेभिः संज्ञानं अरणे–भिः।"
आपल्या स्वतःच्या लोकांमध्ये सुसंवाद नांदो–
परकीय लोकांमध्येही सुसंवाद नांदो !

हा आपला वारसा आहे.—सार्वत्रिक मानवतावादाचा, जागतिक भ्रातृभावाचा. आजच्या काळातल्या परिस्थितीला तो लागू करा. **अन** पाहा. समाजवादी आंतरराष्ट्रीयवाद, एका सुदृढ समाजवादी जगाच्या

उभारणीसाठी परिश्रम करणाऱ्या जागतिक जनतेचा भ्रातृभाव अन एकता हाच त्याचा अर्थ होईल.

सोविएत संघराज्यातून, प्रेरणा घेणे अन समाजवादी भवितव्याची आकांक्षा करणे हे चांगलेच आहे. पण त्याकरिता आपणास तयारी जर कशाची करावयास हवी असेल तर ती म्हणजे भांडवलदार – जमीनदारांची सत्ता नष्ट करून त्याजागी कष्टकरी जनतेच्या सत्तेची प्रतिष्ठापना करण्याची. त्याखेरीज समाजवादाच्या गोष्टी करणे म्हणजे एक तर स्वप्नरंजनात्मक मनोराज्य करणे अथवा केवळ बाष्कळ बडबड करणे. त्यात निवड करायला हवी.

REFBK-0024353

मराठी ग्रं. संग्रहालय ठाणे
३०६०
दा. क्र. २७३५३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

खाडिलकरांचा
प्रॅक्टिकल सोशॅलिझम
एक समीक्षा

ए. बी. वर्धन